
# इतिहास व नागरिकशास्त्र


## इयत्ता सहावी













# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

मंजुरी क्रमांक : मराशैसंप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६/१६७३ दिनांक ६.४.२०१६

# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सहावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१६
पुनर्मुद्रण : नोव्हेंबर २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती :**
डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
ॲड. विक्रम एडके, सदस्य
डॉ. अभिराम दीक्षित, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरूडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती :**
डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट :**
श्री. राहुल प्रभू
श्री. संजय वझरेकर
श्री. सुभाष राठोड
सौ. सुनीता दळवी
डॉ. शिवानी लिमये
श्री. भाऊसाहेब उमाटे
डॉ. नागनाथ येवले
श्री. सदानंद डोंगरे
श्री. रवींद्र पाटील
श्री. विक्रम अडसूळ
सौ. रूपाली गिरकर
सौ. मिनाक्षी उपाध्याय
सौ. कांचन केतकर
सौ. शिवकन्या पटवे
डॉ. अनिल सिंगारे
डॉ. रावसाहेब शेळके
श्री. मरीबा चंदनशिवे
श्री. संतोष शिंदे
डॉ. सतीश चापले
श्री. विशाल कुलकर्णी
श्री. शेखर पाटील
श्री. संजय मेहता
श्री. रामदास ठाकर

**लेखिका :**
डॉ. शुभांगना अत्रे, प्रा. साधना कुलकर्णी

**मुखपृष्ठ व सजावट :**
प्रा. दिलीप कदम, श्री. रवींद्र मोकाटे

**नकाशाकार :**
श्री. रविकिरण जाधव

**संयोजक :**
**श्री. मोगल जाधव**
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
**श्रीमती वर्षा सरोदे**
विषय साहाय्यक, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती :**
**श्री.सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :**
मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :**
७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :**
N/PB/2021-22/15,000

**मुद्रक :**
MOHAK PRINTERS , PUNE

**प्रकाशक :**
**श्री. विवेक उत्तम गोसावी,**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५'** आणि **'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम -२००९'** अनुसार महाराष्ट्र राज्यात **'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२'** तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमाची कार्यवाही २०१३-२०१४ या शालेय वर्षापासून क्रमश: सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमात इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचा समावेश 'परिसर अभ्यास भाग-१' व 'परिसर अभ्यास भाग-२' मध्ये करण्यात आला आहे. इयत्ता सहावीपासून पुढील अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय आहेत. यापूर्वी या विषयांसाठी दोन स्वतंत्र पाठ्यपुस्तके होती. आता या दोन्ही विषयांचा समावेश या मोठ्या आकाराच्या एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन-अध्यापन करताना स्पष्ट हवे. त्यासाठी या पाठ्यपुस्तकात इतिहास व नागरिकशास्त्र विभागांच्या सुरुवातीला त्या त्या विषयांच्या अपेक्षित क्षमता नमूद केल्या आहेत. या क्षमतांच्या अनुषंगाने पाठ्यपुस्तकातील आशयाची नावीन्यपूर्ण मांडणी करण्यात आली आहे.

इतिहासाच्या भागात 'प्राचीन भारताचा इतिहास' दिलेला आहे. त्यातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती आणि परंपरा यांची सर्वांगीण माहिती मिळावी तसेच याद्‌वारे त्यांची सामाजिक एकात्मतेसंबंधीची जाणीव वाढीस लागावी हा उद्‌देश आहे. हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच भारताचे दूरवरच्या देशांशी प्रस्थापित झालेले व्यापारी संबंध प्राचीन भारताच्या समृद्‌धीच्या मुळाशी होते. हे व्यापारी संबंध विश्वबंधुत्व आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य या गोष्टींशिवाय शक्य होत नाहीत यावर भर दिलेला आहे.

नागरिकशास्त्राच्या भागात 'स्थानिक शासन संस्था' याविषयी माहिती घेत असताना विकासाच्या योजनांमध्ये स्थानिक जनतेचा सहभाग, महिलांच्या सहभागाचा आणि त्यांच्या सहभागातून झालेल्या बदलांचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियमांनुसार चालतो हे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत सांगितले आहे. पाठांत चौकटींत दिलेली माहिती विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक परिणामकारक करू शकेल. शिक्षकांसाठी वेगळ्या सूचना दिल्या आहेत. अध्यापन जास्तीत जास्त कृतिप्रधान व्हावे, यासाठी उपक्रम देण्यात आले आहेत.

पाठ्यपुस्तक जास्तीतजास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले. मंडळाची इतिहास विषय समिती व नागरिकशास्त्र विषय समिती, अभ्यासगट सदस्य, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(चं.रा.बोरकर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : ८ एप्रिल २०१६, गुढी पाडवा
भारतीय सौर : १९ चैत्र, १९३८

## – शिक्षकांसाठी –

- प्राचीन भारताचा इतिहास विद्यार्थ्यांना शिकवण्याचे प्रयोजन विद्यार्थ्यांना आपली संस्कृती आणि परंपरा यांची सर्वांगीण माहिती मिळावी आणि त्याद्वारे त्यांची सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेसंबंधीची जाणीव वाढीस लागावी, हे आहे. शिक्षकांनी प्राचीन भारताचा इतिहास हा विषय शिकवताना हे प्रयोजन लक्षात घेऊन शिकवण्याच्या पद्धतीचे नियोजन करावे.
- रोजच्या जीवनात प्रत्ययाला येणाऱ्या अनेक सांस्कृतिक प्रथा–परंपरांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात. ते प्रश्न काय असतील हे स्वानुभवाच्या आधारे शिक्षकांनाही माहीत असणे अपेक्षित असते. असे प्रश्न विद्यार्थ्यांनी निर्भय होऊन विचारावेत, या दृष्टीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.
- आपल्या सांस्कृतिक वारशाबद्दलची जाणीव प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासातून निर्माण होण्यासाठी विविध प्रकारच्या प्राचीन वस्तू, नाणी, प्राचीन स्थापत्याचे नमुने यांबद्दलची अधिकाधिक माहिती मिळवण्याची साधने कोणती, याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करावे. पाठ्यपुस्तकातील माहितीव्यतिरिक्त अधिक माहिती संकलित करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.
- हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच भारताचे दूरवरच्या देशांशी प्रस्थापित झालेले व्यापारी संबंध प्राचीन भारताच्या समृद्धीच्या मुळाशी होते, हे लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप विद्यार्थ्यांना थोडक्यात समजावून सांगावे. अशा प्रकारचा व्यापार विश्वबंधुत्व आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य या गोष्टींशिवाय शक्य होत नाही, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.
- रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये आग्नेय आशियातील इंडोनेशिया, कंबोडिया या देशांमध्ये नृत्यनाट्याच्या स्वरूपात सादर करण्याची परंपरा आजतागायत टिकून आहे. तेथील प्राचीन शिल्पांमध्येही त्यांतील कथांचा समावेश केलेला आढळतो. त्यासंबंधीची अधिक माहिती मिळवून ती वर्गात सादर करता येईल, यासाठी विद्यार्थ्यांना प्रकल्प द्यावेत.
- 'पाणिनि', 'स्मृति' या शब्दांसारखे ऱ्हस्व 'इ'कारान्त शब्द आणि 'सिंधु' या शब्दासारखे ऱ्हस्व 'उ'कारान्त शब्द हे संस्कृतमधून मराठीमध्ये आलेले तत्सम शब्द आहेत. अशा प्रकारचे शब्द विशेषनाम वगैरे स्वरूपात आले असतील, तर पुस्तकात त्यांचा जेव्हा पहिल्यांदा उल्लेख आला असेल, तेव्हा ते शब्द अनुक्रमे ऱ्हस्व इकारान्त व ऱ्हस्व उकारान्त ठेवले आहेत. या शब्दांचे मूळ रूप कळावे म्हणून असे करण्यात आले आहे, परंतु अशा प्रकारच्या शब्दांचा पुस्तकात जेव्हा नंतर उल्लेख आला असेल, तेव्हा ते शब्द मराठी प्रमाणलेखनाच्या नियमानुसार दीर्घ 'ई'कारान्त व दीर्घ 'ऊ'कारान्त लिहिले आहेत. असे तत्सम शब्द समासात पूर्वपद म्हणून आले असतील, तर मात्र प्रमाणलेखनाच्या नियमानुसार त्यांचे मूळ रूप सर्वत्र कायम ठेवले आहे.
- नागरिकशास्त्र विषयाची सुरुवात करण्यापूर्वी आपल्या देशातील शासनरचना स्पष्ट करावी. संघशासन, घटक राज्यशासन आणि स्थानिक शासन यांचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करावे.
- स्थानिक कारभाराविषयी राज्यशासनाचे स्वतंत्र कायदे आहेत. विद्यार्थ्यांना त्या कायद्यांची विस्तृत माहिती देणे अपेक्षित नाही, परंतु आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियम यांना अनुसरून चालतो हे त्यांना आवर्जून सांगावे. कायद्याचे अधिराज्य असल्याचे फायदे त्यांना वेगवेगळ्या उदाहरणांतून दाखवून द्यावेत.
- त्र्याहत्तराव्या आणि चौऱ्याहत्तराव्या संविधान दुरुस्तीचे इथे त्रोटक उल्लेख आहेत. या संविधान दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासन संस्थांचे सबलीकरण झाले आहे, ही बाब लक्षात घेऊन स्थानिक शासन संस्थांमध्ये झालेले बदल विद्यार्थ्यांना सांगावेत.
- स्थानिक शासन संस्थांमधील महिलांच्या सहभागाचा आणि त्यांच्या सहभागातून झालेल्या बदलांचा आवर्जून उल्लेख करावा.
- ब्रिटिश राजवटीत 'स्थानिक स्वराज्य संस्था' असे स्थानिक शासनाला म्हटले जात असे. स्वातंत्र्यानंतर सर्वच पातळ्यांवर स्वराज्य असल्याने आता 'स्थानिक शासन संस्था' असे म्हटले जाते.

# प्राचीन भारताचा इतिहास

## अनुक्रमणिका


| पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. भारतीय उपखंड आणि इतिहास ................................ | १ |
| २. इतिहासाची साधने........................................ | ६ |
| ३. हडप्पा संस्कृती.......................................... | १० |
| ४. वैदिक संस्कृती .......................................... | १५ |
| ५. प्राचीन भारतातील धार्मिक प्रवाह............................. | २० |
| ६. जनपदे आणि महाजनपदे.................................. | २६ |
| ७. मौर्यकालीन भारत ........................................ | ३० |
| ८. मौर्य साम्राज्यानंतरची राज्ये .................................. | ३६ |
| ९. दक्षिण भारतातील प्राचीन राज्ये ............................... | ४२ |
| १०. प्राचीन भारत : सांस्कृतिक.................................. | ४८ |
| ११. प्राचीन भारत आणि जग .................................... | ५४ |


**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2016. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

## अध्ययन निष्पत्ती

| सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यास जोडीने / गटामध्ये / वैयक्तिकरीत्या अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे.**<br>• इतिहासाची घडण आणि भौगोलिक वैशिष्ट्ये याविषयी माहिती करून घेणे.<br>• चित्रे, विविध प्रकारच्या इतिहासाच्या साधनांची रेखाटने यांचे वाचन, विश्लेषण, त्यांवर चर्चा करून इतिहासतज्ज्ञांनी भारताच्या प्राचीन इतिहासाची पुनर्बांधणी कशाप्रकारे केली असेल याचा अर्थ लावणे.<br>• नकाशाविषयी कृती : महत्त्वाची स्थाने शोधणे, शिकारी व अन्न गोळा करणाऱ्यांची स्थाने, अन्न उत्पादक, हडप्पा संस्कृती, जनपदे, महाजनपदे, साम्राज्ये, बुद्ध आणि महावीर यांच्या जीवनात घडलेल्या घटनांशी संबंधित ठिकाणे, भारताबाहेर असलेली कला आणि स्थापत्यशास्त्रीय केंद्रे आणि त्यांचा भारताशी असलेला संबंध.<br>• महाकाव्ये, रामायण, महाभारत, सिलप्पधिकरम, मणीमेखलाई किंवा कालिदासाचे महत्त्वाचे साहित्य यांचा शोध घेणे.<br>• चर्चा करणे : बौद्ध व जैन धर्मांतील तत्त्वे आणि इतर विचारप्रवाह यांच्या मूलभूत संकल्पना व मध्यवर्ती मूल्ये – त्यांच्या शिकवणुकीची आजच्या काळातील समर्पकता – प्राचीन भारतातील कला आणि स्थापत्यशास्त्राचा अभ्यास, भारताचे संस्कृती आणि विज्ञान क्षेत्रांतील योगदान.<br>• भूमिका पालन : अनेक ऐतिहासिक मध्यवर्ती कल्पनांवर आधारित. उदा., कलिंग युद्धानंतर सम्राट अशोकमध्ये झालेला बदल. त्या काळातील लिखित साधनांमध्ये अंतर्भूत एखाद्या विषयावर आधारित.<br>• प्रकल्प पद्धती : राज्यांची उत्क्रांती, गण आणि संघ यांची कार्यपद्धती – विविध राज्यांचे, घराण्यांचे योगदान, भारताचा भारताबाहेरील क्षेत्रांशी असलेला संपर्क आणि या संपर्काचा झालेला विशेष परिणाम या प्रकल्पावर आधारित वर्गचर्चा.<br>• वस्तुसंग्रहालयास भेट : आद्य मानवी वसाहतींचे भौतिक अवशेष पाहण्यासाठी – हडप्पाकालीन, त्यांच्या संस्कृतींमधील सातत्य आणि परिवर्तन यांविषयी चर्चा करणे. | **अध्ययनार्थी**<br>06.73H.01 इतिहास आणि भूगोल यांचा सहसंबंध ओळखतात.<br>06.73H.02 इतिहासाची विविध साधने ओळखतात आणि त्यांचा या काळातील इतिहासाच्या पुनर्लेखनासाठी उपयोग स्पष्ट करतात.<br>06.73H.03 भारताच्या नकाशावर महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांचे स्थान दर्शवतात.<br>06.73H.04 महत्त्वाची राज्ये, राजघराणी यांचे लक्षणीय योगदान स्पष्ट करतात. उदा., अशोकाचे शिलालेख, गुप्तकालीन नाणी, पल्लवांची रथमंदिरे, इत्यादी.<br>06.73H.05 प्राचीन काळातील व्यापक घडामोडी स्पष्ट करतात. उदा., शिकारी व अन्न गोळा करणारे हा टप्पा ते शेतीची सुरुवात. सिंधु संस्कृतीतील पहिली नगरे इत्यादी. एका ठिकाणच्या घडामोडीचा दुसऱ्या ठिकाणाशी संबंध जोडतात.<br>06.73H.06 त्याकाळच्या लिखित साधनांमध्ये नमूद केलेल्या बाबी, घटना, व्यक्ती यांचे वर्णन करतात.<br>06.73H.07 भारताचा भारताबाहेरील क्षेत्राशी आलेल्या संपर्काचा धर्म, कला, स्थापत्यशास्त्र इत्यादी क्षेत्रांवर झालेला परिणाम स्पष्ट करतात.<br>06.73H.08 भारताचे सांस्कृतिक व वैज्ञानिक क्षेत्रांतील योगदान स्पष्ट करतात. उदा. खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, गणित, धातुशास्त्र इत्यादी.<br>06.73H.09 विविध ऐतिहासिक घडामोडींच्या संबंधित माहितीचे संश्लेषण करतात.<br>06.73H.10 प्राचीन काळातील विविध धर्म आणि विचारपद्धती यांची मूलभूत तत्त्वे आणि मूल्ये यांचे विश्लेषण करतात.<br>06.73H.11 मानवता आणि धर्मनिरपेक्षता हा सर्वश्रेष्ठ विचार आहे हे स्पष्ट करतात.<br>06.73H.12 वैचारिक व सांस्कृतिक आदान-प्रदानाने मानवाचे ज्ञान अधिक समृद्ध होते हे समजून घेतात. |

# १. भारतीय उपखंड आणि इतिहास

१.१ इतिहासाची घडण आणि भौगोलिक वैशिष्ट्ये
१.२ भारताची भौगोलिक वैशिष्ट्ये
१.३ भारतीय उपखंड

## १.१ इतिहासाची घडण आणि भौगोलिक वैशिष्ट्ये

इयत्ता पाचवीत आपण मानव आणि त्याच्या भोवतालचा परिसर यांचा परस्परांशी कसा घनिष्ठ संबंध असतो, हे विस्ताराने पाहिले. आदिमानवाच्या जीवनमानातील आणि तंत्रज्ञानातील बदल त्याच्या परिसरातील बदलांशी कसे जोडलेले होते, हे पाहिले. अश्मयुगीन संस्कृती ते नदीकाठच्या कृषिप्रधान संस्कृती हा मानवी संस्कृतीच्या इतिहासाचा प्रवास कसा घडला, याचा आपण आढावा घेतला.

इतिहास म्हणजे मानवी संस्कृतीच्या प्रवासात घडलेल्या सर्व प्रकारच्या भूतकालीन घटनांची सुसंगत मांडणी. स्थल, काल, व्यक्ती व समाज हे इतिहासाचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. या चार घटकांशिवाय इतिहास लिहिला जाऊ शकत नाही. यांपैकी स्थल हा घटक भूगोलाशी म्हणजे भौगोलिक परिस्थितीशी संबंधित आहे. इतिहास व भूगोल यांचे नाते अतूट आहे. भौगोलिक परिस्थिती इतिहासावर अनेक प्रकारे परिणाम करत असते.

**चला, चर्चा करू.**

- तुमच्या परिसरात कोणकोणते व्यवसाय आहेत ?
- तुमच्या परिसरात कोणकोणती पिके घेतली जातात ?

आहार, वेशभूषा, घरबांधणी, व्यवसाय इत्यादी गोष्टी बऱ्याच अंशी आपण राहतो त्या परिसराच्या भौगोलिक वैशिष्ट्यांवर अवलंबून असतात.



घरांचे प्रकार

समाजजीवनसुद्धा त्यांवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांचे जीवन मैदानी प्रदेशात राहणाऱ्या लोकांपेक्षा अधिक कष्टाचे असते. डोंगराळ प्रदेशात सुपीक शेतजमिनीची उपलब्धता अगदी थोडी, तर मैदानी प्रदेशात सुपीक शेतजमीन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. त्यामुळे डोंगराळ प्रदेशातील लोकांना तृणधान्ये आणि भाज्या कमी प्रमाणात उपलब्ध असतात, तर तुलनेने मैदानी प्रदेशातील लोकांना या गोष्टी पुरेशा मिळतात. त्याचा परिणाम खाण्यापिण्यावर झालेला दिसतो. डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना अन्नासाठी शिकारीवर आणि जंगलातून गोळा केलेल्या पदार्थांवर अधिक अवलंबून रहावे लागते. अशाच पद्धतीने डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या आणि मैदानी प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या जीवनपद्धतीतील इतर गोष्टींमध्येही फरक आढळतो.

आपण राहतो त्या प्रदेशातील हवामान, पर्जन्यमान, शेतीतून मिळणारे पीक, वनस्पती आणि प्राणी इत्यादी गोष्टी आपल्या जगण्याची साधने असतात. त्यांच्या आधारानेच त्या त्या प्रदेशातील जीवनपद्धती आणि संस्कृती विकसित होत असते. जगण्याच्या साधनांची मुबलकता जिथे असेल, तिथे मानवी समाज दीर्घकाळ वस्ती करतो. कालांतराने या वस्त्यांचे ग्राम-वसाहती आणि नगरे यांत रूपांतर होते. पर्यावरणाचा ऱ्हास, दुष्काळ, आक्रमणे किंवा इतर कारणांमुळे जगण्याच्या साधनांची कमतरता भासू लागली, की लोकांना गाव सोडून जाणे भाग पडते. ग्राम-वसाहती, नगरे उजाड होतात. अशा अनेक घडामोडी इतिहासात घडलेल्या दिसतात. त्यावरून इतिहास आणि भूगोल यांचे नाते अतूट असते, हे स्पष्ट होते.

## १.२ भारताची भौगोलिक वैशिष्ट्ये

आपला भारत देश विस्ताराने मोठा आहे. त्याच्या उत्तरेला हिमालय, पूर्वेला बंगालचा उपसागर, पश्चिमेला अरबी समुद्र आणि दक्षिणेला हिंदी महासागर आहे. भारताची अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप ही बेटे वगळता उरलेला प्रदेश भौगोलिकदृष्ट्या सलग आहे.

प्राचीन भारताचा इतिहास शिकत असताना आपल्याला हा भूप्रदेश लक्षात घ्यावा लागतो. त्याचाच उल्लेख आपण 'प्राचीन भारत' असा करणार आहोत. आजचे पाकिस्तान आणि बांगलादेश इ.स. १९४७ पूर्वी भारताचा भाग होते.

भारतीय इतिहासाच्या जडणघडणीचा विचार केला असता खालील सहा भूप्रदेश महत्त्वाचे ठरतात.

१. हिमालय
२. सिंधु-गंगा-ब्रह्मपुत्रा नद्यांचा मैदानी प्रदेश
३. थरचे वाळवंट
४. दख्खनचे पठार
५. समुद्रकिनाऱ्यांचे प्रदेश
६. समुद्रातील बेटे



**हिमालय पर्वत**

**१. हिमालय :** हिंदुकुश व हिमालय पर्वतांमुळे भारतीय उपखंडाच्या उत्तरेला जणू एक अभेद्य भिंतच उभी राहिलेली आहे. या भिंतीमुळे भारतीय उपखंड मध्य आशियातील वाळवंटापासून अलग झालेला आहे. मात्र हिंदुकुश पर्वतातील खैबर, बोलन या खिंडींमधून जाणारा खुश्कीचा व्यापारी मार्ग आहे. मध्य आशियातून जाणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गाशी तो जोडला गेलेला होता. चीनपासून निघून मध्य आशियातून अरबी प्रदेशापर्यंत जाणारा हा व्यापारी मार्ग 'रेशीम मार्ग' म्हणून ओळखला जातो. कारण या मार्गावरून पश्चिमेकडील देशांत पाठवल्या जाणाऱ्या मालात रेशीम प्रमुख होते. याच खिंडीतील मार्गावरून अनेक परदेशी आक्रमकांनी प्राचीन भारतात प्रवेश केला. अनेक परदेशी प्रवासी या मार्गाने भारतात आले.



**खैबर खिंड**

**२. सिंधू-गंगा-ब्रह्मपुत्रा नद्यांचा मैदानी प्रदेश :** सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा या तीन मोठ्या नद्या आणि त्यांच्या उपनद्या यांच्या खोऱ्यांचा हा प्रदेश आहे. हा प्रदेश पश्चिमेकडे सिंध-पंजाबपासून पूर्वेकडे सध्याच्या



गंगा नदी

बांगलादेशपर्यंत पसरलेला आहे. भारतातील सर्वाधिक प्राचीन नागरी हडप्पा संस्कृती आणि त्यानंतरची प्राचीन गणराज्ये आणि साम्राज्ये याच प्रदेशात उदयाला आली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

आफ्रिका खंडातील सहारा वाळवंट हे जगातील सर्वांत मोठे वाळवंट आहे.



थरचे वाळवंट


**३. थरचे वाळवंट :** थरचे वाळवंट राजस्थान, हरियाणा आणि गुजरात या प्रदेशांतील काही भागांमध्ये पसरलेले आहे. त्याचा काही भाग आजच्या पाकिस्तानातही आहे. उत्तरेला सतलज नदी, पूर्वेला अरवली पर्वताच्या रांगा, दक्षिणेला कच्छचे रण आणि पश्चिमेला सिंधू नदी आहे. हिमाचल प्रदेशात उगम पावणारी घग्गर नावाची नदी थरच्या वाळवंटात पोचते. पाकिस्तानमध्ये तिला हाक्रा या नावाने ओळखतात. राजस्थान आणि पाकिस्तानमधील तिचे पात्र आता कोरडे पडलेले आहे. त्या कोरड्या पात्राच्या प्रदेशात हडप्पा संस्कृतीची अनेक स्थळे विखुरलेली आहेत.

**४. दख्खनचे पठार :** एका बाजूस पूर्व किनारा आणि दुसऱ्या बाजूस पश्चिम किनारा यांमध्ये असलेला भारताचा भूप्रदेश दक्षिणेकडे निमुळता होत जातो. त्याच्या पश्चिम बाजूला अरबी समुद्र, दक्षिणेला हिंदी महासागर आणि पूर्वेला बंगालचा उपसागर आहे. तीन बाजूंनी पाण्याने वेढलेला हा भूभाग समुद्रात घुसलेल्या एखाद्या त्रिकोणी सुळक्यासारखा दिसतो. अशा भूप्रदेशाला 'द्वीपकल्प' म्हणतात. भारतीय द्वीपकल्पाचा बहुतांश भाग दख्खनच्या पठाराने व्यापलेला आहे.

दख्खन पठाराच्या उत्तरेकडे सातपुडा आणि विंध्य पर्वतांच्या रांगा पसरलेल्या आहेत. त्याच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा आहेत. त्याला 'पश्चिम घाट' असेही म्हणतात. सह्याद्रीच्या पश्चिम पायथ्याशी कोकण आणि मलबारच्या किनारपट्टीचा प्रदेश आहे. दख्खन पठाराच्या पूर्वेकडील डोंगरांना 'पूर्व घाट' असे म्हटले जाते. या पठारावरील जमीन सुपीक असून तिथे हडप्पा संस्कृतीच्या नंतरच्या काळात अनेक कृषिप्रधान संस्कृती नांदत होत्या. मौर्य साम्राज्य हे प्राचीन भारतातील सर्वाधिक मोठे साम्राज्य होते आणि दख्खनच्या पठाराचा समावेश या साम्राज्यात झालेला होता. मौर्य साम्राज्यानंतरही इथे अनेक छोटी-मोठी साम्राज्ये होऊन गेली.

**५. समुद्रकिनाऱ्यांचे प्रदेश :** प्राचीन भारतात हडप्पा संस्कृतीच्या काळापासून पश्चिमेकडील देशांशी व्यापार चालत असे. हा व्यापार सागरी मार्गाने केला जाई. त्यामुळे भारतातील समुद्रकिनाऱ्यांवरील बंदरांतून परदेशातील संस्कृतींशी आणि लोकांशी भारताचा संपर्क आणि देवाणघेवाण होत असे. नंतरच्या काळात खुश्कीच्या मार्गानेही म्हणजेच जमिनीवरून व्यापार आणि दळणवळण सुरू झाले. तरीही सागरी मार्गाचे महत्त्व कायम राहिले.

**६. समुद्रातील बेटे :** अंदमान आणि निकोबार ही बंगालच्या उपसागरातील भारतीय बेटे आहेत. तसेच लक्षद्वीप हा भारतीय बेटांचा समूह अरबी समुद्रात आहे. प्राचीन काळच्या समुद्री व्यापारात या बेटांचे स्थान महत्त्वाचे असावे. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी'




म्हणजे 'तांबड्या समुद्राचे माहितीपुस्तक'. या पुस्तकात भारतीय बेटांचा उल्लेख आहे. हे पुस्तक एका अनामिक ग्रीक खलाश्याने लिहिलेले आहे.



**करून पहा.**

भारताच्या नकाशा आराखड्यात खालील ठिकाणांची नोंद करा.

१. हिमालय पर्वत
२. थरचे वाळवंट
३. पूर्व किनारपट्टी



**अंदमान बेट**

## १.३ भारतीय उपखंड

हडप्पा आणि मोहेंजोदडो ही शहरे आजच्या

पाकिस्तानात आहेत. अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ, भूटान, बांगलादेश, श्रीलंका आणि आपला भारत देश मिळून तयार होणारा भूभाग 'दक्षिण आशिया' या नावाने ओळखला जातो. याच भूभागातील भारत देशाचा विस्तार आणि महत्त्व लक्षात घेऊन या प्रदेशाला 'भारतीय उपखंड' असेही म्हणतात. हडप्पा संस्कृतीचा विस्तार प्रामुख्याने भारतीय उपखंडाच्या वायव्य भागात झालेला होता.

चीन आणि म्यानमार हे आपले शेजारी देश दक्षिण आशियाचा किंवा भारतीय उपखंडाचा हिस्सा नाहीत. तरीही प्राचीन भारताशी त्यांचे ऐतिहासिक संबंध आले होते. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात त्यांचे महत्त्वाचे स्थान आहे.

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) इतिहास म्हणजे काय?

(२) मानवी समाज दीर्घकाळ वस्ती कोठे करतो?

(३) डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना अन्नासाठी प्रामुख्याने कशावर अवलंबून रहावे लागते?

(४) भारतातील सर्वाधिक प्राचीन नागरी संस्कृती कोणती?

**२. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मानवी समाजजीवन कोणत्या गोष्टींवर अवलंबून असते?

(२) आपण राहतो त्या प्रदेशातील कोणत्या गोष्टी आपल्या जगण्याची साधने असतात?

(३) 'भारतीय उपखंड' असे कोणत्या प्रदेशाला म्हणतात?

**३. कारणे लिहा.**

(१) इतिहास आणि भूगोल यांचे नाते अतूट असते.

(२) लोकांना गाव सोडून जाणे भाग पडते.

**४. डोंगराळ प्रदेश व मैदानी प्रदेश यांच्या लोकजीवनातील फरक स्पष्ट करा.**

**५. पाठ्यपुस्तकातील भारत–प्राकृतिक या नकाशाचे निरीक्षण करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) भारताच्या उत्तरेकडे कोणत्या पर्वतरांगा आहेत?

(२) भारताच्या उत्तरेकडून येणारे मार्ग कोणते?

(३) गंगा–ब्रह्मपुत्रा या नद्यांचा संगम कोठे होतो?

(४) भारताच्या पूर्वेस कोणती बेटे आहेत?

(५) थरचे वाळवंट भारताच्या कोणत्या दिशेला आहे?

**उपक्रम**

(१) तुमच्या परिसरात आढळणाऱ्या जलाशयांविषयी माहिती मिळवा.

(२) जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी/घटक दाखवा.

१. हिमालय पर्वत

२. रेशीम मार्ग

३. अरबी प्रदेश/अरबस्तान

DRXFU7

* * *



विविध वेशभूषा

# २. इतिहासाची साधने

**२.१ भौतिक साधने**
**२.२ लिखित साधने**
**२.३ मौखिक साधने**
**२.४ प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने**
**२.५ इतिहास लेखनाबाबत घ्यायची काळजी**

**करून पहा.**

- तुमच्या घरात असलेल्या आजी-आजोबांच्या काळातील वस्तूंची यादी तयार करा.
- तुमच्या परिसरातील/गावातील एखाद्या जुन्या वास्तूची माहिती गोळा करा.

आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या अनेक वस्तू आजही अस्तित्वात आहेत. त्यांनी कोरून ठेवलेले विविध लेख आपल्याला सापडले आहेत. या साधनांच्या मदतीने आपल्याला इतिहास कळू शकतो. याशिवाय चालीरीती, परंपरा, लोककला, लोकसाहित्य, ऐतिहासिक कागदपत्रे यांच्या आधारे आपल्याला इतिहास कळतो. या सर्वांना 'इतिहासाची साधने' म्हणतात.

इतिहासाची साधने तीन प्रकारची आहेत : भौतिक साधने, लिखित साधने, मौखिक साधने.

**सांगा पाहू!**

- किल्ले, लेणी, स्तूप या वास्तूंना 'भौतिक साधने' म्हणतात. याशिवाय अजून कोणकोणत्या वास्तूंना भौतिक साधने म्हणतात?

## २.१ भौतिक साधने

दैनंदिन जीवनात माणूस विविध प्रकारच्या वस्तू वापरत असतो. पूर्वीच्या माणसाने वापरलेल्या अनेक वस्तू आज आपल्याला महत्त्वाची माहिती पुरवू शकतात. पुरातन वस्तूंमधील खापराच्या तुकड्यांचे आकार, रंग, नक्षी यांवरून ही भांडी कोणत्या काळातील असावी याचा अंदाज बांधता येतो. दागदागिने आणि इतर वस्तूंवरून मानवी समाजाच्या परस्परसंबंधांची माहिती मिळते. धान्य, फळांच्या बिया आणि प्राण्यांची हाडे यांवरून आहाराची माहिती मिळते. वेगवेगळ्या काळात माणसाने बांधलेल्या घरांचे आणि इमारतींचे अवशेष सापडतात. याशिवाय नाणी, मुद्राही सापडतात. या सर्वांच्या साहाय्याने मानवी व्यवहारांची माहिती होते. या सर्व वस्तू आणि वास्तू किंवा त्यांचे अवशेष यांना इतिहासाची 'भौतिक साधने' म्हणतात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

धान्याचे कण फार काळ टिकत नाहीत. त्यांना कीड लागते. त्यांचा भुगा होतो.


प्राचीन काळी धान्याचे पीठ करण्याआधी ते धान्य भाजत असत आणि मग ते भरडत असत. धान्य भाजताना त्याचे काही कण अधिक भाजले गेले किंवा जळले तर ते टाकून दिले जात. असे जळके कण वर्षानुवर्षे टिकून राहतात. ते उत्खननात सापडतात. त्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली असता ते कोणत्या धान्याचे कण आहेत हे ओळखू येते.



नाणी



खापराचा तुकडा



दागदागिने



भांडी

**माहीत आहे का तुम्हांला ?**

मंदिरांच्या भिंती, लेण्यांच्या भिंती, शिळा, ताम्रपट, भांडी, कच्च्या विटा, ताडपत्रे, भूर्जपत्रे इत्यादींवर कोरलेल्या लेखांचा समावेश लिखित साधनांत होतो.



ताम्रपट



शिलालेख

## २.२ लिखित साधने


अश्मयुगातील माणसाने त्याच्या जीवनातील अनेक प्रसंग आणि भावना चित्रांतून व्यक्त केल्या आहेत. हजारो वर्षे उलटल्यानंतर माणसाला लिहिण्याची कला अवगत झाली.

माणूस सुरुवातीला प्रतीके, चिन्हे यांचा वापर नोंदी ठेवण्यासाठी करत असे. त्यांपासून लिपीचा विकास होण्यास हजारो वर्षे जावी लागली.


सुरुवातीच्या काळात खापरे, कच्च्या विटा, झाडांच्या साली, भूर्जपत्रे यांसारख्या साहित्याचा लिहिण्यासाठी उपयोग केला जाई. अशा प्रकारच्या साहित्यावरील मजकूर एखाद्या अणकुचीदार साधनाने कोरलेला असे. अनुभव व ज्ञान जसजसे वाढत गेले, तसतसे त्याने विविध पद्धतींनी लेखन करण्यास सुरुवात केली. सभोवताली घडलेल्या घटना, दरबारी कामकाजाचे वृत्तान्त इत्यादी माहिती लिहून ठेवण्याची पद्धत सुरू झाली. अनेक राजांनी आपल्या आज्ञा, निवाडे, दानपत्रे दगडांवर किंवा तांब्याच्या पत्र्यांवर कोरून ठेवली आहेत. कालांतराने वाङ्मयाचे अनेक प्रकार निर्माण झाले. धार्मिक-सामाजिक स्वरूपाचे ग्रंथ, नाटके, काव्ये, प्रवासवर्णने तसेच शास्त्रीय विषयांवरील लेखन झाले. या साहित्यातून त्या त्या काळाचा इतिहास समजण्यास मदत होते. या सर्व साहित्याला इतिहासाची 'लिखित साधने' असे म्हणतात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भूर्जपत्र हे भूर्ज वृक्षाच्या सालीपासून बनवले जाते. भूर्ज वृक्ष काश्मीरमध्ये आढळतात.



भूर्ज वृक्ष



भूर्जपत्र

**करून पहा.**

- तुमच्या परिसरातील/गावातील वस्तु-संग्रहालयाला भेट द्या. तेथे कोणकोणत्या वस्तू आहेत, यावर निबंध लिहा.
- जात्यावरच्या गाण्यांचा संग्रह करा.
- विविध लोकगीते मिळवा. त्यांपैकी एक लोकगीत शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.

### २.३ मौखिक साधने

ओव्या, लोकगीते, लोककथा यांसारखे साहित्य लिहून ठेवलेले नसते. त्याचा कर्ता अज्ञात असतो. ते पिढ्यान्पिढ्या जतन झालेले असते. अशा साहित्याला मौखिक परंपरेने जतन झालेले साहित्य असे म्हणतात. ओव्या, लोकगीते, लोककला यांसारखे लोकसाहित्याचे प्रकार यांचा त्यात समावेश होतो. अशा प्रकारच्या साधनांना इतिहासाची 'मौखिक साधने' म्हणतात.

**माहीत आहे का तुम्हांला?**

- **ओवी–**

पांडुरंग पिता । रूक्मिण माझी बया ।
आषाढ वारीयेला । पुंडलिक आला न्याया ।।

- **लोकगीत–**

'महानगरी उजनी* *(उज्जयिनी)
लई पुण्यवान दानी
तेथे नांदत होता राजा
सुखी होती प्रजा
तिन्ही लोकी गाजावाजा
असा उजनीचा इक्राम* राजा' *(विक्रमादित्य)

**माहीत आहे का तुम्हांला?**

**प्राचीन भारताच्या इतिहास–लेखनाची साधने**

**भौतिक साधने**

| **वस्तू** | **वास्तू** |
| --- | --- |
| गुहाचित्रे | गुहा |
| मातीची भांडी | घरे |
| मातीची शिल्पे | स्तूप |
| मणी | लेणी |
| रत्ने, दागदागिने | मंदिरे |
| दगडी शिल्पे | चर्च |
| धातूच्या वस्तू | मशिदी |
| नाणी | स्तंभ |
| शस्त्रे | |

**लिखित साधने**

- हडप्पा लिपीतील लेख
- वैदिक साहित्य
- मेसोपोटेमियातील इष्टिकालेख
- महाभारत, रामायण यांच्या हस्तलिखित पोथ्या
- जैन, बौद्ध साहित्य
- ग्रीक इतिहासकार आणि प्रवाशांचे लेखन
- चिनी प्रवाशांची प्रवासवर्णने
- व्याकरणग्रंथ, पुराणग्रंथ, कोरीव लेख

**मौखिक साधने**

प्राचीन भारतातील मौखिक परंपरेने जपलेले वैदिक, बौद्ध आणि जैन साहित्य आता लिखित स्वरूपात उपलब्ध आहे. त्यांचे रूपांतर आता लिखित स्वरूपात झाले असले, तरी त्यांची पठणाची परंपरा अजूनही सुरू आहे. मौखिक स्वरूपातील त्या साहित्याचा उपयोग जेव्हा इतिहास-लेखनासाठी केला जातो, तेव्हा त्याचा समावेश मौखिक साधनांत होतो.

## २.४ प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने

अश्मयुगीन काळापासून इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंतचा कालखंड हा भारताच्या इतिहासाचा प्राचीन कालखंड मानला जातो. भारतातील अश्मयुगाविषयीची माहिती पुरातत्त्वीय उत्खननांतून मिळते. त्या काळात लिपीचा विकास झाला नव्हता. इ. स. पू. १५०० पासूनच्या प्राचीन इतिहासाविषयीची माहिती वेदवाङ्मयातून मिळते. सुरुवातीस वेद हे लिखित नव्हते. ते मुखोद्गत करण्याचे तंत्र प्राचीन भारतीयांनी विकसित केले होते. कालांतराने वेदांचे लेखन झाले. वेद वाङ्मय व त्यानंतर लिहिले गेलेले साहित्य हे प्राचीन भारतीय इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. यामध्ये ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे, आरण्यके, रामायण व महाभारत ही महाकाव्ये, जैन व बौद्ध ग्रंथ, नाटके, काव्ये, शिलालेख, स्तंभालेख, परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने इत्यादींचा समावेश होतो. त्याचप्रमाणे पुरातत्त्वीय उत्खननांत सापडलेल्या वस्तू, पुरातन वास्तू, नाणी अशा अनेक भौतिक साधनांच्या मदतीने आपल्याला प्राचीन भारताचा इतिहास समजतो.

## २.५ इतिहास लेखनाबाबत घ्यायची काळजी

इतिहासाच्या साधनांचा वापर करताना काळजी घ्यावी लागते. एखादा लिखित पुरावा केवळ जुना आहे, म्हणून तो विश्वासार्ह असेलच, असे नाही. तो मजकूर कोणी लिहिला, का लिहिला, केव्हा लिहिला याची छाननी करावी लागते. विश्वासार्ह ठरलेल्या विविध साधनांच्या आधारे काढलेले निष्कर्ष एकमेकांशी पडताळून पाहावे लागतात. इतिहास–लेखनात अशा चिकित्सेला फार महत्त्व असते.

**काय कराल ?**

- तुम्हांला एक जुने नाणे सापडले.
  - स्वत:जवळ ठेवाल.
  - पालकांना द्याल.
  - वस्तुसंग्रहालयात जमा कराल.

DS7BVU

### स्वाध्याय

१. **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) लिहिण्यासाठी कोणत्या साहित्याचा उपयोग केला जाई ?

(२) वेदवाङ्मयातून कोणती माहिती मिळते ?

(३) मौखिक परंपरेने कोणते साहित्य जतन करून ठेवले आहे ?

२. **खालील साधनांचे भौतिक, लिखित व मौखिक साधने यांत वर्गीकरण करा.**

ताम्रपट, लोककथा, मातीची भांडी, मणी, प्रवासवर्णने, ओवी, शिलालेख, पोवाडा, वैदिक साहित्य, स्तूप, नाणी, भजन, पुराणग्रंथ.

| भौतिक साधने | लिखित साधने | मौखिक साधने |
| --- | --- | --- |
| ----- | ----- | ----- |
| ----- | ----- | ----- |
| ----- | ----- | ----- |

३. **पाठातील मातीच्या भांड्यांची चित्रे पहा व त्यांच्या प्रतिकृती तयार करा.**

४. **कोणत्याही नाण्याचे निरीक्षण करा व त्यावरून खालील बाबींची नोंद करा.**

नाण्यावरील मजकूर, वापरलेला धातू, नाण्यावरील वर्ष
.............. .............. ..............
नाण्यावरील चिन्ह, नाण्यावरील चित्र, भाषा, वजन,
.............. .............. ...... ........
आकार, किंमत.
...... ......

५. **कोणकोणत्या गोष्टी मौखिक रूपाने तुमच्या स्मरणात आहेत ? त्यांचे गटात सादरीकरण करा.**

उदा., कविता, श्लोक, प्रार्थना, पाढे इत्यादी.

**उपक्रम**

भौतिक, लिखित साधनांची चित्रे जमवा व त्या चित्रांचे प्रदर्शन बालआनंद मेळाव्यात भरवा.

* * *

# ३. हडप्पा संस्कृती

**३.१ हडप्पा संस्कृती**
**३.२ घरे आणि नगररचना**
**३.३ मुद्रा–भांडी**
**३.४ महास्नानगृह**
**३.५ लोकजीवन**
**३.६ व्यापार**
**३.७ ऱ्हासाची कारणे**

**करून पहा.**


भारताच्या नकाशा आराखड्यात हडप्पा संस्कृतीच्या ठिकाणांची नावे लिहा.

## ३.१ हडप्पा संस्कृती

इ. स. १९२१ मध्ये पंजाबमधील रावी नदीच्या काठी हडप्पा येथे उत्खनन प्रथम सुरू झाले, म्हणून या संस्कृतीला 'हडप्पा संस्कृती' हे नाव मिळाले. या संस्कृतीला 'सिंधू संस्कृती' या नावानेही ओळखले जाते.

हडप्पाच्या दक्षिणेला सुमारे ६५० किलोमीटर अंतरावर सिंधू नदीच्या खोऱ्यात मोहेंजोदडो येथे उत्खनन झाले. हडप्पा आणि मोहेंजोदडो या दोन्ही स्थळांच्या उत्खननातून वस्तू आणि वास्तू यांचे जे अवशेष सापडले, त्यांच्यात कमालीचे साम्य होते.

धोलावीरा, लोथल, कालीबंगन, दायमाबाद



इत्यादी ठिकाणीही उत्खननात अशाच प्रकारचे अवशेष सापडले आहेत.

हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये सर्वसाधारणपणे सर्वत्र सारखीच आढळतात. नगररचना, रस्ते, घरबांधणी, सांडपाण्याची व्यवस्था, मुद्रा, भांडी, खेळणी, मृतदेह पुरण्याची पद्धत यांचा त्यांत प्रामुख्याने समावेश होतो.

**सांगा पाहू !**

- तुमच्या परिसरातील/गावातील घरांची रचना कशी आहे ?
- घरे कौलारू, धाब्याची, उतरत्या छपरांची या प्रकारची आहेत का ?

## ३.२ घरे आणि नगररचना

हडप्पा संस्कृतीच्या लोकांची घरे आणि इतर बांधकामे प्रामुख्याने भाजक्या विटांची होती. काही ठिकाणी कच्च्या विटा आणि दगडांचा वापरही बांधकामासाठी केला जाई. मधोमध चौक आणि त्याभोवती खोल्या अशा प्रकारची घरांची रचना असे. घरांच्या आवारात विहिरी, स्नानगृहे, शौचालये असत. सांडपाणी वाहून नेण्याची उत्तम व्यवस्था असे. त्यासाठी मातीच्या भाजक्या पन्हाळींचा उपयोग केला जाई. रस्त्यावरील गटारे विटांनी बांधून काढलेली असत. ती झाकलेली असत. यावरून सार्वजनिक आरोग्याबद्दल ते किती जागरूक होते ते दिसते.



**हडप्पा संस्कृतीतील विहीर**

**सांगा पाहू !**

- सांडपाणी वाहून नेणारी गटारे झाकलेली नसतील तर आरोग्याच्या कोणकोणत्या समस्या निर्माण होतात ?

रस्ते रुंद असून एकमेकांना काटकोनात छेदतील अशा पद्धतीने बांधलेले असत. त्यामुळे तयार होणाऱ्या चौकोनी मोकळ्या जागेत घरे बांधली जात. नगरांचे दोन किंवा अधिक विभाग केलेले असत आणि प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी केलेली असे.

**करून पहा.**

एक बटाटा घ्या. तो मधोमध कापा. कापलेल्या भागावर काही अक्षरे, आकृती खिळ्याच्या साहाय्याने कोरा. अक्षरे, आकृती कोरलेला भाग शाईत किंवा रंगात बुडवा. रंगीत भाग कोऱ्या कागदावर उमटवा. काय होते त्याचे निरीक्षण करा.

## ३.३ मुद्रा-भांडी

हडप्पा संस्कृतीच्या मुद्रा प्राधान्याने चौरस आकाराच्या, स्टिएटाईट नावाच्या दगडापासून बनवल्या जात. मुद्रांवर विविध प्राण्यांच्या आकृती आहेत. त्यांमध्ये बैल, म्हैस, हत्ती, गेंडा, वाघ यांसारखे खरेखुरे प्राणी आणि एकशृंगासारखे कल्पित प्राणी पाहायला मिळतात. इतर प्राण्यांच्या आकृतींप्रमाणेच मनुष्याकृतीही आढळतात. या मुद्रा ठसा उमटवण्यासाठी वापरल्या जात.



**मुद्रा**

**करून पहा.**

मातीची भांडी कशी तयार केली जातात, हे जाणून घेण्यासाठी मातीची भांडी तयार करणाऱ्या कारागिराची मुलाखत घ्या.


- माती कोणत्या प्रकारची वापरतात ?
- माती कोठून आणतात ?
- एक भांडे तयार होण्यासाठी किती कालावधी लागतो ?

हडप्पा संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननातून विविध प्रकारची आणि आकारांची भांडी मिळाली आहेत. त्यांमध्ये लाल रंगाच्या पृष्ठभागावर काळ्या रंगाने नक्षी काढलेली भांडी आहेत. नक्षीच्या नमुन्यांमध्ये माशांचे खवले, एकमेकांत गुंतलेली वर्तुळे, पिंपळपान यांसारख्या प्रतीकांचा समावेश आहे. हडप्पा संस्कृतीचे लोक मृत व्यक्तीचे दफन करताना त्या व्यक्तीच्या शवाबरोबर मातीची भांडी पुरत असत.



भांडी





**निरीक्षण करा.**

तुमच्या परिसरातील पोहण्याच्या तलावाला भेट द्या. तलावातील पाणी बदलण्याच्या व नव्याने तलावात पाणी सोडण्याच्या पद्धतीचे निरीक्षण करा.

सध्याचा पोहण्याचा तलाव व हडप्पाकालीन स्नानगृह यांची तुलना करा.

### ३.४ महास्नानगृह

मोहेंजोदडो येथे एक प्रशस्त स्नानगृह सापडले आहे. महास्नानगृहातील स्नानकुंड जवळजवळ २.५ मीटर खोल होते. त्याची लांबी सुमारे १२ मीटर आणि रुंदी सुमारे ७ मीटर होती. कुंडातील पाणी झिरपून जाऊ नये म्हणून ते आतून पक्क्या विटांनी बांधलेले होते. त्यात उतरण्यासाठी व्यवस्था होती. तसेच त्यातील पाणी वेळोवेळी बदलण्याची सोय होती.



मोहेंजोदडो येथील महास्नानगृह

**सांगा पाहू !**


- तुमच्या परिसरात/गावात होणाऱ्या पिकांची, फळांची नावे लिहा.
- तुमच्या परिसरातील/गावातील लोक कोणकोणत्या प्रकारचे कपडे वापरतात ?
- तुम्हांला माहीत असलेल्या दागिन्यांची नावे लिहा.

## ३.५ लोकजीवन

हडप्पा संस्कृतीचे लोक शेती करत होते. कालीबंगन येथे नांगरलेल्या शेताचा पुरावा मिळाला आहे. तेथील लोक विविध पिके घेत असत. त्यांमध्ये गहू, सातू (बार्ली) ही मुख्य पिके होती. राजस्थानमध्ये सातूचे पीक तर गुजरातमध्ये नाचणीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाई. यांखेरीज वाटाणा, तीळ, मसूर इत्यादी पिके काढली जात. हडप्पा संस्कृतीच्या लोकांना कापूस माहीत होता.

उत्खननात मिळालेले पुतळे, मुद्रांवरील चित्रे आणि कापडाचे अवशेष इत्यादी पुराव्यांवरून ते कापड विणत असावेत. स्त्री-पुरुषांच्या पोशाखात गुडघ्यापर्यंतचे वस्त्र आणि उपरणे यांचा समावेश होता.

विविध प्रकारचे दागिने उत्खननात सापडले आहेत. ते दागिने सोने, तांबे, रत्ने तसेच शिंपले, कवड्या, बिया इत्यादींचे होते. अनेक पदरी माळा, अंगठ्या, बाजूबंद, कंबरपट्टा हे अलंकार स्त्री-पुरुष वापरत. स्त्रिया दंडापर्यंत बांगड्या घालत.



**हडप्पा संस्कृतीतील दागिने**

हडप्पाकालीन कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणजे तेथे सापडलेला एक वैशिष्ट्यपूर्ण पुतळा. त्याच्या चेहऱ्याचा प्रत्येक तपशील अत्यंत सुस्पष्ट आहे, एवढेच नव्हे तर त्याने खांद्यावरून घेतलेली शाल आणि त्या शालीवरील त्रिदलाची नक्षीही अत्यंत सुंदर रीतीने दाखवली आहे.



**हडप्पाकालीन कलेचा नमुना**



**करून पहा.**

तुमच्या जवळच्या किराणा मालाच्या दुकानाला भेट द्या. दुकानदार दुकानासाठी वाणसामान कोठून आणतो याची माहिती घ्या. वस्तूंची यादी तयार करा.

## ३.६ व्यापार

हडप्पा संस्कृतीचे लोक भारतात त्याचप्रमाणे भारताबाहेरील देशांशी व्यापार करत असत. सिंधूच्या खोऱ्यात चांगल्या दर्जाचा कापूस होत असे. तो पश्चिम आशिया, दक्षिण युरोप आणि इजिप्त या प्रदेशांना निर्यात होत असे. सुती कापड देखील निर्यात होत असे. इजिप्तमध्ये मलमलीचे कापड हडप्पा संस्कृतीचे व्यापारी पुरवत असत. काश्मीर, दक्षिण भारत, इराण, अफगाणिस्तान, बलुचिस्तान येथून चांदी, जस्त, मौल्यवान खडे, माणके, देवदार लाकूड इत्यादी वस्तू आणल्या जात. परदेशांशी चालणारा व्यापार खुश्कीच्या आणि सागरी अशा दोन्ही मार्गांनी होत असे. उत्खननात सापडलेल्या काही मुद्रांवर जहाजांची चित्रे कोरलेली आहेत. लोथल येथे प्रचंड आकाराची गोदी सापडली आहे. हडप्पा संस्कृतीचा व्यापार अरबी समुद्राच्या किनाऱ्याने चालत असे.



**लोथल येथील गोदी (अवशेषांच्या आधारे पुनर्रचना)**

## ३.७ ऱ्हासाची कारणे

पुन्हा पुन्हा येणारे महापूर, बाहेरून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे, व्यापारातील घट यांसारख्या गोष्टी हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास होण्यास कारणीभूत होत्या. त्याचबरोबर पर्जन्यमान कमी होणे, नद्यांची पात्रे कोरडी पडणे, भूकंप, समुद्रपातळीतील बदल यांसारख्या कारणांमुळेही काही स्थळे उजाड झाली. अशा कारणांमुळे लोकांनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले आणि हडप्पा संस्कृतीमधील शहरांचा ऱ्हास झाला.

हडप्पा संस्कृती ही भरभराटीला आलेली संपन्न अशी नागर संस्कृती होती. तिने भारतीय संस्कृतीचा पाया घातला.

DSG7XH

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) या संस्कृतीला हडप्पा हे नाव का मिळाले असावे ?

(२) हडप्पा संस्कृतीतील भांड्यांच्या नक्षीच्या नमुन्यांमध्ये कोणत्या प्रतीकांचा समावेश आहे ?

(३) हडप्पा संस्कृतीतील व्यापारी कोणते कापड इजिप्तला पुरवत असत ?

**२. प्राचीन स्थळांना भेटी देताना काय कराल ?**

जसे- स्थळाविषयी माहिती मिळवाल, प्रदूषण रोखणे, ऐतिहासिक साधनांचे जतन इत्यादींबाबत.

**३. मोहेंजोदडो येथील स्नानगृहाचे चित्र रेखाटन करा.**

**४. हडप्पाकालीन लोकजीवनाची माहिती खाली दिलेल्या तक्त्यात लिहा.**

| मुख्य पिके | पोशाख | दागिने/अलंकार |
|---|---|---|
| (१) ---- | ---- | ---- |
| (२) ---- | ---- | ---- |
| (३) ---- | ---- | ---- |
| (४) ---- | ---- | ---- |

**५. एका शब्दात उत्तरे द्या. असे प्रश्न तुम्ही स्वत: तयार करा व त्यांची उत्तरे लिहा.**

जसे- हडप्पा संस्कृतीच्या मुद्रा तयार करण्यासाठी वापरलेला दगड.

**६. हडप्पा संस्कृतीच्या काळातील इतर जागतिक संस्कृती जगाच्या नकाशा आराखड्यात दाखवा.**

### उपक्रम

(१) तुमच्या शाळेचा आराखडा तयार करा व शाळेतील विविध ठिकाणे दर्शवा उदा., ग्रंथालय, मैदान, संगणक-कक्ष इत्यादी.

(२) तुमच्या गावातील आणि घरातील धान्य साठवण्याच्या पद्धतींचे सविस्तर टिपण तयार करा.

* * *



**हडप्पाकालीन खेळणी**

# ४. वैदिक संस्कृती

४.१ वैदिक वाङ्‌मय
४.२ कुटुंबव्यवस्था, दैनंदिन जीवन
४.३ शेती, पशुपालन, आर्थिक आणि सामाजिक जीवन
४.४ धर्मकल्पना
४.५ शासनव्यवस्था

## ४.१ वैदिक वाङ्‌मय

'वेद' वाङ्‌मयावर आधारलेली संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती होय. वेद हे आपले सर्वाधिक प्राचीन साहित्य मानले जाते. वेदांची निर्मिती अनेक ऋषींनी केली. वेदातील काही सूक्ते स्त्रियांनाही स्फुरलेली आहेत.

वैदिक वाङ्‌मयाची भाषा संस्कृत होती. वैदिक वाङ्‌मय अत्यंत समृद्ध आहे. ऋग्वेद हा त्यातील मूळ ग्रंथ मानला जातो. तो काव्यरूप आहे. ऋग्वेदासह यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत. या चार वेदांच्या ग्रंथांना 'संहिता' असे म्हणतात. विद् म्हणजे जाणणे. त्यापासून 'वेद' ही संज्ञा तयार झाली. तिचा अर्थ 'ज्ञान' असा होतो. मौखिक पठणाच्या आधारे वेदांचे जतन केले गेले. वेदांना 'श्रुति' असेही म्हणतात.

**ऋग्वेद संहिता :** ऋचांनी बनलेला वेद म्हणजे 'ऋग्वेद' होय. 'ऋचा' म्हणजे स्तुती करण्यासाठी रचलेले पद्य. अनेक ऋचा एकत्र गुंफून एखाद्या देवतेची स्तुती करण्यासाठी तयार केलेल्या काव्याला 'सूक्त' असे म्हणतात. ऋग्वेद संहितेत विविध देवतांची स्तुती करणारी सूक्ते आहेत.

**यजुर्वेद संहिता :** यजुर्वेद संहितेमध्ये यज्ञात म्हटले जाणारे मंत्र आहेत. यज्ञविधींमध्ये कोणत्या मंत्रांचे पठण केव्हा आणि कसे करावे याचे मार्गदर्शन या संहितेत आहे. पद्यात असणारे मंत्र आणि गद्यात दिलेले त्या मंत्रांचे स्पष्टीकरण अशी या संहितेची रचना आहे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**काही सूक्तांचा मराठी भाषेत अर्थ**

* "हे देवा, खूप पाऊस पाड. आमच्या शेतात भरघोस पीक येऊ दे. आमच्या मुलांबाळांना भरपूर दूधदुभते दे."
* "गाई आमच्या घरी येवोत. आमच्या गोठ्यात त्या आनंदाने राहोत. त्यांना पुष्कळ वासरे होवोत."
* "लोकहो, चला उठा. उषेच्या आगमनाबरोबर अंधार नाहीसा झाला आहे आणि प्रकाशाचे आगमन होत आहे. उषेने सर्व विश्वाला जागे केले आहे. आपण आपापले उद्योग करून धन मिळवूया."

**सामवेद संहिता :** काही यज्ञविधींच्या वेळी तालासुरांत मंत्रगायन केले जाई. ते गायन कसे करावे, याचे मार्गदर्शन सामवेद संहितेत केले आहे. भारतीय संगीताच्या निर्मितीमध्ये सामवेदाचा मोठा वाटा आहे.

**अथर्ववेद संहिता :** अथर्ववेदाच्या संहितेला अथर्व ऋषींचे नाव देण्यात आले आहे. अथर्ववेदात दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टींना महत्त्व दिलेले आढळते. आयुष्यात येणाऱ्या संकटांवर, दुखण्यांवर करायचे उपाय त्यात सांगितलेले आहेत. तसेच अनेक औषधी वनस्पतींची माहितीही त्यात दिलेली आहे. राजाने राज्य कसे करावे, याचेही मार्गदर्शन त्यात केलेले आहे.

संहितांच्या रचनेनंतर ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, उपनिषदे यांची रचना केली गेली. त्यांचाही समावेश वेदवाङ्‌मयात केला जातो.

**ब्राह्मणग्रंथ :** यज्ञविधींमध्ये वेदांचा वापर कसा करावा, हे सांगणाऱ्या ग्रंथांना 'ब्राह्मणग्रंथ' म्हणतात. प्रत्येक वेदाचे स्वतंत्र ब्राह्मणग्रंथ आहेत.

**आरण्यके :** अरण्यात जाऊन, एकाग्र चित्ताने

केलेले चिंतन 'आरण्यक' ग्रंथांमध्ये मांडलेले आहे. यज्ञविधी पार पाडत असताना कोणत्याही प्रकारची चूक होऊ नये, याची खबरदारी यात घेतलेली दिसते.

**उपनिषदे :** 'उपनिषद्' म्हणजे गुरूजवळ बसून मिळवलेले ज्ञान. जन्म-मृत्यूसारख्या घटनांबद्दल अनेक प्रश्न आपल्या मनात येत असतात. त्या प्रश्नांची उत्तरे सहज मिळत नाहीत. अशा गहन प्रश्नांवर उपनिषदांमध्ये चर्चा केलेली आहे.

चार वेद, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदे रचण्यास सुमारे पंधराशे वर्षांचा कालावधी लागला. त्या कालावधीत वेदकालीन संस्कृतीत अनेक बदल होत गेले. त्या बदलांचा आणि वेदकालीन लोकजीवनाचा अभ्यास करण्यासाठी वैदिक वाङ्मय हे महत्त्वाचे साधन आहे.

## ४.२ कुटुंबव्यवस्था, दैनंदिन जीवन

वेदकाळात एकत्र कुटुंबपद्धती होती. कुटुंबातील कर्ता पुरुष घराचा प्रमुख म्हणजे 'गृहपती' असे. गृहपतीच्या परिवारात त्याचे वृद्ध मातापिता, त्याचे लहान भाऊ आणि त्या भावांचे परिवार, त्याची पत्नी आणि मुले, त्याच्या मुलांचे परिवार अशा सर्वांचा समावेश असे. ही कुटुंबव्यवस्था पुरुषप्रधान होती. सुरुवातीच्या काळात लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी अशा काही विद्वान स्त्रियांचे उल्लेख वैदिक साहित्यात आढळतात. परंतु हळूहळू स्त्रियांवरील बंधने वाढत गेली. त्यांचे कुटुंबातील आणि समाजातील स्थान अधिकाधिक दुय्यम होत गेले.

वेदकाळातील घरे मातीची किंवा कुडाची असत. गवत किंवा वेलींचे जाडसर तट्टे विणून त्याच्यावर शेण-माती लिंपून तयार केलेली भिंत म्हणजे 'कूड'. या घरांच्या जमिनी शेणा-मातीने सारवलेल्या असत. घरासाठी 'गृह' किंवा 'शाला' हे शब्द वापरले जात.

वेदकालीन लोकांच्या आहारामध्ये प्रामुख्याने गहू, सातू, तांदूळ या तृणधान्यांचा समावेश होता. त्यांपासून ते विविध पदार्थ बनवत असत. वैदिक वाङ्मयात 'यव', 'गोधूम', 'व्रीहि' यांसारखे शब्द आढळतात. यव म्हणजे सातू (बार्ली). गोधूम म्हणजे गहू. व्रीही म्हणजे तांदूळ. दूध, दही, लोणी, तूप, मध हे पदार्थ त्यांच्या आवडीचे होते. उडीद, मसूर आणि तीळ तसेच मांस या पदार्थांचाही त्यांच्या आहारात समावेश होता.



**वेदकाळातील घरे**

वेदकालीन लोक लोकरी आणि सुती वस्त्रे वापरत. वल्कले म्हणजे झाडांच्या सालींपासून तयार केलेली वस्त्रेही वापरत. तसेच प्राण्यांच्या कातड्यांचाही उपयोग वस्त्र म्हणून केला जाई. स्त्रिया आणि पुरुष फुलांच्या माळा, विविध प्रकारच्या मण्यांच्या माळा, सोन्याचे दागिने वापरत असत. 'निष्क' नावाचा गळ्यातील दागिना विशेष लोकप्रिय असावा. त्याचा उपयोग वस्तूंच्या खरेदी-विक्रीसाठीही होई.

गायन, वादन, नृत्य, सोंगट्यांचा खेळ, रथांच्या शर्यती आणि शिकार ही त्यांची मनोरंजनाची साधने होती. वीणा, शततंतू, झांजा आणि शंख ही त्यांची प्रमुख वाद्ये होती. डमरू आणि मृदंग ही तालवाद्येही ते वापरत असत.



**वेदकाळातील वाद्ये**

## ४.३ शेती, पशुपालन, आर्थिक आणि सामाजिक जीवन

वैदिक काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. अनेक बैल जुंपलेल्या नांगराने नांगरट केली जाई. नांगराला लोखंडाचा फाळ बसवत असत. अथर्ववेदामध्ये पिकावर पडणारी कीड, पिकाचा विध्वंस करणारे प्राणी आणि त्यांवरील उपाय यांचाही विचार केलेला आढळतो. खत म्हणून शेणाचा उपयोग केला जात असे.


वैदिक काळात घोडा, गाय-बैल, कुत्रा या प्राण्यांना विशेष महत्त्व होते. गाईंचा विनिमयासाठी उपयोग केला जाई. त्यामुळे गाईंना विशेष किंमत होती. इतरांनी गाई चोरून नेऊ नयेत म्हणून विशेष काळजी घेतली जाई. घोडा हा अत्यंत वेगाने पळणारा प्राणी. त्याला माणसाळवून रथाला जोडण्यात वेदकालीन लोक निष्णात होते. वेदकालीन रथाची चाके आऱ्यांची होती. भरीव चाकांपेक्षा आऱ्यांचे चाक वजनाने हलके असते. घोडा जोडलेले, आऱ्यांच्या चाकांचे वेदकालीन रथ अर्थातच खूप वेगवान होते.



वेदकालीन रथ

**माहीत आहे का तुम्हांला?**

घोड्याला 'अश्व' असे म्हणतात. एखाद्या इंजिनचा वेग मोजण्यासाठी जे एकक वापरले जाते त्याला 'अश्वशक्ती' (हॉर्स पॉवर) असे म्हणतात.



त्या काळात शेती आणि पशुपालन यांच्याखेरीज इतर अनेक व्यवसायांचाही विकास झाला होता. व्यावसायिक, कारागीर समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक होते. 'श्रेणी' या नावाने ओळखले जाणारे त्यांचे स्वतंत्र संघ होते. अशा श्रेणींच्या प्रमुखाला 'श्रेष्ठी' म्हणत असत. परंतु हळूहळू व्यावसायिक कारागिरांचा दर्जा दुय्यम होत गेला.

त्या काळात समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे वर्ण होते. हे वर्ण व्यवसायावरून ठरत. नंतरच्या काळात वर्ण जन्मावरून ठरू लागले. त्यामुळे जाती निर्माण झाल्या. जातिव्यवस्थेमुळे समाजात विषमता निर्माण झाली.

आदर्श आयुष्य कसे जगावे, यासंबंधीच्या काही कल्पना वेदकाळात रूढ झाल्या होत्या. त्यांमध्ये जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या चार टप्प्यांना 'चार आश्रम' असे म्हटलेले आहे. पहिला आश्रम म्हणजे 'ब्रह्मचर्याश्रम'. गुरूजवळ राहून विद्या प्राप्त करण्याचा हा काळ.

ब्रह्मचर्याश्रम यशस्वी रीतीने पार पाडल्यानंतरचा पुढचा टप्पा म्हणजे गृहस्थाश्रम. या काळात पुरुषाने कुटुंब आणि समाज यांच्यासाठी असलेली आपली कर्तव्ये पत्नीच्या साहाय्याने पार पाडावीत, अशी अपेक्षा असे. तिसरा आश्रम म्हणजे 'वानप्रस्थाश्रम'. या



गुरू–शिष्य

टप्प्यावर त्याने घरादाराच्या मोहाचा त्याग करून दूर जावे, मनुष्यवस्ती नसलेल्या ठिकाणी रहावे आणि अत्यंत साधेपणाने जगावे. चौथा आश्रम म्हणजे 'संन्यासाश्रम'. या टप्प्यावर मनुष्याने सर्व नात्यांचा त्याग करून मनुष्यजन्माचा अर्थ समजावून घेण्यासाठी जगावे, फार काळ एके ठिकाणी राहू नये, असा संकेत होता.

### ४.४ धर्मकल्पना

वेदकालीन धर्मकल्पनांमध्ये निसर्गातील सूर्य, वारा, पाऊस, वीज, वादळे, नद्या यांसारख्या निसर्गातील शक्तींना देवतारूप दिलेले होते. त्या जीवनदायी ठराव्यात म्हणून वेदांमध्ये त्यांच्या प्रार्थना केलेल्या आहेत. त्यांना प्रसन्न ठेवण्यासाठी वेदकालीन लोक अग्नीमध्ये विविध पदार्थ अर्पण करत. त्याला 'हवी' असे म्हणत. अशा तऱ्हेने अग्नीमध्ये 'हवी' अर्पण करण्याचा विधी म्हणजे यज्ञ. सुरुवातीला यज्ञविधींचे स्वरूप साधे होते. पुढे त्यांचे नियम



यज्ञ

अधिकाधिक कठीण होत गेले. ते कठीण यज्ञविधी पार पाडणाऱ्या पुरोहितांचे महत्त्व त्यामुळे वाढत गेले.

वेदकालीन लोकांनी सृष्टीचे व्यवहार कसे चालतात याचाही विचार केला होता. उन्हाळ्यानंतर पावसाळा येतो, पावसाळ्यानंतर हिवाळा. हे नियमित असणारे सृष्टिचक्र आहे. सृष्टिचक्र आणि त्याच्या गतीने फिरणारे जीवनचक्र याला वेदकालीन लोकांनी 'ऋत' असे नाव दिले. प्राणिमात्रांचे जीवन हाही सृष्टिचक्राचाच एक भाग आहे. सृष्टिचक्रात बिघाड झाल्यावर संकटे येतात. तसे होऊ नये म्हणून प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. कोणीही सृष्टीचे नियम मोडू नयेत, असे वागणे म्हणजे धर्माप्रमाणे वागणे, असे समजले जाई.

**चला, चर्चा करू.**

सृष्टिचक्रात बिघाड कशामुळे होऊ शकतात? ते होऊ नयेत म्हणून तुम्ही कोणते प्रयत्न कराल? उदा., पाऊस कमी पडला तर पिण्याच्या पाण्याचे नियोजन कसे कराल?

### ४.५ शासनव्यवस्था

वेदकाळात प्रत्येक ग्रामवसाहतीचा एक प्रमुख असे. त्याला 'ग्रामणी' असे म्हणत. अनेक ग्रामवसाहतींचा समूह म्हणजे 'विश्'. त्याच्या प्रमुखाला 'विश्पति' असे म्हणत. अनेक 'विश्' मिळून 'जन' तयार होत असे. पुढे जन जेव्हा एखाद्या विशिष्ट प्रदेशात स्थिरावले, तेव्हा त्या प्रदेशाला 'जनपद' म्हटले गेले. 'जन'च्या प्रमुखाला 'नृप' किंवा 'राजा' म्हटले जाई. प्रजेचे रक्षण करणे, कर गोळा करणे आणि उत्तम राज्यकारभार करणे ही राजाची कर्तव्ये होती.

राज्यकारभार उत्तम रीतीने चालवण्यास साहाय्य करण्यासाठी राजाने अधिकारी नेमलेले असत. पुरोहित आणि सेनापती हे विशेष महत्त्वाचे अधिकारी होते. करवसुली करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्याला

'भागदुघ' असे म्हणत. 'भाग' म्हणजे वाटा. 'जन'च्या उत्पन्नातील राजाचा 'भाग' गोळा करणारा, तो भागदुघ. राजाला मार्गदर्शन करण्यासाठी 'सभा', 'समिती', 'विदथ' आणि 'जन' अशा चार संस्था होत्या. त्यांमध्ये राज्यातील लोक सहभागी होत. 'सभा' आणि 'विदथ' या संस्थांच्या कामकाजात स्त्रियांचाही सहभाग असे. राज्यातील ज्येष्ठ व्यक्तींच्या मंडळास 'सभा' म्हणत तर लोकांच्या सर्वसाधारण बैठकीस 'समिती' असे म्हणत. समितीमध्ये लोकांचा सहभाग असे.

पुढे वैदिक विचारप्रवाहात 'स्मृति' व 'पुराण' नावाचे वाङ्मय निर्माण झाले. वेद, स्मृती, पुराणे, स्थानिक लोकधारणा इत्यादींवर आधारलेला धार्मिक प्रवाह कालांतराने 'हिंदू' या नावाने ओळखला जाऊ लागला.

प्राचीन भारतात यज्ञविधी आणि वर्णव्यवस्था यांच्याबाबतीत वैदिक प्रवाहापेक्षा वेगळी भूमिका घेणारे धार्मिक प्रवाह अस्तित्वात होते. पुढील पाठात आपण त्यांचा परिचय करून घेणार आहोत.

## स्वाध्याय

**१. पाठातील आशयाचा विचार करून उत्तरे लिहा.**

(१) वैदिक साहित्यातील विद्‌वान स्त्रिया

....................................

(२) वेदकालीन मनोरंजनाची साधने

....................................

(३) वेदकालीन चार आश्रम

....................................

**२. चूक की बरोबर ओळखा.**

(१) यज्ञात म्हटले जाणारे मंत्र-ऋग्वेद

(२) अथर्व ऋषींचे नाव दिलेला वेद-अथर्ववेद

(३) यज्ञविधींच्या वेळी मंत्रगायन करण्यास मार्गदर्शन करणारा वेद-सामवेद

**३. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(१) वैदिक वाङ्मयाची भाषा......... .

(२) विद्‌ म्हणजे......... .

(३) गोधूम म्हणजे......... .

(४) घराचा प्रमुख म्हणजे......... .

(५) श्रेणींच्या प्रमुखाला म्हणत......... .

**४. नावे लिहा.**

(१) तुम्हांस माहीत असलेली वाद्ये

............................ .

(२) सध्याच्या काळातील स्त्रियांचे किमान दोन दागिने ............................ .

(३) सध्याची मनोरंजनाची साधने

............................ .

**५. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) वेदकालीन लोकांच्या आहारामध्ये कोणकोणत्या पदार्थांचा समावेश होता?

(२) वेदकाळात गाईंची विशेष काळजी का घेतली जाई?

(३) संन्यासाश्रमात मनुष्याने कसे वागावे अशी अपेक्षा होती?

**६. टीपा लिहा.**

(१) वेदकालीन धर्मकल्पना

(२) वेदकालीन घरे

(३) वेदकालीन शासनव्यवस्था

**उपक्रम**

(१) आपल्या परिसरातील काही कारागिरांच्या मुलाखती घेऊन त्यांची माहिती लिहा.

(२) पाठात आलेले नवीन शब्द व त्यांचे अर्थ यांची यादी करा.

* * *

DSQ3Z5

# ५. प्राचीन भारतातील धार्मिक प्रवाह

५.१ जैन धर्म
५.२ बौद्‌ध धर्म
५.३ ज्यू धर्म
५.४ ख्रिश्चन धर्म
५.५ इस्लाम धर्म
५.६ पारशी धर्म

वेदकाळाच्या शेवटी यज्ञविधींमधील बारीकसारीक तपशिलांना नको एवढे महत्त्व आले. त्या तपशिलांचे ज्ञान फक्त पुरोहित वर्गालाच होते. इतरांना ते मिळवण्याची मोकळीक राहिली नाही. वर्णव्यवस्थेचे निर्बंध अत्यंत कडक होत गेले. माणसाच्या कर्तृत्वापेक्षा त्याचा जन्म कोणत्या वर्णात झाला, यावर त्याचे समाजातील स्थान ठरू लागले. त्यामुळेच उपनिषदांच्या काळापासून धर्माचा विचार यज्ञविधींपुरताच मर्यादित न ठेवता तो अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचे दिसते. परंतु उपनिषदांमधील विचार आत्म्याचे अस्तित्व, आत्म्याचे स्वरूप यांवर भर देणारा होता. सर्वसामान्यांना समजायला अवघड होता. त्यामुळे विशिष्ट देवतांच्या उपासनेवर भर देणारे भक्तिपंथ निर्माण झाले. जसे, शिवभक्तांचा शैवपंथ आणि विष्णुभक्तांचा वैष्णवपंथ. या देवतांच्या संदर्भात वेगवेगळी पुराणे लिहिली गेली.

इ.स.पू. सहाव्या शतकात सर्वसाधारण मनुष्याला सहज कळेल असा धर्माचा विचार मांडण्याचा प्रयत्न करणारे विचारप्रवाह निर्माण झाले. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या उन्नतीचा मार्ग शोधण्याचे स्वातंत्र्य आहे, याची जाणीव अनेकांना झाली. त्यातून पुढे नवीन धर्म प्रस्थापित झाले. व्यक्तीच्या उन्नतीसाठी जातीपातीचा भेदभाव महत्त्वाचा नसतो, हे या धर्मांनी ठळकपणे मांडले. त्यांनी शुद्‌ध आचरणाचे महत्त्व लोकांच्या मनावर ठसवले. नवीन विचारांच्या प्रवर्तकांमध्ये वर्धमान महावीर आणि गौतम बुद्‌ध यांचे कार्य विशेष महत्त्वाचे आहे.

## ५.१ जैन धर्म

जैन धर्म हा भारतातील प्राचीन धर्मांपैकी एक धर्म आहे. या धर्मात 'अहिंसा' या तत्त्वाला महत्त्व दिलेले आहे. धर्मज्ञान प्रकट करणाऱ्यास जैन धर्मात तीर्थंकर म्हणतात. जैन परंपरेत सांगितल्याप्रमाणे एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले. वर्धमान महावीर जैन धर्माच्या परंपरेतील चोविसावे तीर्थंकर होत.



वर्धमान महावीर

### वर्धमान महावीर (इ.स.पू. ५९९ ते इ.स.पू. ५२७)

आज ज्या राज्याला आपण बिहार या नावाने ओळखतो, त्या राज्यामध्ये प्राचीन काळी वृज्जी नावाचे एक महाजनपद होते. त्याची राजधानी होती वैशाली. वैशाली नगराचा एक भाग असलेल्या कुंडग्राम येथे वर्धमान महावीरांचा जन्म झाला. त्यांच्या पित्याचे नाव सिद्‌धार्थ आणि आईचे नाव त्रिशला होते.

वर्धमान महावीरांनी ज्ञानप्राप्तीसाठी घरादाराचा त्याग केला. साडेबारा वर्षे तपश्चर्या केल्यानंतर त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. हे ज्ञान 'केवल' म्हणजे 'विशुद्‌ध' स्वरूपाचे होते, म्हणून त्यांना 'केवली' असे म्हटले जाते. शरीराला सुखकारक वाटणाऱ्या गोष्टींनी होणारा आनंद आणि त्रासदायक गोष्टींनी होणारी पीडा, यांचा स्वतःवर काहीही परिणाम होऊ न देणे, म्हणजे विकारांवर विजय मिळवणे. असा विजय त्यांनी मिळवला, म्हणून त्यांना 'जिन' म्हणजे 'जिंकणारा',

असे म्हटले जाऊ लागले. 'जिन' या शब्दापासून जैन हा शब्द तयार होतो. विकारांवर विजय मिळवणारे महान वीर म्हणून वर्धमान यांना महावीर म्हटले जाते. ज्ञानप्राप्तीनंतर लोकांना धर्म समजावून सांगण्यासाठी त्यांनी सुमारे तीस वर्षे उपदेश केला. लोकांना धर्म सहजपणे कळावा म्हणून वर्धमान महावीर 'अर्धमागधी' या लोकभाषेतून लोकांशी संवाद साधत. त्यांनी सांगितलेला धर्म हा शुद्‌ध आचरणावर भर देणारा होता. शुद्‌ध आचरणासाठी त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे सार पंचमहाव्रते आणि त्रिरत्ने यांमध्ये सामावलेले आहे. लोकांना उपदेश करण्यासाठी तीर्थंकरांच्या ज्या सभा होत, त्यांना 'समवसरण' असे अर्धमागधी भाषेत म्हणत असत, हे समवसरण समतेवर आधारलेले असे. या समवसरणांमध्ये सर्व वर्णांतील लोकांना प्रवेश असे.

**पंचमहाव्रते :** पंचमहाव्रते म्हणजे अत्यंत काटेकोरपणे पाळण्याचे पाच नियम.

**१. अहिंसा :** कोणत्याही जीवाला दुखापत होईल किंवा त्याची हिंसा होईल, असे वागू नये.

**२. सत्य :** प्रत्येक वचन आणि कृती खरेपणाची असावी.

**३. अस्तेय :** 'स्तेय' म्हणजे चोरी. दुसऱ्याच्या मालकीची किंवा हक्काची गोष्ट मालकाच्या संमतीशिवाय घेणे म्हणजे चोरी. चोरी न करणे, म्हणजे अस्तेय.

**४. अपरिग्रह :** मनात हाव बाळगून मालमत्तेचा साठा करण्याकडे माणसाचा कल असतो. असा साठा न करणे, म्हणजे अपरिग्रह.

**५. ब्रह्मचर्य :** शरीराला सुखकारक वाटणाऱ्या गोष्टींचा त्याग करून व्रतांचे पालन करणे म्हणजे ब्रह्मचर्य.

**त्रिरत्ने :** त्रिरत्ने म्हणजे १. 'सम्यक्‌ दर्शन', २. 'सम्यक्‌ ज्ञान' आणि ३. 'सम्यक्‌ चारित्र' ही तीन तत्त्वे. सम्यक्‌ याचा अर्थ 'संतुलित' असा आहे.

**१. सम्यक्‌ दर्शन :** तीर्थंकरांच्या उपदेशातील सत्य जाणून घेऊन त्यावर श्रद्‌धा ठेवणे.

**२. सम्यक्‌ ज्ञान :** तीर्थंकरांच्या उपदेशाचा आणि तत्वज्ञानाचा नित्य अभ्यास करून, त्याचा सखोल अर्थ समजून घेणे.

**३. सम्यक्‌ चारित्र :** पंचमहाव्रतांचे काटेकोर आचरण करणे.

**उपदेशाचे सार :** महावीरांच्या उपदेशातील 'अनेकान्तवाद' म्हटला जाणारा सिद्‌धान्त सत्याच्या शोधासाठी फार महत्त्वाचा मानला जातो. अनेकान्त या शब्दातील 'अन्त' या शब्दाचा 'पैलू' असा अर्थ आहे. सत्याचा शोध घेताना विषयाच्या केवळ एखाददुसऱ्या पैलूवर लक्ष देऊन निष्कर्ष काढल्यास सत्याचे पूर्ण ज्ञान होऊ शकत नाही. म्हणून त्या विषयाच्या अनेक पैलूंकडे लक्ष देणे आवश्यक असते, असे या सिद्‌धान्तात मानण्यात आले आहे. या सिद्‌धान्तामुळे समाजामध्ये स्वतःच्या मतांविषयी दुराग्रह धरण्याची वृत्ती राहत नाही. इतरांच्या मतांविषयी सहिष्णुता निर्माण होते.

मनुष्याचा मोठेपणा त्याच्या वर्णावर अवलंबून नसून त्याच्या उत्तम चारित्र्यावर अवलंबून असतो, अशी वर्धमान महावीरांची शिकवण होती. स्त्रियांना ज्ञान मिळवण्याचे मार्ग वैदिक परंपरेमध्ये हळूहळू बंद झाले होते. मात्र वर्धमान महावीरांनी स्त्रियांनाही संन्यास घेण्याचा अधिकार दिला. सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करा, मनामध्ये इतरांबद्‌दल दया आणि करुणा असू द्या, जगा आणि जगू द्या, असा उपदेश त्यांनी केला.

## ५.२ बौद्‌ध धर्म

बौद्‌ध धर्माचा प्रसार भारत आणि भारताबाहेरील अनेक देशांमध्ये झाला. गौतम बुद्‌ध हे बौद्‌ध धर्माचे संस्थापक होते.

### गौतम बुद्‌ध (इ.स.पू. ५६३ ते इ.स.पू. ४८३)

गौतम बुद्‌धांचा जन्म नेपाळमधील लुंबिनी वनात झाला. त्यांच्या पित्याचे नाव होते शुद्‌धोदन आणि आईचे नाव होते मायादेवी. गौतम बुद्‌धांचे मूळ नाव



गौतम बुद्‌ध

होते सिद्‌धार्थ. त्यांना मानवी जीवनाचे संपूर्ण ज्ञान प्राप्त झाले होते, म्हणून त्यांना 'बुद्‌ध' असे म्हटले गेले. मानवी जीवनात दुःख का आहे, हा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला. एका वैशाख पौर्णिमेला बिहारमधील गया शहरापासून जवळच असलेल्या ऊरुवेला या ठिकाणी एका पिंपळाच्या झाडाखाली ते ध्यानस्थ बसले होते. त्या वेळी त्यांना 'बोधि' प्राप्त झाली. 'बोधि म्हणजे सर्वोच्च ज्ञान'. त्या पिंपळाच्या वृक्षाला आता 'बोधिवृक्ष' असे म्हणतात. तसेच 'ऊरुवेला' या



बोधिवृक्ष

स्थानाला 'बोधगया' असे म्हणतात. त्यांनी त्यांचे पहिले प्रवचन वाराणसीजवळ सारनाथ येथे दिले. या प्रवचनात त्यांनी जो उपदेश केला, त्यास 'धम्म' असे म्हटले जाते. या प्रवचनाद्‌वारे त्यांनी धम्माच्या चक्राला गती दिली म्हणून या घटनेला 'धम्मचक्कपवत्तन' असे पाली भाषेत म्हटले जाते. संस्कृतमध्ये त्याला धर्मचक्रप्रवर्तन असे म्हटले जाते. नंतरच्या काळात त्यांनी धम्माचा उपदेश करण्यासाठी सुमारे पंचेचाळीस वर्षे चारिका केली. चारिका म्हणजे पायी फिरणे. त्यांनी आपला उपदेश पाली या लोकभाषेत केला. बौद्‌ध धम्मामध्ये बुद्‌ध, धम्म आणि संघ यांना शरण जाण्याची संकल्पना महत्त्वाची आहे. या संकल्पनेला 'त्रिशरण' असे म्हणतात. त्यांनी सांगितलेल्या धम्माचे सार पुढीलप्रमाणे आहे.

**आर्यसत्ये :** मानवी जीवनातील सर्व व्यवहारांच्या मुळाशी चार सत्ये आहेत. त्यांना आर्यसत्ये म्हटलेले आहे.

**१. दुःख :** मानवी जीवनात दुःख असते.

**२. दुःखाचे कारण :** दुःखाला कारण असते.

**३. दुःख-निवारण :** दुःख दूर करता येते.

**४. प्रतिपद :** प्रतिपद म्हणजे मार्ग. हा दुःखाचा अंत करण्याचा मार्ग आहे. हा मार्ग शुद्‌ध आचरणाचा आहे. या मार्गाला 'अष्टांगिक मार्ग' असे म्हटले आहे.

**पंचशील :** गौतम बुद्‌धांनी पाच नियमांचे पालन करण्यास सांगितले. त्या नियमांनाच 'पंचशील' असे म्हणतात.

१. प्राण्यांची हत्या करण्यापासून दूर राहणे.

२. चोरी करण्यापासून दूर राहणे.

३. अनैतिक आचरणापासून दूर राहणे.

४. असत्य बोलण्यापासून दूर राहणे.

५. मादक पदार्थांच्या सेवनापासून दूर राहणे.

**बौद्‌ध संघ :** आपल्या धम्माचा उपदेश करण्यासाठी त्यांनी भिक्खूंचा संघ निर्माण केला. गृहस्थ जीवनाचा त्याग करून संघात प्रवेश करणाऱ्या त्यांच्या अनुयायांना 'भिक्खू' असे म्हटले जाते. बुद्‌धांप्रमाणे भिक्खूही चारिका करून लोकांना धम्माचा उपदेश करत असत. स्त्रियांचा स्वतंत्र संघ होता. त्यांना भिक्खुनी असे म्हणतात. बौद्‌ध धर्मात सर्व वर्णांतील व जातींमधील लोकांना प्रवेश होता.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**अष्टांगिक मार्ग**

१. **सम्यक् दृष्टी :** चार आर्यसत्यांचे ज्ञान होय.
२. **सम्यक् संकल्प :** हिंसा वगैरे तत्त्वांचा त्याग होय.
३. **सम्यक् वाचा :** असत्य, चहाडी, कठोरता आणि निरर्थक बडबड न करणे.
४. **सम्यक् कर्मान्त :** प्राण्यांची हत्या, चोरी आणि स्वैराचार यांच्यापासून दूर राहणे.
५. **सम्यक् आजीव :** उपजीविका गैर मार्गाने न करता योग्य मार्गाने करणे.
६. **सम्यक् व्यायाम :** व्यायाम म्हणजे प्रयत्न करणे होय. वाईट कर्मे उत्पन्न होऊ नयेत; उत्पन्न झाली असल्यास त्यांचा त्याग करावा; चांगली कर्मे उत्पन्न व्हावीत; तसेच, उत्पन्न झाली असल्यास ती नष्ट होऊ नयेत, यासाठी प्रयत्न करणे.
७. **सम्यक् स्मृती :** मन एकाग्र करून लोभ वगैरे विकारांना दूर करणे आणि आपले चित्त वगैरेंना योग्य रीतीने समजून घेणे.
८. **सम्यक् समाधी :** चित्त एकाग्र करून ध्यानाचा अनुभव घेणे.

**उपदेशाचे सार :** गौतम बुद्धांनी मानवी बुद्धीच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. वर्ण वगैरेंच्या आधारे मानली जाणारी विषमता नाकारली. जन्माने कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नाही, तर आचरणावरूनच श्रेष्ठ कनिष्ठता ठरते. 'छोटीशी चिमणीदेखील आपल्या घरट्यात स्वच्छंदपणाने चिवचिवते' हे त्यांचे वचन विख्यात आहे. ते स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांविषयींचे त्यांचे चिंतन दर्शवते. त्यांनी पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही स्वतःची उन्नती करण्याचा अधिकार आहे असा उपदेश केला. यज्ञासारख्या कर्मकांडाला विरोध केला. त्यांनी उपदेशलेली प्रज्ञा, शील, इत्यादी मूल्ये मानवाचे कल्याण साधणारी आहेत. सर्व प्राणिमात्रांविषयीची 'करुणा' हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे असाधारण वैशिष्ट्य होते.

गौतम बुद्धांनी उपदेशलेली सहिष्णुता केवळ भारतीय समाजालाच नव्हे, तर सर्व मानवजातीला आजही मार्गदर्शक आहे.

**लोकायत :** लोकायत किंवा चार्वाक या नावाने ओळखला जाणारा प्राचीन काळातील विचारप्रवाहही महत्त्वाचा आहे. त्याचा भर स्वतंत्र विचारावर होता. त्याने वेदांचे प्रामाण्य नाकारले.

प्राचीन काळात भारतीय भूमीत नवनवीन धार्मिक विचारांचे स्रोत निर्माण होत राहिले. कालांतराने ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम आणि पारशी हे धर्म भारतीय समाजात रुजले.

## ५.३ ज्यू धर्म

ज्यू धर्माचे लोक साधारणपणे इसवी सनाच्या पहिल्या ते तिसऱ्या शतकात केरळमधील कोची येथे आले असावेत. ज्यू धर्माला 'यहुदी' धर्म असेही म्हटले जाते. देव एकच आहे, असे ज्यू धर्मीय मानतात. ज्यू धर्माच्या शिकवणीत न्याय, सत्य, शांती, प्रेम, करुणा, विनम्रता, दान करणे, चांगले बोलणे आणि स्वाभिमान या गुणांवर भर दिलेला आहे. त्यांच्या प्रार्थनास्थळाला 'सिनॅगॉग' असे म्हणतात.



**सिनॅगॉग**

## ५.४ ख्रिश्चन धर्म

ख्रिश्चन धर्माची स्थापना येशू ख्रिस्तांनी केली. तो जगभर पसरला आहे. येशू ख्रिस्तांच्या १२ शिष्यांपैकी

एक असणारे सेंट थॉमस हे इसवी सनाच्या पहिल्या शतकात केरळमध्ये आले. त्यांनी त्रिचूर जिल्ह्यातील पल्लयूर येथे इसवी सन ५२ मध्ये चर्चची स्थापना केली. ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीनुसार देव एकच आहे. तो सर्वांचा प्रेमळ पिता आहे आणि सर्वशक्तिमान आहे. येशू ख्रिस्त हे देवाचे पुत्र असून मानवजातीच्या उद्धारासाठी पृथ्वीवर आलेले होते असे मानले जाते. आपण सारे एकमेकांचे बंधुभगिनी आहोत. आपण सर्वांवर प्रेम केले पाहिजे, अगदी शत्रूवर देखील. चुकलेल्यांना क्षमा केली पाहिजे, असे ख्रिश्चन धर्मामध्ये सांगितले आहे. 'बायबल' हा ख्रिश्चन धर्माचा पवित्र धर्मग्रंथ आहे. ख्रिश्चन लोकांच्या प्रार्थनास्थळाला 'चर्च' असे म्हणतात.



**चर्च**

## ५.५ इस्लाम धर्म

इस्लाम हा एकेश्वरवाद मानणारा धर्म आहे. अल्ला एकच असून मुहम्मद पैगंबर त्याचे प्रेषित आहेत. ईश्वराचा संदेश पैगंबरांमार्फत पवित्र कुरआन या धर्मग्रंथामधून प्रकट झालेला आहे. 'इस्लाम' या शब्दाचा अर्थ 'शांती' असा आहे. या शब्दाचा अर्थ 'अल्लाहला शरण जाणे' असाही होतो. सर्वकाळी आणि सर्वत्र फक्त अल्लाह आहे, तो सर्वशक्तिमान आणि परम दयाळू आहे, असे इस्लाममध्ये सांगितलेले आहे. मानवी अस्तित्वाचा हेतू अल्लाहची उपासना करणे हाच आहे, असे मानलेले आहे. मनुष्याने आयुष्यात कसे वागावे, याचे मार्गदर्शन पवित्र 'कुरआन' या धर्मग्रंथात केलेले आहे. भारत आणि अरबस्तान यांमध्ये फार प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. अरबस्तानातील व्यापारी केरळच्या किनाऱ्यावरील बंदरांना भेट देत असत. इसवी सनाच्या सातव्या शतकात अरबस्तानात इस्लामचा प्रसार झाला. त्याच शतकात अरबी व्यापाऱ्यांमार्फत भारतामध्ये इस्लामचे आगमन झाले. इस्लाम धर्माच्या प्रार्थनास्थळाला 'मशीद' असे म्हणतात.



**मशीद**

## ५.६ पारशी धर्म

पारशी लोक आणि वैदिक संस्कृतीचे लोक यांच्यामध्ये प्राचीन काळापासून संबंध होते. पारशी धर्माच्या पवित्र ग्रंथाचे नाव 'अवेस्ता' असे आहे. 'ऋग्वेद' आणि अवेस्ता यांतील भाषेमध्ये साम्य आहे. पारशी लोक इराणच्या 'पार्स' किंवा 'फार्स' नावाच्या प्रांतातून भारतात आले, म्हणून त्यांना 'पारशी' या नावाने ओळखले जाते. ते प्रथम गुजरातमध्ये आले. ते इसवी सनाच्या आठव्या शतकात आले असावेत असे काहींचे मत आहे. झरथुष्ट्र हे पारशी धर्माचे संस्थापक होते. 'अहुर मज्द्' या नावाने त्यांच्या देवाचा उल्लेख केला जातो. पारशी धर्मामध्ये अग्नी आणि पाणी या दोन तत्त्वांना अत्यंत महत्त्व आहे. त्यांच्या देवळांमध्ये पवित्र अग्नी प्रज्वलित केलेला असतो. त्या देवळांना 'अग्यारी' असे म्हणतात. उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती ही तीन प्रमुख आचरणतत्त्वे हा पारशी विचारसरणीचा गाभा आहे.



अग्यारी

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(१) जैन धर्मात........या तत्वाला महत्त्व दिलेले आहे.

(२) सर्व प्राणिमात्रांविषयीची.........हे गौतम बुद्धांच्या व्यक्तिमत्त्वाचे असाधारण वैशिष्ट्य होते.

**२. थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) वर्धमान महावीरांनी कोणती शिकवण दिली ?

(२) गौतम बुद्धांचे कोणते वचन विख्यात आहे, त्यातून कोणती मूल्ये प्रकट होतात ?

(३) ज्यू धर्माच्या शिकवणीत कोणत्या गुणांवर भर दिलेला आहे ?

(४) ख्रिश्चन धर्मामध्ये काय सांगितले आहे ?

(५) इस्लाम धर्माची शिकवण काय सांगते ?

(६) पारशी विचारसरणीचा गाभा कोणता आहे ?

**३. टीपा लिहा.**

(१) आर्यसत्ये (२) पंचशील

**४. खाली दिलेल्या पंचमहाव्रते आणि त्रिरत्ने यांचे तक्त्यात वर्गीकरण करून लिहा.**

(१) अहिंसा (२) सम्यक् दर्शन (३) सत्य
(४) अस्तेय (५) सम्यक् ज्ञान (६) अपरिग्रह
(७) सम्यक् चारित्र (८) ब्रह्मचर्य

| पंचमहाव्रते | त्रिरत्ने |
|---|---|
| (१)................ | (१)................ |
| (२)................ | (२)................ |
| (३)................ | (३)................ |
| (४)................ | |
| (५)................ | |

**५. कारणे लिहा.**

(१) वर्धमान महावीरांना 'जिन' का म्हणू लागले ?

(२) गौतम बुद्धांना 'बुद्ध' असे का म्हटले गेले ?

**उपक्रम**


(१) विविध सणांची माहिती व चित्रे यांचा संग्रह करा.

(२) विविध धर्मांच्या प्रार्थनास्थळांना भेटी द्या व परिसर भेटीचे वर्णन वर्गात कथन करा.

* * *

DSYZ1S

# ६. जनपदे आणि महाजनपदे




६.१ जनपदे
६.२ महाजनपदे
६.३ मगध साम्राज्याचा उदय

**करून पहा.**

भारताच्या नकाशा आराखड्यात सोळा महाजनपदांची नावे लिहा.

## ६.१ जनपदे

साधारणपणे इ.स.पू. १००० ते इ.स.पू. ६०० हा कालखंड म्हणजे वैदिकोत्तर कालखंड मानला जातो. या काळात जनपदे अस्तित्वात आली. ही जनपदे म्हणजे छोटी छोटी राज्ये होती. भारतीय उपखंडाच्या वायव्येला असलेल्या आजच्या अफगाणिस्तानपासून पूर्वेला बिहार, बंगाल, ओडिशापर्यंतच्या प्रदेशात आणि दक्षिणेला महाराष्ट्रापर्यंत ही जनपदे पसरलेली

होती. आजच्या महाराष्ट्राचा काही भाग तेव्हाच्या 'अश्मक' या जनपदाने व्यापलेला होता. संस्कृत, पाली आणि अर्धमागधी साहित्यात या जनपदांची नावे आढळतात. ग्रीक इतिहासकारांच्या लिखाणातूनही त्यासंबंधीची माहिती मिळते. त्यांतील काही जनपदांमध्ये राजेशाही होती. काहींमध्ये मात्र गणराज्य होते. जनपदांमधील ज्येष्ठ व्यक्तींची 'गणपरिषद' असे. गणपरिषदेचे सदस्य एकत्रितपणे चर्चा करून राज्यकारभारासंबंधीचे निर्णय घेत असत. अशा चर्चा जिथे होत, त्या सभागृहास 'संथागार' असे म्हटले जाई. गौतम बुद्ध शाक्य गणराज्यातील होते. प्रत्येक जनपदाची स्वतंत्र नाणी होती.

## ६.२ महाजनपदे

**महाजनपदे**

### कोसल

- कोसल महाजनपदाचा विस्तार हिमालयाच्या पायथ्याशी नेपाळ आणि उत्तर प्रदेश या ठिकाणी झाला होता.
- या राज्यातील श्रावस्ती, कुशावती आणि साकेत ही नगरे प्रसिद्ध होती.
- श्रावस्ती ही कोसल महाजनपदाची राजधानी होती.
- गौतम बुद्ध श्रावस्तीमधील जेतवन या प्रसिद्ध विहारात दीर्घकाळ राहिले होते.
- कोसलचा राजा प्रसेनजित हा वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा समकालीन होता.
- कोसलचे राज्य मगधामध्ये विलीन झाले.

### वत्स

- वत्स महाजनपदाचा विस्तार उत्तर प्रदेशातील प्रयाग म्हणजे अलाहाबादच्या आसपासच्या प्रदेशात झाला होता.
- कोसम म्हणजेच प्राचीन काळचे कौशांबी नगर होय.
- हे एक महत्वाचे व्यापारी केंद्र होते.
- कौशांबीतील तीन अत्यंत श्रीमंत व्यापाऱ्यांनी गौतम बुद्ध आणि त्यांचे अनुयायी यांच्यासाठी तीन विहार बांधले होते.
- राजा उदयन हा गौतम बुद्धांचा समकालीन होता.
- राजा उदयनानंतर वत्स महाजनपदाचे स्वतंत्र अस्तित्व फार काळ टिकले नाही. ते अवंती महाजनपदाच्या राजाने जिंकून घेतले.

### अवंती

- मध्य प्रदेशातील माळवा प्रदेशामध्ये अवंती हे प्राचीन महाजनपद होते.
- उज्जयिनी (उज्जैन) हे नगर ही त्याची राजधानी होती.
- उज्जयिनी हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते.
- अवंतीचा राजा प्रद्योत हा वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा समकालीन होता.
- अवंतीचा राजा नंदीवर्धन याच्या कारकिर्दीत अवंती मगध साम्राज्यात विलीन झाले.

### मगध

- बिहारमधील पाटणा, गया या शहरांच्या आसपासचा प्रदेश आणि बंगालचा काही भाग या प्रदेशात प्राचीन मगध महाजनपद होते.
- राजगृह (राजगीर) ही त्याची राजधानी होती.
- महागोविंद या वास्तुविशारदाने बिंबिसाराचा राजवाडा बांधला होता.
- जीवक हा प्रसिद्ध वैद्य बिंबिसाराच्या दरबारात होता.
- बिंबिसाराने गौतम बुद्धांचे शिष्यत्व पत्करले होते.

काही जनपदे हळूहळू अधिक बलशाली झाली. त्यांच्या भौगोलिक सीमा विस्तारल्या. अशा जनपदांना महाजनपदे म्हटले जाऊ लागले. साहित्यातील उल्लेखांच्या आधारे असे दिसते, की इ.स.पू.६व्या शतकापर्यंत महाजनपदांमध्ये सोळा महाजनपदांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. त्यांतही कोसल, वत्स, अवंती आणि मगध ही चार महाजनपदे अधिक सामर्थ्यवान होत गेली.

### ६.३ मगध साम्राज्याचा उदय

बिंबिसाराचा मुलगा अजातशत्रू यानेही मगधाचा विस्तार करण्याचे धोरण स्वीकारले. त्याने पूर्वेकडील अनेक गणराज्ये जिंकून घेतली. अजातशत्रूच्या काळात मगधाची भरभराट झाली. त्याने बौद्ध धर्म स्वीकारला होता. गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर अजातशत्रूच्या कारकिर्दीत राजगृह येथे बौद्ध धर्माची पहिली संगिती म्हणजेच परिषद झाली.



**अजातशत्रू-शिल्प**

अजातशत्रूच्या काळात मगधाच्या पाटलीग्राम या नव्या राजधानीचा पाया घातला गेला. पुढे हेच पाटलिपुत्र या नावाने प्रसिद्ध झाले. पाटलिपुत्र आजच्या पाटणा शहराच्या परिसरात असावे.

अजातशत्रूनंतर होऊन गेलेल्या मगधाच्या राजांमध्ये शिशुनाग हा महत्त्वाचा राजा होता. त्याने अवंती, कोसल आणि वत्स ही राज्ये मगधाला जोडली. उत्तर भारताचा जवळजवळ सर्व प्रदेश मगधाच्या अमलाखाली आला. अशा रीतीने मगध साम्राज्य आकाराला आले.

**मगध साम्राज्याचे नंद राजे :** इ.स.पू. ३६४ ते इ.स.पू. ३२४ या काळात मगध साम्राज्यावर नंद राजांची सत्ता होती. एका मोठ्या साम्राज्याला आवश्यक अशी शासनव्यवस्था नंद राजांनी निर्माण केली. पायदळ, घोडदळ, रथदळ आणि हत्तीदळ असे चतुरंग सैन्य त्यांच्या पदरी होते. त्यांनी वजनमापांची प्रमाणित पद्धत सुरू केली.

नंद घराण्याच्या शेवटच्या राजाचे नाव धनानंद असे होते. त्याच्या काळापर्यंत मगध साम्राज्याचा विस्तार पश्चिमेकडे पंजाबपर्यंत झाला होता. धनानंदाच्या कारकिर्दीत चंद्रगुप्त मौर्य या महत्त्वाकांक्षी तरुणाने पाटलिपुत्र जिंकून घेतले, नंद राजवटीचा शेवट केला आणि मौर्य साम्राज्याचा पाया घातला.

पुढील पाठात आपण मौर्य साम्राज्याच्या उदयाच्या काळात भारताच्या वायव्य आणि पश्चिम भागावर झालेली परकीय आक्रमणे यांची माहिती करून घेऊ. तसेच मौर्य साम्राज्याची सविस्तर माहिती घेऊ.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

सोळा महाजनपदांची प्राचीन व आधुनिक नावे : (१) काशी (बनारस), (२) कोसल (लखनौ), (३) मल्ल (गोरखपूर) (४) वत्स (अलाहाबाद) (५) चेदि (कानपूर), (६) कुरु (दिल्ली), (७) पांचाल (रोहिलखंड), (८) मत्स्य (जयपूर), (९) शूरसेन (मथुरा), (१०) अश्मक (औरंगाबाद-महाराष्ट्र), (११) अवंती (उज्जैन), (१२) अंग (चंपा-पूर्व बिहार), (१३) मगध (दक्षिण-बिहार), (१४) वृज्जी (उत्तर बिहार), (१५) गांधार (पेशावर), (१६) कंबोज (गांधारजवळ)

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) जनपदे म्हणजे काय ?
(२) महाजनपदे म्हणजे काय ?
(३) बौद्‌ध धर्माची पहिली परिषद कोठे झाली ?
(४) वजनमापांची प्रमाणित पद्‌धत कोणी सुरू केली ?

**२. सांगा पाहू.**

(१) आजच्या महाराष्ट्राचा काही भाग तेव्हाच्या या जनपदाने व्यापला होता–
(२) जनपदांमधील ज्येष्ठ व्यक्तींची असे–
(३) ज्या सभागृहात चर्चा होत असे त्याला म्हटले जाई–
(४) गौतम बुद्‌ध गणराज्यातील होते–
(५) चतुरंग सैन्य–

**३. जोड्या जुळवा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (१) संगिती | (अ) अजातशत्रू |
| (२) धनानंद | (ब) परिषद |
| (३) पाटलीग्राम | (क) महागोविंद |
| | (ड) नंद राजा |

**४. भारतातील विविध घटकराज्ये व त्यांच्या राजधान्या यांची यादी तयार करा.**

**उपक्रम**

(१) तुमच्या परिसरातील किल्ल्याला भेट द्या व खालील मुद्द्यांना अनुसरून माहिती मिळवा.
(१) किल्ल्याचा प्रकार (२) कोणत्या राजवटीतील निर्मिती (३) किल्लेदार (४) प्रमुख वैशिष्ट्य
(२) भारतीय लष्करात कोणकोणती दले आहेत, त्यांची माहिती मिळवा.
(३) खालील तक्ता पूर्ण करा.

| अ. क्र. | महाजनपदाचे राज्य | ठिकाण | राजधानी | प्रमुख राजाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | --- | हिमालयाच्या पायथ्याशी | --- | --- |
| २. | वत्स | --- | --- | --- |
| ३. | --- | --- | --- | प्रद्योत |
| ४. | --- | पाटणा, गया या शहरांच्या आसपासचा प्रदेश | --- | --- |

* * *

DT8V3F

# ७. मौर्यकालीन भारत

**७.१ ग्रीक सम्राट सिकंदराची स्वारी**

**७.२ मौर्य साम्राज्य**

**माहीत आहे का तुम्हांला?**

इ.स.पू. सहाव्या शतकात इराणमध्ये सायरस नावाच्या राजाने मोठे साम्राज्य प्रस्थापित केले होते. हे साम्राज्य वायव्य भारतापासून रोमपर्यंत आणि आफ्रिकेतील इजिप्तपर्यंत पसरलेले होते. इ.स.पू. ५१८ च्या सुमारास दार्युश नावाच्या इराणी सम्राटाने भारताचा वायव्येकडील प्रदेश आणि पंजाबपर्यंतचा काही भाग जिंकून घेतला होता. दार्युशने या प्रदेशातील काही सैनिक आपल्या सैन्यात भरती केले होते. ग्रीक इतिहासकारांच्या लेखनातून त्यांची माहिती मिळते. सम्राट दार्युशच्या काळात भारत आणि इराण यांच्यामध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. त्यातून व्यापार आणि कला या क्षेत्रांतील देवाणघेवाण वाढली. सम्राट दार्युशने त्याच्या साम्राज्यात सर्वत्र 'दारिक' नावाचे एकाच प्रकारचे चलन लागू केले. त्यामुळे व्यापार करणे सोपे झाले. पर्सिपोलीस हे राजधानीचे शहर सम्राट दार्युशच्या काळात बांधले गेले. पर्सिपोलीस हे ठिकाण इराणमध्ये आहे.



दारिक

## ७.१ ग्रीक सम्राट सिकंदराची स्वारी

ग्रीक सम्राट अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर याने इ.स.पू. ३२६ मध्ये भारताच्या वायव्य प्रदेशावर स्वारी



सम्राट सिकंदर

केली. सिंधू नदी ओलांडून तो तक्षशिलेस आला. या मार्गावर काही स्थानिक भारतीय राजांनी त्याच्याशी निकराचा लढा दिला. तरीही पंजाबपर्यंत पोचण्यात सिकंदर यशस्वी झाला, मात्र या स्वारीत त्याच्या सैनिकांना फार हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. त्यांना मायदेशी जाण्याचे वेध लागले होते. त्यांनी त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. सिकंदराला माघार घेणे भाग होते. भारतातील जिंकलेल्या प्रदेशांच्या व्यवस्थेसाठी त्याने ग्रीक अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आणि त्यांना 'सत्रप' असे म्हटले. त्यानंतर तो परत फिरला. वाटेत बॅबिलोन येथे इ.स.पू. ३२३ मध्ये तो मरण पावला. हे स्थळ आजच्या इराकमध्ये आहे.

सिकंदराच्या आगमनामुळे भारत आणि पश्चिमेकडील जग यांच्यातील व्यापार वाढला. सिकंदराच्या बरोबर जे इतिहासकार होते, त्यांनी त्यांच्या लेखनातून पश्चिमेकडील जगाला भारताचा परिचय करून दिला. ग्रीक मूर्तिकलेचा भारतीय कलाशैलीवर प्रभाव पडला. त्यातून पुढे गांधार नावाच्या कलाशैलीचा उदय झाला. ग्रीक राजांची नाणी वैशिष्ट्यपूर्ण असत. त्यावर एका बाजूला ते नाणे पाडणाऱ्या राजाचे चित्र, तर दुसऱ्या बाजूला एखाद्या ग्रीक देवतेचे चित्र असे. नाण्यावर त्या राजाचे नाव असे. सिकंदराची नाणीही



**सिकंदराचे चांदीचे नाणे–दोन्ही बाजू**

अशाच प्रकारची होती. नंतरच्या काळात भारतातील राजांनीही अशा प्रकारची नाणी पाडण्यास सुरुवात केली.

### ७.२ मौर्य साम्राज्य

**चंद्रगुप्त मौर्य :** चंद्रगुप्त मौर्याने मौर्य साम्राज्याची स्थापना केली. मगधचा नंद राजा धनानंद याच्या जुलमी राजवटीला लोक कंटाळले होते. त्याचा पाडाव करून चंद्रगुप्त मौर्याने इ.स.पू. ३२५ च्या सुमारास मगधावर स्वतःची सत्ता प्रस्थापित केली. त्याने अवंती आणि सौराष्ट्र जिंकून घेऊन, आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यास सुरुवात केली. सिकंदराने नेमलेल्या सत्रपांमध्ये त्याच्या मृत्यूनंतर सत्तेसाठी लढाया सुरू झाल्या. सेल्युकस निकेटर हा सिकंदराचा सेनापती होता. सिकंदराच्या मृत्यूनंतर तो बॅबिलोनचा राजा झाला होता. त्याने वायव्य भारत आणि पंजाबवर आक्रमण केले. चंद्रगुप्त मौर्याने त्याच्या आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार केला. सेल्युकस निकेटरचा पराभव केल्यामुळे अफगाणिस्तानातील काबूल, कंदाहार, हेरात हे प्रदेश त्याच्या साम्राज्यात सामील झाले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

विशाखदत्त या संस्कृत नाटककाराने 'मुद्राराक्षस' हे नाटक लिहिले. त्यात धनानंदाचा नाश करून चंद्रगुप्त मौर्याने स्वतंत्र सत्ता कशी स्थापन केली. हे कथानक उलगडले आहे. या कथानकात आर्य चाणक्य किंवा कौटिल्य याच्या योगदानास विशेष महत्त्व दिले आहे.

मेगॅस्थिनिस हा सेल्युकस निकेटरचा राजदूत चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात राहिला होता. त्याच्या 'इंडिका' या ग्रंथातील वर्णन हे मौर्यकालीन भारताच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आहे.

गुजरात राज्यातील जुनागढजवळ सम्राट चंद्रगुप्त मौर्याने 'सुदर्शन' नावाचे धरण बांधलेले होते. तसा उल्लेख असलेला शिलालेख आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

जैन परंपरेनुसार चंद्रगुप्त मौर्याने जैन धर्माचा स्वीकार केला होता, असे मानले जाते. आयुष्याच्या शेवटी त्याने राजपदाचा त्याग केला. उरलेले आयुष्य तो कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथे राहिला. तेथेच त्याचा मृत्यू झाला.

**सम्राट अशोक :** चंद्रगुप्ताने राजपदाचा त्याग केल्यानंतर त्याचा मुलगा बिंदुसार मगधचा राजा झाला. बिंदुसारच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अशोक इ.स.पू. २७३ मध्ये सत्तेवर आला. राजा होण्यापूर्वी त्याची नेमणूक तक्षशिला आणि उज्जयिनी येथे राज्यपाल म्हणून करण्यात आली होती. तो राज्यपाल असताना तक्षशिला येथे झालेले बंड त्याने यशस्वीरीत्या मोडून काढले होते. मगधचे सम्राटपद प्राप्त झाल्यानंतर त्याने कलिंगवर स्वारी केली. कलिंग राज्याचा प्रदेश आजच्या ओडिशा राज्यात होता. सम्राट अशोकाने कलिंगवर विजय मिळवला.

वायव्येस अफगाणिस्तान आणि उत्तरेस नेपाळपासून दक्षिणेस कर्नाटक आणि आंध्र प्रदेशापर्यंत, तसेच पूर्वेस बंगालपासून पश्चिमेस सौराष्ट्रापर्यंत सम्राट अशोकाचे साम्राज्य पसरले होते.

**कलिंगचे युद्ध :** कलिंगच्या युद्धातील रक्तपात पाहून अशोकाने पुन्हा कधीही युद्ध न करण्याचा निर्णय घेतला. सत्य, अहिंसा, इतरांप्रति दया आणि क्षमावृत्ती




### हे नेहमी लक्षात ठेवा.

**सम्राट अशोकाचा संदेश**

- मातापित्यांची सेवा करणे चांगले आहे.
- ज्या विजयामुळे प्रेमभावना वाढते तोच खरा विजय.

### करून पहा.

भारताच्या नकाशा आराखड्यात सम्राट अशोकाचे शिलालेख व स्तंभलेख दर्शवणारी ठिकाणे दाखवा.

हे गुण त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. त्याचा संदेश लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्याने ठिकठिकाणी शिलालेख आणि स्तंभलेख कोरविले. हे लेख ब्राह्मी लिपीत आहेत. या लेखांमध्ये त्याने स्वत:चा उल्लेख 'देवानं पियो पियदसी' (देवाचा प्रिय प्रियदर्शी) असा केलेला आहे. राज्याभिषेक झाल्यानंतर आठ वर्षांनी त्याने कलिंगवर विजय मिळवला आणि तेथील विनाश पाहून त्याचे हृदयपरिवर्तन झाले, याचा उल्लेख त्याच्या एका लेखात आहे.

सम्राट अशोकाच्या दिल्ली-टोपडा येथील एका लेखात वटवाघळे, माकडे, गेंडे इत्यादींची शिकार करू नये, जंगलात वणवे लावू नयेत असे सक्त निर्बंध लिहून ठेवले होते.



सम्राट अशोक

**अशोकाचे धर्मप्रसाराचे कार्य :** अशोकाने स्वत: बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. त्याने पाटलिपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेस पाठवले होते. आग्नेय आशिया आणि मध्य आशिया येथील देशांमध्येही त्याने धर्मप्रचारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते. त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले.

**अशोकाची लोकोपयोगी कामे :** अशोकाने प्रजेसाठी सुखसोई निर्माण करण्यावर भर दिला. उदाहरणार्थ, माणसांना तसेच पशूंना मोफत औषधपाणी मिळावे, अशी सोय केली. अनेक रस्ते बांधले. सावलीसाठी रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली. धर्मशाळा बांधल्या. विहिरी खोदल्या.

**हे करून पहा.**

तुमच्या परिसरात कोणत्या संस्था कोणती लोकोपयोगी कामे करतात त्याचा अहवाल तयार करा.

**मौर्यकालीन राज्यव्यवस्था :** मौर्य साम्राज्याची राजधानी पाटलिपुत्र येथे होती. राज्यकारभाराच्या सोईसाठी साम्राज्याचे चार विभाग पाडलेले होते. प्रत्येक विभागाची स्वतंत्र राजधानी होती.

१. पूर्व विभाग - तोशाली (ओडिशा),
२. पश्चिम विभाग - उज्जयिनी (मध्य प्रदेश),
३. दक्षिण विभाग - सुवर्णगिरी (कर्नाटकातील कनकगिरी),
४. उत्तर विभाग - तक्षशिला(पाकिस्तान)

राज्यकारभारात राजाला सल्ला देण्यासाठी मंत्रिपरिषद असे. वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करणारे अनेक अधिकारी होते. या सर्वांवर देखरेख करण्यासाठी आणि शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी अत्यंत सक्षम असे हेरखाते होते.

**मौर्यकालीन लोकजीवन :** मौर्य काळात शेतीच्या उत्पादनाला खूप महत्त्व होते. शेतीबरोबरच व्यापार आणि इतर उद्योगही भरभराटीला आले होते. हस्तिदंतावरील कोरीव काम, कापड विणणे आणि रंगवणे, धातूकाम यांसारखे अनेक व्यवसाय होते. चकाकी असलेली काळ्या रंगाची मातीची भांडी घडवली जात. नौकाबांधणी हाही एक मोठ्या प्रमाणावरील उद्योग होता. धातुकामामध्ये इतर

धातूंबरोबर लोखंडाच्या वस्तू बनवण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले होते.

नगरांमध्ये आणि ग्रामांमध्ये उत्सव, समारंभ साजरे होत. त्यांमध्ये लोकांच्या मनोरंजनासाठी नृत्य गायनाचे कार्यक्रम होत. कुस्तीचे खेळ, रथांच्या शर्यती लोकप्रिय होत्या. सोंगट्यांचा खेळ आणि बुद्धिबळ यांसारखे खेळ आवडीने खेळले जात. बुद्धिबळाला 'अष्टपद' असे नाव होते.



स्तंभशीर्ष

**मौर्यकालीन कला आणि साहित्य :** सम्राट अशोकाच्या काळात शिल्पकलेला उत्तेजन मिळाले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारताची राजमुद्रा सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे तयार करण्यात आली आहे. सारनाथ येथील मूळ स्तंभावर चार सिंह आहेत. प्रत्येक सिंहाच्या प्रतिमेखाली आडव्या पट्टीवर चक्र आहे. त्यांपैकी आपणांस एकच चक्र पूर्णपणे दिसते. चक्राच्या एका बाजूस अश्व व दुसऱ्या बाजूस वृषभ आहे. राजमुद्रेची जी बाजू दिसत नाही त्या बाजूवर अशाच पद्धतीने हत्ती आणि सिंह हे दोन प्राणीही आहेत.

अशोकाने उभारलेले स्तंभ हे भारतीय शिल्पकलेचे उत्तम नमुने आहेत. त्याने उभारलेल्या स्तंभांवर सिंह, हत्ती, बैल यांसारख्या प्राण्यांची अतिशय उत्तम शिल्पे आहेत. सारनाथ येथील अशोकस्तंभावरील चक्र भारताच्या राष्ट्रध्वजावर झळकते आहे. त्या स्तंभावर चारही बाजूंस सिंह आहेत. समोरून पाहताना त्यातील तीनच आपल्याला दिसतात. ही भारताची राजमुद्रा आहे. त्याच्या काळात खोदली गेलेली बराबार टेकड्यांवरील लेणी प्रसिद्ध आहेत. ही लेणी बिहारमध्ये आहेत. भारतातील लेण्यांमध्ये ही लेणी सर्वांत प्राचीन आहेत.

सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्याला उतरती कळा आली. मौर्य काळानंतर भारतात अनेक

बराबार येथील लेणे



राज्ये उदयाला आली. काही साम्राज्येही उदयाला आली. मौर्य साम्राज्य प्राचीन भारतातील सर्वांत मोठे साम्राज्य होते. मौर्य काळानंतरच्या राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडी आपण पुढील पाठात समजावून घेणार आहोत.

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) सत्रपांमध्ये लढाया का सुरू झाल्या ?
(२) बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने श्रीलंकेस कोणास पाठवले ?
(३) मौर्य काळात कोणते व्यवसाय होते ?
(४) सम्राट अशोकाने उभारलेल्या स्तंभावर कोणत्या प्राण्यांची शिल्पे आहेत ?

**२. सांगा पाहू.**

(१) सत्रप
(२) सुदर्शन
(३) ‘देवानं पियो पियदसी’
(४) अष्टपद

**३. आठवा आणि लिहा.**

(१) चंद्रगुप्त मौर्य याच्या साम्राज्याची व्याप्ती
(२) सम्राट अशोक याच्या साम्राज्याची व्याप्ती

**४. जोड्या जुळवा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (१) सम्राट अलेक्झांडर | (अ) सेक्युलस निकेटरचा राजदूत |
| (२) मेगॅस्थिनिस | (ब) ग्रीकचा सम्राट |
| (३) सम्राट अशोक | (क) रोमचा सम्राट |
| | (ड) मगधचा सम्राट |

**५. तुम्हांला काय वाटते ?**

(१) सिकंदरला अखेर माघार घेणे भाग पडले.
(२) ग्रीक राजांची नाणी वैशिष्ट्यपूर्ण असत.
(३) सम्राट अशोकाने कधीही युद्ध न करण्याचा निर्णय घेतला.

**६. तुमच्या शब्दांत वर्णन करा.**

(१) सम्राट अशोकाची लोकोपयोगी कामे.
(२) मौर्यकालीन मनोरंजन आणि खेळाची साधने.

**७. आज युआन श्वांगसारखे परदेशी प्रवासी तुम्हांला भेटले तर तुम्ही काय कराल ?**

**उपक्रम**

(१) तुमच्या परिसरात लोकप्रतिनिधींनी केलेल्या लोकोपयोगी कामांची माहिती मिळवून सविस्तर लेखन करा.
(२) सम्राट अशोकाच्या जीवनाची अधिक माहिती मिळवून नाट्यीकरणाद्‌वारे वर्गात सादर करा.

* * *

DTHR53

# ८. मौर्य साम्राज्यानंतरची राज्ये




८.१ शुंग घराणे
८.२ इंडो-ग्रीक राजे
८.३ कुशाण राजे
८.४ गुप्त राजघराणे
८.५ वर्धन राजघराणे
८.६ ईशान्य भारतातील राजसत्ता

## ८.१ शुंग घराणे

सम्राट अशोकानंतर मौर्य सत्तेचे सामर्थ्य कमी होत गेले. शेवटच्या मौर्य राजाचे नाव बृहद्रथ असे होते. मौर्यांचा सेनापती पुष्यमित्र शुंग याने बंड करून बृहद्रथाची

हत्या केली आणि तो स्वतः राजा झाला.

## ८.२ इंडो–ग्रीक राजे

या काळात भारतीय उपखंडाच्या वायव्य प्रदेशामध्ये ग्रीक राजांची छोटी छोटी राज्ये होती. त्या राजांना 'इंडो–ग्रीक राजे' असे म्हटले जाते. प्राचीन भारतीय नाण्यांच्या इतिहासात या राजांची नाणी अत्यंत महत्त्वाची आहेत. एका बाजूवर राजाचे चित्र आणि दुसऱ्या बाजूला देवतेचे चित्र अशा पद्धतीची नाणी बनवण्याची त्यांची परंपरा होती. ती पुढे भारतात रुजली. इंडो–ग्रीक राजांमध्ये मिनँडर हा राजा प्रसिद्ध असून त्याने नागसेन या बौद्ध भिक्खूबरोबर बौद्ध तत्त्वज्ञानाची चर्चा केली होती. मिनँडर म्हणजेच मिलिंद. त्याने भिक्खू नागसेन यांना विचारलेल्या प्रश्नांतून 'मिलिंदपञ्ह' या ग्रंथाची निर्मिती झाली. 'पञ्ह' या पाली भाषेतील शब्दाचा अर्थ 'प्रश्न' असा होतो.



**मिनँडरचे चांदीचे नाणे – दोन्ही बाजू**

## ८.३ कुशाण राजे

भारतामध्ये निरनिराळ्या लोकांच्या टोळ्या बाहेरून सतत येत राहिल्या. त्यांमध्ये मध्य आशियातून आलेल्या 'कुशाण' नावाने ओळखल्या जाणाऱ्या टोळ्या होत्या. इसवी सनाच्या पहिल्या शतकात वायव्येकडील प्रदेशात आणि काश्मीरमध्ये त्यांनी राज्य स्थापन केले. भारतात सोन्याची नाणी पाडण्याची सुरुवात कुशाण राजांनी केली. नाण्यांवर गौतम बुद्ध आणि विविध भारतीय देवता यांच्या प्रतिमा वापरण्याची प्रथा कुशाण राजांनी सुरू केली. कुशाण राजा कनिष्क याने साम्राज्याचा विस्तार केला.

**सम्राट कनिष्क :** कनिष्काचे साम्राज्य पश्चिमेला काबूलपासून पूर्वेला वाराणसीपर्यंत पसरले होते. कनिष्काची सोन्याची आणि तांब्याची नाणी सापडली आहेत. कनिष्काच्या काळात बौद्ध धर्माची चौथी परिषद काश्मीरमध्ये भरवण्यात आली होती. कनिष्काने काश्मीरमध्ये कनिष्कपूर हे शहर वसवले होते. श्रीनगरजवळ असलेले काम्पूर नावाचे गाव म्हणजेच कनिष्कपूर असावे. कनिष्काच्या काळात अश्वघोष हा कवी होऊन गेला. त्याने 'बुद्धचरित' आणि 'वज्रसूचि' हे ग्रंथ लिहिले. कनिष्काच्या दरबारात चरक हा प्रसिद्ध वैद्य होता.



**कनिष्काचे सोन्याचे नाणे–दोन्ही बाजू**

### माहीत आहे का तुम्हांला?

कनिष्काचे सोन्याचे नाणे : हे नाणे सम्राट कनिष्काने पाडले होते. या नाण्याच्या दर्शनी बाजूवर ग्रीक लिपीत लिहिलेला 'शाओ नानो शाओ कनेष्की कोशानो' असा लेख आहे. याचा अर्थ 'राजाधिराज कनिष्क कुशाण' असा आहे. नाण्याच्या मागील बाजूस गौतम बुद्धाची प्रतिमा आहे आणि बाजूला ग्रीक लिपीत 'बोद्दो' म्हणजे बुद्ध लिहिले आहे.

## ८.४ गुप्त राजघराणे

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या शेवटी उत्तर भारतात गुप्त राजघराण्याच्या सत्तेचा उदय झाला. साधारणपणे तीन शतके गुप्त घराणे सत्तेवर होते. गुप्त राजघराण्याच्या संस्थापकाचे नाव 'श्रीगुप्त' असे होते. समुद्रगुप्त आणि दुसरा चंद्रगुप्त हे गुप्त घराण्यातील विशेष उल्लेखनीय राजे होते.

**समुद्रगुप्त :** पहिला चंद्रगुप्त या गुप्त राजाच्या कारकिर्दीत गुप्तांच्या राज्यविस्ताराची सुरुवात झाली. त्याचा मुलगा समुद्रगुप्त याने आसपासच्या राजांचा पराभव करून हा विस्तार आणखी वाढवला. त्याच्या कारकिर्दीत गुप्त सत्ता आसामपासून पंजाबपर्यंत पसरली होती. तमिळनाडूमधील कांचीपर्यंतचा पूर्व किनारपट्टीचा प्रदेशही त्याने जिंकला होता. समुद्रगुप्ताने मिळवलेल्या विजयांमुळे त्याच्या सत्तेचा दबदबा सर्वत्र वाढला होता. त्यामुळे वायव्येकडील राजे, तसेच श्रीलंकेतील राजा यांनीही त्याच्याशी मैत्रीचे करार केले. समुद्रगुप्ताचा पराक्रम आणि त्याने मिळवलेले विजय यांचे वर्णन प्रयागच्या स्तंभलेखात सविस्तर दिलेले आहे. हा लेख 'प्रयागप्रशस्ति' म्हणून ओळखला जातो. त्याला 'अलाहाबाद प्रशस्ती' असेही म्हणतात. समुद्रगुप्त वीणावादनात प्रवीण होता. समुद्रगुप्ताने विविध प्रकारच्या प्रतिमा असलेली नाणी काढली होती. त्यांतील एका प्रकारात तो स्वतः वीणा वाजवताना दिसतो. त्यावर 'समुद्रगुप्त' असे नाव लिहिलेले आहे.



**समुद्रगुप्ताचे सोन्याचे नाणे – दोन्ही बाजू**

**दुसरा चंद्रगुप्त :** दुसरा चंद्रगुप्त हा समुद्रगुप्ताचा मुलगा होता. गुप्तांचे साम्राज्य त्याने वायव्येकडे वाढवले. त्याने माळवा, गुजरात आणि सौराष्ट्र जिंकून घेतले होते. दुसऱ्या चंद्रगुप्ताने त्याची मुलगी प्रभावती हिचा विवाह वाकाटक घराण्यातील दुसरा रुद्रसेन याच्याशी करून दिला. अशा रीतीने दक्षिणेकडच्या बलशाली वाकाटक सत्तेशी नातेसंबंध जोडले. दिल्लीजवळील मेहरौली येथे एक लोहस्तंभ उभा आहे. तो सुमारे दीड हजार वर्षांहूनही अधिक जुना आहे. तरी तो गंजलेला नाही. प्राचीन भारतीयांनी तंत्रज्ञानात केलेल्या प्रगतीचे ते एक प्रतीक आहे. या लोहस्तंभावरील लेखात 'चंद्र' नावाच्या राजाचा उल्लेख आहे. त्या उल्लेखाच्या आधारे हा लोहस्तंभ दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातील आहे, असे मानले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

फाहियान हा चिनी प्रवासी दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात भारतात आला होता. आपल्या प्रवासवृत्तात त्याने गुप्त काळातील समाजजीवनाचे वर्णन केलेले आहे. तो म्हणतो, भारताची नगरे मोठी व भरभराटीस आलेली आहेत. प्रवाशांसाठी या नगरांत अनेक अतिथिगृहे आहेत. अनेक धर्मार्थ संस्थाही आहेत. शहरात इस्पितळे आहेत. तेथे गरिबांना वैद्यकीय सेवा विनामूल्य उपलब्ध होते. विहार व मंदिरे भव्य आहेत. लोकांना व्यवसाय निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोठेही जाण्यास लोकांना मज्जाव नाही. सरकारी अधिकाऱ्यांना व सैनिकांना नियमितपणे पगार दिला जातो. तेथील लोक दारू पीत नाहीत, हिंसा करत नाही. गुप्त राजवटीतले प्रशासन योग्य रीतीने चालवले जाते.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात 'फाहियान' हा बौद्ध भिक्खू चीनमधून भारतात आला होता. त्याने त्याच्या भारतातील प्रवासाचे वर्णन लिहून ठेवले आहे. त्यामध्ये गुप्त साम्राज्यातील उत्कृष्ट राज्यव्यवस्थेची माहिती मिळते.

### ८.५ वर्धन राजघराणे

गुप्त साम्राज्याचे सामर्थ्य कमी होऊ लागल्यानंतर उत्तर भारतात अनेक राज्ये उदयाला आली. वर्धन राजघराण्याचे राज्य त्यांपैकी एक होते. दिल्लीजवळ असणाऱ्या थानेसर या ठिकाणी प्रभाकरवर्धन नावाचा राजा राज्य करत होता. त्याच्या काळात वर्धन घराणे प्रभावी बनले. हर्षवर्धन हा त्याचा मुलगा होय. हर्षवर्धनाने वर्धन साम्राज्याचा विस्तार केला. त्याच्या कारकिर्दीत वर्धन साम्राज्याचा विस्तार उत्तरेला नेपाळ, दक्षिणेला नर्मदा नदी, पूर्वेला आसाम आणि पश्चिमेला गुजरातपर्यंत झाला होता. कामरूप म्हणजे प्राचीन आसाम. तेथील राजा भास्करवर्मन याच्याशी त्याचे मैत्रीचे संबंध होते. हर्षवर्धनाने आपला राजदूत चिनी दरबारात पाठवला होता. हर्षवर्धनाने चीनच्या सम्राटाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले होते. त्याने त्याची राजधानी कनौज येथे प्रस्थापित केली. त्याच्या कारकिर्दीत व्यापाराची भरभराट झाली. राज्याच्या उत्पन्नाचा खूप मोठा हिस्सा तो प्रजेच्या हितासाठी वापरत असे. दर पाच वर्षांनी तो स्वतःची सर्व संपत्ती प्रजेला दान करत असे.

हर्षवर्धनाच्या दरबारातील राजकवी बाणभट्ट याने 'हर्षचरित' हा हर्षवर्धनाच्या जीवनावरील ग्रंथ लिहिला. त्याच्या आधारे हर्षवर्धनाच्या कारकिर्दीची माहिती मिळते. हर्षवर्धनाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. त्याने इतर धर्मांनाही उदार आश्रय दिला. हर्षवर्धनाने 'रत्नावली', 'नागानंद' आणि 'प्रियदर्शिका' अशी तीन संस्कृत नाटके लिहिली. त्याच्या काळात युआन श्वांग हा बौद्ध भिक्खू चीनहून भारतात आला होता. तो भारतभर फिरला. नालंदा विद्यापीठात तो दोन वर्षे राहिला होता. त्याने चीनमध्ये गेल्यावर बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले.



युआन श्वांग

**माहीत आहे का तुम्हांला?**

युआन श्वांग भारतभर फिरला. त्याने महाराष्ट्रातील लोकांविषयी मोठे गौरवपूर्व उद्गार काढले आहेत. तो म्हणतो, ''महाराष्ट्राचे लोक मानी आहेत. कोणी उपकार केले तर ते नेहमी स्मरतात, पण जर कोणी त्यांचा अपमान केला तर ते गय करीत नाहीत. संकटात सापडलेल्या माणसांना आपल्या प्राणाचीही पर्वा न करता ते मदत करतात. शरण आलेल्यास ते अपाय करीत नाहीत.''



नालंदा विद्यापीठ

## ८.६ ईशान्य भारतातील राजसत्ता

ईशान्य भारतातील मणिपूर प्रदेशातील उलूपी या राजकन्येचा अर्जुनाबरोबर विवाह झाल्याची कथा महाभारतात आली आहे. 'कामरूप' हे राज्य इसवी सनाच्या चौथ्या शतकात उदयाला आले. पुष्यवर्मन हा कामरूप राज्याचा संस्थापक होता. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभलेखात त्याचा उल्लेख केलेला आहे. कामरूपच्या राजांचे अनेक कोरीव लेख उपलब्ध आहेत. महाभारत आणि रामायण या महाकाव्यांमध्ये कामरूपचा उल्लेख 'प्राग्ज्योतिष' या नावाने केलेला आहे. प्राग्ज्योतिषपूर ही त्या राज्याची राजधानी होती. प्राग्ज्योतिषपूर म्हणजे आजचे आसाम राज्यातील गुवाहाटी शहर. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या पुस्तकात त्याचा उल्लेख 'किऱ्हादिया' म्हणजे 'किरात लोकांचा प्रदेश' असा केला आहे. कामरूप राज्याचा विस्तार ब्रह्मपुत्रा नदीचे खोरे, भूटान, बंगालचा काही भाग आणि बिहारचा काही भाग या प्रदेशांमध्ये झालेला होता. ईशान्य भारतातील 'कामरूप' राज्यात युआन श्वांग गेला होता. त्या वेळी भास्करवर्मन हा तेथील राजा होता.

या पाठात आपण मौर्यांनंतरच्या काळातील उत्तर भारत आणि तेथील विविध राजसत्तांचा परिचय करून घेतला. तसेच त्या सुमारास ईशान्य भारतात काय परिस्थिती होती, तेही पाहिले. पुढील पाठात आपण त्याच सुमारास दक्षिण भारतात असलेल्या राजसत्तांचा परिचय करून घेणार आहोत.

### माहीत आहे का तुम्हांला?

भारतीय परंपरेनुसार प्राचीन काळी काश्मीरचे नाव 'कश्यपपूर' असे होते. ग्रीक इतिहासकारांनी त्याचा उल्लेख कॅस्पॅपिरॉस, कॅस्पॅटिरॉक आणि कॅस्पेरिया असा केला आहे. महाभारत काळात काम्बोज घराण्याचे राजे तेथे राज्य करत असल्याचा उल्लेख येतो. सम्राट अशोकाच्या काळात काश्मीर मौर्य साम्राज्यात समाविष्ट झाले होते. इसवी सनाच्या सातव्या शतकात कर्कोट घराण्याचे राज्य काश्मीरमध्ये होते. कल्हणाने त्याच्या राजतरंगिणी या ग्रंथात त्याची माहिती दिलेली आहे.

## स्वाध्याय

**१. सांगा पाहू.**

(१) भारतात सोन्याची नाणी पाडण्याची सुरुवात करणारे राजे.

(२) कनिष्काने काश्मीरमध्ये वसवलेले शहर.

(३) वीणावादनात प्रवीण असलेला राजा.

(४) कामरूप म्हणजेच.

**२. पाठातील नकाशाचे निरीक्षण करून गुप्तांच्या साम्राज्यातील आधुनिक शहरांच्या नावांची यादी करा.**

**३. चर्चा करा व लिहा.**

(१) सम्राट कनिष्क


(२) मेहरौली येथील लोहस्तंभ

**४. पाठातील विविध ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या नावांची यादी करा.**

**५. गुप्त राजघराणे आणि वर्धन राजघराणे यांचा तुलनात्मक तक्ता पुढील मुद्द्यांच्या आधारे तयार करा.**

| मुद्दे | गुप्त राजघराणे | वर्धन राजघराणे |
|---|---|---|
| संस्थापक | | |
| राज्यविस्तार | | |
| कार्य | | |

**६. पुढील शब्दकोडे सोडवा.**



**उभे शब्द**

२. ★★★★★ याच्या पराक्रमाचे वर्णन प्रयाग येथील स्तंभलेखामध्ये आढळते.

३. मेहरौली लोहस्तंभावर ★★ नावाच्या राजाचा उल्लेख आढळतो.

५. पुष्यवर्मन याने ★★★★ चे राज्य स्थापन केले.

७. ★★★★★ याच्या दरबारात बाणभट्ट हा राजकवी होता.

८. इंडोग्रीक राजांमधील प्रसिद्ध राजा ★★★★.

**आडवे शब्द**

१. ★★★★★★★ याने गुप्तांचे साम्राज्य वायव्येकडे वाढवले.

४. हर्षवर्धनाचे एक संस्कृत नाटक ★★★★★

६. गुप्त राजघराण्याचा संस्थापक ★★★

९. ★★★★ हिचा विवाह वाकाटक घराण्यातील दुसरा रुद्रसेन याच्याशी झाला.

१०. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात भारतात आलेला बौद्ध भिक्खू ★★★★

११. कनिष्कच्या दरबारातील प्रसिद्ध वैद्य ★★★

**उपक्रम**

मौर्य साम्राज्यानंतर भारतात होऊन गेलेल्या राज्यकर्त्यांविषयी अधिक माहिती मिळवा व तुम्हांला आवडणाऱ्या राज्यकर्त्याचा भूमिकाभिनय वर्गात सादर करा.

* * *

DTRM6Q

# ९. दक्षिण भारतातील प्राचीन राज्ये

९.१ चेर, पांड्य आणि चोळ राजघराणी


९.२ सातवाहन राजघराणे

९.३ वाकाटक राजघराणे

९.४ चालुक्य राजघराणे

९.५ पल्लव राजघराणे

९.६ राष्ट्रकूट राजघराणे






**करून पहा.**

भारताच्या नकाशा आराखड्यात दक्षिण भारतातील महत्त्वाची ठिकाणे दाखवा.

## ९.१ चेर, पांड्य आणि चोळ राजघराणी

दक्षिणेतील प्राचीन राजसत्तांमधील तीन राजसत्तांचा उल्लेख तत्कालीन साहित्यामध्ये येतो.

चेर, पांड्य आणि चोळ या त्या राजसत्ता होत. या राजसत्ता इसवी सनापूर्वीच्या चौथ्या शतकात किंवा त्याही पूर्वीपासून अस्तित्वात होत्या. त्यांचा उल्लेख रामायण, महाभारत या महाकाव्यांमध्ये करण्यात आला आहे. तमिळ भाषेतील संघम साहित्यात या तीन राजसत्तांचा उल्लेख आहे. मौर्य सम्राट अशोकाच्या लेखांमध्येही त्यांचा उल्लेख आहे. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या पुस्तकात 'मुझिरीस' हे केरळच्या किनाऱ्यावरचे अत्यंत महत्त्वाचे बंदर असल्याचे म्हटले आहे. हे बंदर चेर राज्यात होते. मुझिरीस या बंदरातून मसाल्याचे पदार्थ, मोती, मौल्यवान रत्ने इत्यादी वस्तूंची इटलीमधील रोमकडे आणि पश्चिमेकडील इतर देशांकडे निर्यात होत असे. पांड्य राज्याचा विस्तार आजच्या तमिळनाडूमध्ये होता. तेथील उत्कृष्ट दर्जाच्या मोत्यांना खूप मागणी होती. मदुराई ही पांड्य राज्याची राजधानी होती. प्राचीन चोळांचे राज्य तमिळनाडूतील तिरूचिरापल्लीच्या आसपासच्या प्रदेशात होते.

## ९.२ सातवाहन राजघराणे

मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तर भारताप्रमाणेच महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक या प्रदेशांतील स्थानिक राजे स्वतंत्र झाले. त्यांनी छोटी छोटी राज्ये स्थापन केली. त्यांपैकी एक सातवाहन घराणे होते. प्रतिष्ठान म्हणजेच पैठण ही त्यांची राजधानी होती. राजा सिमुक हा सातवाहन घराण्याचा संस्थापक होता. पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळच्या नाणेघाटातील लेण्यात असलेल्या कोरीव लेखांमध्ये या घराण्यातील महत्त्वाच्या व्यक्तींची नावे आहेत. काही सातवाहन राजे त्यांच्या नावाआधी आईचे नाव लावत असत. उदा., गौतमीपुत्र सातकर्णी.

सातवाहन घराण्यातील गौतमीपुत्र सातकर्णी हा राजा विशेष प्रसिद्ध आहे. त्याच्या पराक्रमांचे वर्णन नाशिक येथील लेण्यांमधील कोरीव लेखामध्ये केलेले आहे. त्याने शक राजा नहपान याचा पराभव केला.

**माहीत आहे का तुम्हांला?**

नाणेघाट : पुणे व ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर (जुन्नर-मुरबाड रस्ता) असलेला घाटरस्ता 'नाणेघाट' या नावाने ओळखला जातो. पाच किलोमीटर लांबीचा हा घाट सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी सातवाहनांच्या कारकिर्दीत तयार करण्यात आला. पूर्वी हा घाट देश व कोकण यांच्यामधील मुख्य व्यापारी मार्गांपैकी एक होता. व्यापार व वाहतूक यांसाठी हा घाटरस्ता वापरला जात असे. कोरलेला रांजण आजही तेथे पाहायला मिळतो. नाणेघाटातील लेण्यांत सातवाहन राजांच्या मूर्ती व प्राचीन शिलालेख आहेत. सातवाहन राजा व राणी यांनी दिलेल्या देणग्यांची वर्णने येथील शिलालेखात आहे.

गौतमीपुत्राचा उल्लेख नाशिकच्या लेखात 'त्रिसमुद्रतोयपीतवाहन' असा केलेला आहे. तोय म्हणजे पाणी. घोडे हे राजाचे वाहन. 'ज्याच्या घोड्यांनी तीन समुद्रांचे पाणी प्याले आहे', असा त्याचा अर्थ होतो. तीन समुद्र म्हणजे अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर. त्याच्या काळात सातवाहनांचे साम्राज्य उत्तरेकडे नर्मदा नदीपासून दक्षिणेकडे तुंगभद्रा नदीपर्यंत पसरलेले होते.

हाल नावाच्या सातवाहन राजाचा 'गाथासप्तशती' हा माहाराष्ट्री या प्राकृत भाषेतील ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथात सातवाहन काळातील लोकजीवनाची माहिती मिळते.

सातवाहन काळात भारतीय व्यापारात खूप वाढ झाली. महाराष्ट्रातील पैठण, तेर, भोकरदन, कोल्हापूर या स्थळांना व्यापाराची केंद्रे म्हणून विशेष महत्त्व प्राप्त झाले. या काळात अनेक कलावस्तूंचे उत्पादन तेथे होऊ लागले. भारतीय मालाची निर्यात रोमपर्यंत होत

असे. काही सातवाहन नाण्यांवर जहाजाच्या प्रतिमा आहेत. महाराष्ट्रातील अजिंठा, नाशिक, कार्ले, भाजे, कान्हेरी, जुन्नर येथील लेण्यांमधील काही लेणी सातवाहनांच्या काळात खोदलेली आहेत.



**जहाजाची प्रतिमा असलेले सातवाहन नाणे**



**कार्ले येथील चैत्यगृह**

## ९.३ वाकाटक राजघराणे

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीस सातवाहनांची सत्ता क्षीण झाली. त्यानंतर उदयाला आलेल्या राजघराण्यांमध्ये वाकाटक हे एक सामर्थ्यशाली राजघराणे होते. वाकाटक राजघराण्याच्या संस्थापकाचे नाव 'विंध्यशक्ति' असे होते. विंध्यशक्तीनंतर पहिला प्रवरसेन हा राजा झाला. प्रवरसेनानंतर वाकाटकांचे राज्य विभागले गेले. त्यातील दोन शाखा प्रमुख होत्या. पहिल्या शाखेची राजधानी नंदीवर्धन (नागपूरजवळ) येथे होती. दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म म्हणजे सध्याचे वाशिम (जिल्हा वाशिम) येथे होती. विंध्यशक्ती याचा मुलगा पहिला प्रवरसेन याने वाकाटक साम्राज्याचा विस्तार केला. त्याच्या कारकिर्दीत वाकाटकांचे साम्राज्य उत्तरेस माळवा आणि गुजरात या प्रदेशांपासून दक्षिणेस कोल्हापूरपर्यंत पसरले होते. कोल्हापूरचे त्या काळातील नाव 'कुंतल' असे होते. गुप्त सम्राट दुसरा चंद्रगुप्त याची मुलगी प्रभावती हिचा विवाह दुसरा रुद्रसेन या वाकाटक राजाशी झाला होता, याची माहिती आपण यापूर्वी घेतली आहे. हरिषेण या वाकाटक राजाचा वराहदेव नावाचा मंत्री होता. तो बौद्ध धर्माचा अनुयायी होता. अजिंठा येथील १६ क्रमांकाचे लेणे



**अजिंठा येथील एक लेणे**

त्याने खोदवून घेतले होते. अजिंठ्याच्या इतरही काही लेण्यांमधील खोदाईचे, तसेच ती लेणी चित्रांनी सुशोभित करण्याचे काम हरिषेणाच्या कारकिर्दीत झाले. वाकाटक राजा दुसरा प्रवरसेन याने 'माहाराष्ट्री' या प्राकृत भाषेतील



**अजिंठा येथील बोधिसत्त्व पद्मपाणि**

'सेतुबंध' या ग्रंथाची रचना केली. तसेच कालिदासाचे 'मेघदूत' हे काव्यही याच काळातील आहे.

## ९.४ चालुक्य राजघराणे

कर्नाटकातील चालुक्य राजघराण्याची सत्ता बलशाली होती. वाकाटकानंतर प्रबळ झालेल्या सत्तांमध्ये कदंब, कलचुरी इत्यादी सत्तांचा समावेश होता. त्या सर्वांवर चालुक्य राजांनी वर्चस्व प्रस्थापित केले. पहिला पुलकेशी याने इसवी सनाच्या सहाव्या शतकात चालुक्य घराण्याची स्थापना केली. कर्नाटकातील बदामी येथे त्याची राजधानी होती. बदामीचे प्राचीन नाव 'वातापि' असे होते. चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याने सम्राट हर्षवर्धनाचे आक्रमण परतवून लावले होते. बदामी, ऐहोळे, पट्टदकल येथील प्रसिद्ध मंदिरे चालुक्य राजांच्या कारकिर्दीत बांधली गेली.



**पट्टदकल येथील मंदिर**

## ९.५ पल्लव राजघराणे

पल्लव राजसत्ता दक्षिण भारतातील एक प्रबळ राजसत्ता होती. तमिळनाडूतील कांचीपुरम ही त्यांची



**महाबलिपुरम येथील रथमंदिरे**

राजधानी होती. महेंद्रवर्मन हा एक कर्तबगार पल्लव राजा होता. त्याने पल्लव राज्याचा विस्तार केला. तो स्वतः नाटककार होता. महेंद्रवर्मनचा मुलगा नरसिंहवर्मनने चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याचे आक्रमण परतवून लावले. त्याच्या कारकिर्दीत महाबलिपुरम येथील प्रसिद्ध रथमंदिरे खोदविली गेली. ही रथमंदिरे अखंड पाषाणात खोदलेली आहेत.

पल्लव राजांचे आरमार प्रबळ आणि सुसज्ज होते. त्यांच्या काळात भारताचा आग्नेय आशियातील देशांशी जवळचा संबंध आला. देशांतर्गत आणि देशाबाहेरील व्यापार भरभराटीला आला. युआन श्वांग याने कांचीला भेट दिली होती. त्यांच्या राज्यात सर्व धर्मांच्या लोकांना सहिष्णुतेने आणि न्यायाने वागवले जाई, असे त्याने म्हटले आहे.

## ९.६ राष्ट्रकूट राजघराणे

राष्ट्रकूट राजघराण्याच्या भरभराटीच्या काळात त्यांची सत्ता विंध्य पर्वतापासून ते दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत पसरलेली होती. दन्तिदुर्ग या राजाने प्रथम त्यांची सत्ता महाराष्ट्रात स्थापन केली. कृष्ण राजा पहिला याने वेरूळचे सुप्रसिद्ध कैलास मंदिर खोदवले.

आतापर्यंत आपण प्रामुख्याने प्राचीन भारतातील विविध राजकीय सत्तांची माहिती घेतली. पुढील पाठात प्राचीन भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेऊ.



**वेरूळ येथील कैलास लेणे**

## माहीत आहे का तुम्हांला ?

**पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी**

पेरिप्लस म्हणजे माहितीपुस्तक. एरिथ्रियन सी म्हणजे तांबडा समुद्र. ग्रीक लोकांच्या दृष्टीने हिंदी महासागर आणि इराणचे आखात हे तांबड्या समुद्राचाच भाग होते. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' म्हणजे 'तांबड्या समुद्राचे माहितीपुस्तक.' हे साधारणपणे इसवी सनाच्या पहिल्या शतकातील पुस्तक आहे. हे पुस्तक लिहिणारा खलाशी इजिप्तमध्ये राहणारा होता. भारताचा समुद्रकिनारा, इराणचे आखात आणि इजिप्त या प्रदेशांच्या दरम्यान चालणाऱ्या व्यापाराची माहिती पेरिप्लसमध्ये मिळते. बॅरिगाझा म्हणजे भडोच, नाला-सोपारा, कल्याण, मुझिरीस इत्यादी भारतीय बंदरांचा उल्लेख पेरिप्लसमध्ये आहे. मुझिरीस हे केरळमधील कोचीनच्या जवळ असणारे प्राचीन बंदर होते. आज ते अस्तित्वात नाही.

## स्वाध्याय

१. **ओळखा पाहू.**

(१) सातवाहन राजे त्यांच्या नावाआधी कोणाचे नाव लावत -

(२) कोल्हापूरचे प्राचीन काळातील नाव -

२. **पाठातील नकाशाचे निरीक्षण करून खालील तक्ता पूर्ण करा.**

| पल्लव | कांची |
|---|---|
| ---- | ऐहोळ, बदामी, पट्टदकल |
| सातवाहन | ---- |

३. **खालील राजसत्ता व राजधानी यांचे वर्गीकरण करा.**
**सातवाहन, पांड्य, चालुक्य, वाकाटक, पल्लव, मदुराई, प्रतिष्ठान, कांचीपुरम, वातापी.**

| अ. क्र. | राजसत्ता | राजधानी |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |

४. **पाठातील कोणत्याही तीन चित्रांचे निरीक्षण करून तुम्हांला काय माहिती मिळते ते तुमच्या शब्दांत लिहा.**

५. **खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) दक्षिणेतील प्राचीन राजसत्ता कोणत्या होत्या ?

(२) मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर कोणत्या प्रदेशातील स्थानिक राजे स्वतंत्र झाले ?

६. **थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) महेंद्रवर्मनची कामगिरी लिहा.

(२) त्रिसमुद्रतोयपीतवाहन म्हणजे काय, ते स्पष्ट करा.

(३) मुझिरीस बंदरातून कोणत्या वस्तूंची निर्यात होत असे ?

**उपक्रम**

पाठात आलेल्या चित्रांचा संग्रह करून त्यांची माहिती मिळवा व शाळेच्या प्रदर्शनात मांडणी करा.

* * *

DU1I8D

# १०. प्राचीन भारत : सांस्कृतिक

१०.१ भाषा आणि साहित्य

१०.२ लोकजीवन

१०.३ विज्ञान

१०.४ शिक्षणाची केंद्रे

१०.५ स्थापत्य आणि कला

## १०.१ भाषा आणि साहित्य

प्राचीन भारतात साहित्य निर्मितीची अखंड परंपरा होती. संस्कृत, अर्धमागधी, पाली आणि तमिळ अशा भाषांमधून ही साहित्यनिर्मिती झाली. त्यांमध्ये धार्मिक साहित्य, व्याकरणग्रंथ, महाकाव्य, नाटक, कथासाहित्य अशा अनेक प्रकारच्या लेखनाचा समावेश आहे.

**संघम साहित्य :** संघम म्हणजे विद्‌वान साहित्यिकांच्या सभा. या सभांमध्ये संकलित झालेले साहित्य 'संघम साहित्य' म्हणून ओळखले जाते. हे तमिळ भाषेतील सर्वांत प्राचीन साहित्य आहे. या साहित्यातील 'सिलप्पधिकरम' आणि 'मणीमेखलाई' ही महाकाव्ये प्रसिद्‌ध आहेत. संघम साहित्यातून दक्षिण भारतातील प्राचीन काळच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाची माहिती मिळते.

**धार्मिक साहित्य :** यामध्ये आगमग्रंथ, तिपिटक आणि भगवद्‌गीता हे ग्रंथ महत्वाचे आहेत.

'जैन आगमग्रंथ' अर्धमागधी, शौरसेनी आणि माहाराष्ट्री अशा प्राकृत भाषांमध्ये लिहिले आहेत. वर्धमान महावीरांचा उपदेश आगमग्रंथांमध्ये संकलित करण्यात आला आहे. अपभ्रंश भाषेत महापुराण, चरित्रे, कथा इत्यादी वाङ्मय आहे. सिद्‌धसेन दिवाकराने 'सम्मइसुत्त' हा न्यायशास्त्रावरील प्राकृत ग्रंथ लिहिला. विमलसूरींनीं 'पउमचरिय' या प्राकृत काव्यात रामकथा सांगितली आहे. हरिभद्रसूरींचा 'समराइच्चकहा' व उद्द्योतनसूरींचा 'कुवलयमालाकहा' हे ग्रंथही विशेष प्रसिद्‌ध आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**


उत्तर भारतापासून ते महाराष्ट्रापर्यंतच्या प्रदेशात प्रचलित असणाऱ्या बहुतेक भाषा या प्राकृत आणि संस्कृत या भाषांमधून विकसित झाल्या असे मानले जाते. प्राकृत हा शब्द 'प्रकृत' या शब्दापासून तयार होतो. प्रकृत म्हणजे नैसर्गिक. प्राकृत भाषा लोकांच्या दैनंदिन व्यवहारात असणाऱ्या भाषा होत्या. पैशाची, शौरसेनी, मागधी आणि माहाराष्ट्री अशा चार गटांमध्ये प्राकृत भाषांची विभागणी केली जाते. माहाराष्ट्रीपासून मराठी विकसित झाली. अशा तऱ्हेने प्राकृत भाषांपासून मराठीसारख्या आधुनिक भाषांचा विकास होण्याच्या प्रक्रियेत या भाषांच्या मूळ रूपात बदल झाले. त्यांना 'अपभ्रंश भाषा' असे म्हटले गेले. अपभ्रंश भाषांमधून आधुनिक भाषा विकसित झाल्या.

तिपिटकामध्ये तीन पिटक आहेत. पिटक म्हणजे पेटी. या ठिकाणी त्याचा अर्थ 'विभाग' असा आहे. तिपिटक पाली या भाषेत लिहिले आहे. तीन वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य यात आहे. १. **'सुत्तपिटक'** : यामध्ये गौतम बुद्‌धांच्या उपदेशाची वचने एकत्रित करण्यात आलेली आहेत. या वचनांना सूक्ते म्हणतात. २.**'विनयपिटक'** : येथे 'विनय' या शब्दाचा 'नियम' असा अर्थ आहे. यात बौद्‌ध संघातील भिक्खू आणि भिक्खुनी यांनी दैनंदिन जीवनात कसे वागावे याचे नियम दिलेले आहेत. ३.**'अभिधम्मपिटक' :** यात बौद्‌ध धर्माचे तत्त्वज्ञान समजावून सांगितले आहे. तिपिटकाचे स्पष्टीकरण करणारा 'अठ्ठकथा' (अर्थकथा) नावाचा ग्रंथ प्रसिद्‌ध आहे. ज्ञानी स्त्रियांनी स्वत:चे अनुभव सांगणाऱ्या गाथा रचल्या. त्या 'थेरीगाथा' या ग्रंथात संकलित करण्यात आल्या आहेत. त्या गाथा पाली भाषेत आहेत.

'भगवद्‌गीता' हा हिंदूंचा पवित्र ग्रंथ महाभारताचाच

एक भाग आहे. फळाची आशा न धरता प्रत्येकाने आपापले कर्तव्य करावे, असे भगवद्‌गीतेत सांगितले आहे. ईश्वराची भक्ती करण्याचा मार्ग सर्वांसाठी खुला आहे, असे त्यात सांगितले आहे.

इसवी सनाच्या आठव्या शतकात आद्य शंकराचार्य होऊन गेले. ज्ञान आणि वैराग्य या गोष्टींवर त्यांनी भर दिला. 'उपनिषदे', 'ब्रह्मसूत्रे' आणि 'भगवद्‌गीता' या ग्रंथांवर भाष्ये लिहून त्यांचा अर्थ स्पष्ट केला. त्यांनी भारताच्या चार दिशांना बद्रिनाथ, द्‌वारका, जगन्नाथपुरी आणि शृंगेरी या ठिकाणी चार मठांची स्थापना केली आहे.



आद्य शंकराचार्य

अर्थशास्त्र हा ग्रंथ कौटिल्याने लिहिला. उत्तम शासनव्यवस्था कशी असावी याची सविस्तर चर्चा त्याने या ग्रंथात केलेली आहे.

**व्याकरणग्रंथ :** 'पाणिनि' या व्याकरणकाराने लिहिलेला 'अष्टाध्यायी' हा संस्कृत व्याकरणाचा प्रमाणग्रंथ मानला जातो. पतंजलीने 'महाभाष्य' ग्रंथ लिहिला. या ग्रंथात पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथातील सूत्रांचे स्पष्टीकरण केलेले आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**अर्थशास्त्र :** अर्थशास्त्र हा ग्रंथ कौटिल्य याने लिहिला. या ग्रंथात राजाचे कर्तव्य, मंत्री निवडण्याचे निकष, संरक्षणाची व्यवस्था, दुर्गांचे प्रकार, सैन्याची रचना, गुप्तहेरांची योजना, खजिन्याची, दप्तरखान्याची व्यवस्था, न्यायदान पद्‌धती, चोरीचा तपास, शिक्षेचे प्रकार इत्यादी प्रशासनविषयक बाबींची सूक्ष्मपणे चर्चा केलेली आहे.

**आर्ष आणि अभिजात महाकाव्ये :** 'रामायण' आणि 'महाभारत' ही दोन प्राचीन भारतातील आर्ष महाकाव्ये आहेत. आर्ष म्हणजे ऋषींनी रचलेले. 'रामायण' हे महाकाव्य 'वाल्मीकी' ऋषींनी रचले. रामायणातील कथेचे नायक श्रीराम हे आहेत. 'महाभारत' हे महाकाव्य व्यास ऋषींनी रचले. कौरव आणि पांडव यांच्यातील युद्‌ध हा महाभारताचा विषय आहे. या महाकाव्यात श्रीकृष्णाच्या चरित्राचे वर्णन आहे. महाभारतात विविध मानवी भावभावनांचे आणि त्यांच्या परिणामांचे व्यापक दर्शन घडते.

भाषा, साहित्य आणि कला यांच्या परंपरेतील एखादा कालखंड असा असतो, की पुढील काळातही त्याचा गौरव अबाधित राहतो. अशा कालखंडात निर्माण झालेल्या साहित्य, कला इत्यादींना अभिजात म्हणून ओळखले जाते. अभिजात संस्कृत भाषेतील कालिदासाची 'रघुवंश' आणि 'कुमारसंभव' तसेच भारवीचे 'किरातार्जुनीय' आणि माघाचे 'शिशुपालवध' ही प्राचीन कालखंडातील महाकाव्ये विख्यात आहेत.

**नाटक :** गायन, वादन आणि नृत्य यांच्या आधारे एखादी कथा सादर करण्याची भारतातील परंपरा खूप प्राचीन आहे. या कलांची सविस्तर चर्चा 'नाट्यशास्त्र' या भरतमुनींनी लिहिलेल्या ग्रंथात केलेली आहे. या कलांना संवादाची जोड देऊन केलेले सादरीकरण म्हणजे नाटक. प्राचीन संस्कृत नाटकांमध्ये भास या नाटककाराचे 'स्वप्नवासवदत्त', कालिदासाचे

'अभिज्ञानशाकुंतल' यांसारखी अनेक नाटके सुप्रसिद्‌ध आहेत.

**कथासाहित्य :** प्राचीन काळी भारतामध्ये कथासाहित्याचा उपयोग मनोरंजनाद्‌वारे शिक्षण देण्यासाठी केला जात असे. गुणाढ्य यांचा 'पैशाची' नावाच्या भाषेतील 'बृहत्कथा' हा ग्रंथ विख्यात आहे. विष्णुशर्मा नावाच्या पंडिताने रचलेला 'पंचतंत्र' हा ग्रंथ कथासाहित्याचा उत्कृष्ट नमुना आहे. या ग्रंथाचे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. बौद्‌ध जातककथाही विख्यात आहेत.



**करून पहा.**

पंचतंत्रातील एखादी कथा मिळवून त्याचे नाट्यीकरण करा.

## १०.२ लोकजीवन

प्राचीन भारतातील साहित्यातून तत्कालीन लोकजीवनाची माहिती मिळते. प्राचीन भारतात देशांतर्गत आणि दूरवरच्या देशांशी असलेल्या व्यापारामुळे समृद्‌धी नांदत होती. समाज विविध जातींमध्ये विभागलेला होता. वेगवेगळ्या कारागिरांच्या आणि व्यापाऱ्यांच्या संघटना होत्या. त्यांना 'श्रेणी' असे म्हणत. सागरी आणि खुश्कीच्या मार्गांनी व्यापार चालत असे. तलम कापड, हस्तिदंत, मौल्यवान रत्ने, मसाल्याचे पदार्थ, उत्कृष्ट बनावटीची मातीची भांडी इत्यादी भारतीय वस्तूंना परदेशात खूप मागणी असे. तांदूळ, गहू, सातू, मसूर ही मुख्य पिके होती. लोकांच्या आहारात या धान्यांपासून बनवलेले विविध पदार्थ, तसेच मांस, मासे, दूध, तूप आणि फळे यांचा समावेश असे. लोक प्रामुख्याने सुती वस्त्रे वापरत. तसेच रेशीम आणि लोकरीची वस्त्रेही वापरात होती. ती वस्त्रे साधारणपणे आजचे धोतर, उपरणे, मुंडासे, साडी या प्रकारचीच होती. कुशाणांच्या काळात कपडे शिवण्याच्या पद्‌धतीचा परिचय भारतीयांना झाला.

## १०.३ विज्ञान

**वैद्यकशास्त्र :** भारतीय वैद्यकशास्त्राला 'आयुर्वेद' असे म्हटले जाते. आयुर्वेदाला खूप प्राचीन परंपरा आहे. आयुर्वेदामध्ये रोगांची लक्षणे, रोगांचे निदान, रोगांवरील उपचार या गोष्टींचा विचार केलेला आहे. त्याबरोबरच रोग होऊ नये म्हणून काय करायला पाहिजे, याचाही विचार करण्यात आला आहे. बिंबिसाराच्या दरबारात जीवक हा प्रसिद्‌ध वैद्य होता. 'चरकसंहिता' या ग्रंथात वैद्यकीय चिकित्साशास्त्र आणि औषधशास्त्र यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. हा ग्रंथ चरक याने लिहिला. सुश्रुत या शल्यविशारदाने लिहिलेल्या 'सुश्रुतसंहिता' या ग्रंथात विविध रोगांचे निदान आणि त्यांवरील उपाय यांची माहिती आहे. या ग्रंथाचा विशेष म्हणजे त्यामध्ये विविध कारणांनी होणाऱ्या जखमा, अस्थिभंग, त्यांचे प्रकार आणि त्यांवरील शस्त्रक्रियांचे प्रकार यांची चर्चा केली आहे. सुश्रुत संहितेचे अरबी भाषेमध्ये भाषांतर झाले होते. त्याचे नाव 'किताब-इ-सुसुद' असे होते. वाग्भटाने वैद्यकशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. त्यांतील 'अष्टांगसंग्रह' आणि 'अष्टांगहृदयसंहिता' हे प्रमुख आहेत. सिद्‌ध नागार्जुन या बौद्‌ध भिक्खूने लिहिलेल्या 'रसरत्नाकर' या ग्रंथात रसायने आणि धातू यांसंबंधीची माहिती आहे.

**गणित आणि खगोलशास्त्र :** प्राचीन भारतीयांनी गणित आणि खगोलशास्त्र या विषयांचा सखोल अभ्यास केला होता. १ ते ९ आणि '०' (शून्य) या संख्यांचा वापर भारतीयांनी प्रथम केला. एकं, दहं अशा स्थानानुसार अंकांची किंमत बदलते हे प्राचीन भारतीयांना माहीत होते. आर्यभट नावाच्या शास्त्रज्ञाने 'आर्यभटीय' हा ग्रंथ लिहिला होता. त्याने गणिती क्रियांची अनेक सूत्रे दिली आहेत. आर्यभट खगोलशास्त्रज्ञही होता. पृथ्वी सूर्याभोवती फिरते, हे त्याने सांगितले. इसवी सनाच्या सहाव्या शतकात होऊन गेलेला वराहमिहिर याने 'पंचसिद्‌धान्तिका' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात भारतीय खगोलशास्त्रीय सिद्‌धान्ताबरोबर ग्रीक, रोमन, इजिप्ती या संस्कृतींमधील

खगोलशास्त्रीय सिद्धान्तांचा विचारही केलेला आहे. इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या ब्रह्मगुप्त या गणितज्ज्ञाने लिहिलेल्या ग्रंथाचे अरबी भाषेत भाषांतर केले गेले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**कणाद**

कणादाने 'वैशेषिक दर्शन' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात अणुपरमाणूंचा विचार प्रामुख्याने केला आहे. कणादाच्या मते हे विश्व असंख्य वस्तूंनी भरलेले आहे. या वस्तू म्हणजे अणूंनी घेतलेली निरनिराळी स्वरूपे होत. ही स्वरूपे बदलतात, पण अणू मात्र अक्षय राहतात.

## १०.४ शिक्षणाची केंद्रे

प्राचीन भारतात शिक्षणाची अनेक नाणावलेली केंद्रे होती. तेथे शिक्षण घेण्यासाठी परदेशांतूनही विद्यार्थी येत असत.

**तक्षशिला विद्यापीठ :** तक्षशिला हे प्राचीन भारतीय व्यापारी मार्गावरील महत्त्वाचे शहर होते. सध्या हे स्थान पाकिस्तानात आहे. तेथे सापडलेल्या पुरातत्त्वीय पुराव्याच्या आधारे ते इ.स.पू. सहाव्या शतकात वसवले गेले, असे दिसते. गौतम बुद्धांचा समकालीन असलेला जीवक नावाचा वैद्य तक्षशिला विद्यापीठात शिकला होता. इ.स.पू. चौथ्या शतकात तक्षशिला विद्यापीठाची कीर्ती सर्वदूर पसरली होती. मौर्य साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याचे शिक्षण तक्षशिला विद्यापीठात झाले होते. व्याकरणकार पाणिनी, चरक हा वैद्य हेही तक्षशिला विद्यापीठाचेच विद्यार्थी होते. सिकंदराच्या बरोबर आलेल्या ग्रीक इतिहासकारांनीही तक्षशिलेचे वर्णन केलेले आहे. ग्रीसमध्ये कोठेही अशा प्रकारचे विद्यापीठ अस्तित्वात नव्हते, असे त्यांनी लिहून ठेवले आहे. चिनी बौद्ध भिक्खू फाहियान इ.स.४००च्या सुमारास भारतात आला होता. त्या वेळी त्याने तक्षशिला विद्यापीठाला भेट दिली होती. या विद्यापीठामध्ये वैदिक वाङ्मय, बौद्ध तत्वज्ञान, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र अशा विविध विषयांचे शिक्षण दिले जाई.

**वाराणसी :** वरणा आणि असी या गंगेच्या दोन उपनद्या आहेत. या दोन नद्यांच्या मध्ये वसलेल्या शहराला वाराणसी हे नाव मिळाले. वाराणसीमध्ये वेदांचे तसेच जैन आणि बौद्ध तत्वज्ञानांचे शिक्षण देणारी केंद्रे प्राचीन काळापासून होती.

**वलभी :** गुजरातमधील सौराष्ट्रात वलभी नावाचे प्राचीन नगर होते. इसवी सनाच्या पाचव्या ते आठव्या शतकात ते जैन आणि बौद्ध तत्वज्ञानाच्या शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र होते. युआन श्वांग आणि इत्सिंग या चिनी बौद्ध भिक्खूंनी वलभीला भेट दिली होती.

**नालंदा विद्यापीठ :** आजच्या बिहारमधील पाटणा शहराच्या जवळ प्राचीन नालंदा विद्यापीठाचे अवशेष आहेत. सम्राट हर्षवर्धनाने या विद्यापीठाला उदारहस्ते देणग्या दिल्या होत्या. युआन श्वांग आणि इत्सिंग यांनी केलेल्या वर्णनानुसार नालंदा विद्यापीठात हजारो विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होती. तेथील ग्रंथालयात हजारो ग्रंथ होते. विद्यापीठात प्रवेश मिळवण्यासाठी प्रवेशद्वारापाशी विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागे.




नालंदा महाविहाराची मुद्रा

**विक्रमशीला विद्यापीठ :** विक्रमशीला विद्यापीठ आजच्या बिहारमधील भागलपूरच्या जवळ होते. धर्मपाल नावाच्या राजाने त्याची स्थापना इसवी सनाच्या आठव्या शतकात केली. तिथे सहा विहार होते. प्रत्येक विहाराचे प्रवेशद्वार स्वतंत्र होते.

**कांची** : पल्लव राजसत्तेच्या काळात (इ.स. ६वे शतक) आजच्या तमिळनाडूमधील कांची हे शहर महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले होते. तिथे वैदिक, जैन आणि बौद्‌ध ग्रंथांचे अध्ययन आणि अध्यापन केले जाई.

## १०.५ स्थापत्य आणि कला

मौर्य आणि गुप्तकाळात भारतीय स्थापत्यकलेच्या विकासाचा उत्कर्ष झाला. सम्राट अशोकाने ठिकठिकाणी उभारलेले दगडी स्तंभ ही भारतीय शिल्पकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. सांची येथील स्तूप आणि उदयगिरी, खंडगिरी, कार्ले, नाशिक, अजिंठा, वेरूळ इत्यादी ठिकाणच्या लेण्यांमधून तीच परंपरा अधिकाधिक विकसित होत गेली, असे दिसते. गुप्तकाळात भारतीय मूर्तिकलेचा विकास झाला. दक्षिण भारतात चालुक्य आणि पल्लव राजसत्तेच्या काळात मंदिर स्थापत्याचा विकास झाला. महाबलिपुरमची मंदिरे त्याची साक्ष देतात. पल्लव राजसत्तेच्या काळात देवदेवतांच्या कांस्यमूर्ती बनवण्यास सुरुवात झाली होती. दिल्लीजवळ मेहरौली येथे असलेल्या गुप्तकालीन लोहस्तंभाच्या आधारे प्राचीन भारतीयांचे धातुशास्त्राचे ज्ञान किती प्रगत होते, ते समजते.



**सांची स्तूप**

प्राचीन भारतीय संस्कृती अत्यंत समृद्‌ध आणि प्रगत होती, हे आपण पाहिले. पुढील पाठात आपण भारतीय संस्कृतीचा जगातील इतर संस्कृतींशी आलेला संपर्क आणि त्याचे झालेले दूरगामी परिणाम यांचा परिचय करून घेणार आहोत.



**नटराजाची कांस्यमूर्ती**



**मेहरौली येथील लोहस्तंभ**

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) प्राचीन भारतातील विद्यापीठांची यादी करा.

(२) कोणकोणत्या प्राचीन भारतीय वस्तूंना परदेशात मागणी असे, त्याची यादी करा.

**२. नावे लिहा.**

प्राचीन भारतातील महाकाव्ये................

**३. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(१) रामायण हे महाकाव्य.........ऋषींनी रचले.

(२) भारतीय वैद्यकशास्त्राला......असे म्हटले जाते.

(३) हजारो विद्यार्थ्यांची राहण्याची सोय....... विद्यापीठात होती.

**३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) तिपिटक म्हणजे काय ते स्पष्ट करा.

(२) भगवद्‌गीतेत कोणता संदेश दिला आहे ?

(३) आयुर्वेदात कोणत्या गोष्टींचा विचार केला आहे ?

(४) संघम साहित्य म्हणजे काय ?

**४. चर्चा करा.**

मौर्य आणि गुप्त काळातील स्थापत्य व कला.

**५. तुम्ही काय कराल ?**

(१) आयुर्वेदिक उपचार याविषयी माहिती मिळवून तुम्ही आपल्या दैनंदिन जीवनात त्याचा कसा वापर कराल ?

(२) तुमच्या पाठ्यपुस्तकातील सांची स्तूपाचे निरीक्षण करा व त्यासंबंधी अधिक माहिती मिळवा.

**६. पुढील प्रसंगी तुम्ही काय कराल ?**

**तुम्ही सहलीला गेल्यावर तुमचा मित्र तेथील ऐतिहासिक स्मारकावर त्याचे नाव लिहीत आहे.**

**उपक्रम**

(१) तुमच्या परिसरात कोणकोणत्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तू आहेत याविषयीची माहिती घरातील व्यक्तींकडून जाणून घ्या.

(२) आपल्या नजीकच्या परिसरातील ऐतिहासिक स्मारकांना, वास्तूंना भेट देऊन त्यांतून तुम्हांला कोणता इतिहास कळतो, त्यांच्या नोंदी करा.

* * *

DUAEA1



नाशिक येथील लेणे

# ११. प्राचीन भारत आणि जग

**११.१ भारत आणि पश्चिमेकडील देश**

**११.२ भारत आणि आशिया खंडातील इतर देश**

## ११.१ भारत आणि पश्चिमेकडील देश

हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी पश्चिमेकडील देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले होते. तेव्हापासूनच भारताची बाह्य जगाशी आर्थिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू होती. बौद्ध धर्माचा प्रसार अफगाणिस्तान आणि मध्य आशियातील अनेक देशांमध्ये झाला होता. इराणी साम्राज्याच्या काळातही भारताचा पश्चिमेकडील जगाशी संपर्क वाढीस लागला. त्या काळातील ग्रीक इतिहासकारांचे भारताबद्दलचे कुतूहल वाढीस लागले. त्यांच्या भारताबद्दलच्या लेखनातून पश्चिमेकडील देशांना भारताचा परिचय झाला. पुढे सिकंदर ज्या मार्गांनी आला, ते मार्ग भारत आणि पश्चिमेकडील देशांमधील व्यापारासाठी खुले झाले. ग्रीक मूर्तिकलेच्या प्रभावातून कुशाण काळात भारतामध्ये एका नव्या कलाशैलीचा उदय झाला. त्याला गांधार कला असे म्हणतात. गांधार कलाशैलीत प्रामुख्याने गौतम बुद्धांच्या मूर्ती घडवल्या गेल्या. या मूर्ती प्रामुख्याने अफगाणिस्तानातील गांधार प्रदेशात सापडल्या, म्हणून त्या शैलीस 'गांधार शैली' असे म्हटले जाते. या शैलीतील मूर्तींची चेहरेपट्टी ग्रीक चेहरेपट्टीशी मिळतीजुळती आहे. भारतातील सुरुवातीची नाणीही ग्रीक नाण्यांच्या धर्तीवर घडवलेली होती.



**पॅरिस येथील संग्रहालयातील गौतम बुद्धांची मूर्ती-गांधार शैली**




**अफगाणिस्तानमधील हड्डा येथील स्तूपावरचे गांधार शैलीचे शिल्प. ग्रीक लोकांचा पोशाख, अँफोरा (एकप्रकारचा कुंभ) आणि वाद्ये**

इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकाच्या काळात भारत आणि रोम यांच्यामधील व्यापार भरभराटीस आला होता. या व्यापारात दक्षिण भारतातील बंदरांचाही मोठा वाटा होता. महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील उत्खननात कासे या धातूच्या काही वस्तू सापडल्या. त्या रोमन बनावटीच्या आहेत.




**रोमन सम्राट ऑगस्टस याचे अरिकामेडू येथे मिळालेले सोन्याचे नाणे**

तमिळनाडूमधील अरिकामेडू येथील उत्खननातही रोमन बनावटीच्या अनेक वस्तू सापडल्या आहेत. दोन्ही




ठिकाणे भारत आणि रोम यांच्यामधील व्यापाराची महत्त्वाची केंद्रे होती. अशा अनेक व्यापारी केंद्रांचा उल्लेख तत्कालीन साहित्यात मिळतो. या व्यापारात इजिप्तमधील अलेक्झांड्रिया नावाचे बंदर महत्त्वाचे होते. भारतीय माल अरब व्यापारी अलेक्झांड्रियापर्यंत घेऊन जात. तिथून तो युरोपातील देशांमध्ये पाठवला जाई. अरबी लोकांनी भारतीय मालाबरोबर भारतीय तत्त्वज्ञान आणि विज्ञान युरोपपर्यंत पोचवले. गणितातील 'शून्य' ही संकल्पना भारताने संपूर्ण जगाला दिलेली एक मोठी देणगी आहे. अरबी लोकांनी या संकल्पनेचा परिचय युरोपला करून दिला.

## ११.२ भारत आणि आशिया खंडातील इतर देश

आशियातील अनेक देशांमध्ये प्राचीन भारतीय संस्कृतीचा विशेष प्रभाव पडला होता.

**श्रीलंका :** बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सम्राट



सिगिरिया लेण्यांतील भित्तिचित्र

अशोकाने त्याचा मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेमध्ये पाठवले होते. त्या दोघांच्या नावाचा उल्लेख 'महावंस' या श्रीलंकेतील बौद्ध ग्रंथात केलेला आहे. संघमित्राने स्वतःबरोबर बोधिवृक्षाची शाखा नेली होती. श्रीलंकेतील अनुराधपूर येथे असलेला बोधिवृक्ष याच शाखेपासून वृद्धिंगत झाला असे तेथील परंपरेनुसार मानले जाते.

श्रीलंकेतील मोती आणि इतर मौल्यवान वस्तूंना भारतात मोठ्या प्रमाणात मागणी होती. तेथील सिगिरिया या ठिकाणी इसवी सनाच्या पाचव्या शतकात कश्यप नावाच्या राजाने लेणे खोदवले होते. त्या लेण्यातील भित्तिचित्रांची शैली अजिंठ्याच्या चित्रशैलीशी साम्य दर्शवणारी आहे. श्रीलंकेतील 'महावंस' आणि 'दीपवंस' हे ग्रंथ भारत आणि श्रीलंका यांच्यामधील परस्परसंबंधांची माहिती देतात. हे ग्रंथ पाली भाषेत लिहिलेले आहेत.

**चीन आणि इतर देश :** प्राचीन काळापासून भारत आणि चीन यांच्यामध्ये व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाले होते. सम्राट हर्षवर्धनाने चीनच्या दरबारात राजदूत पाठवला होता. चीनमध्ये तयार होणाऱ्या रेशमी कापडाला भारतात 'चीनांशुक' असे नाव होते. चीनांशुकाला भारतात मोठी मागणी होती. प्राचीन भारतातील व्यापारी हे चीनांशुक पश्चिमेकडील देशांमध्ये पाठवत असत. हा व्यापार खुश्कीच्या मार्गाने होत असे. त्या मार्गाला 'रेशीम मार्ग' असेही म्हणतात. भारतातील काही प्राचीन स्थळे या रेशीम मार्गाशी जोडलेली होती. त्यामध्ये महाराष्ट्रातील मुंबईजवळ असलेले नाला-सोपारा हे एक होते. भारतात आलेले फाहियान आणि युआन श्वांग हे बौद्ध भिक्खूही रेशीम मार्गानेच भारतात आले.

इसवी सनाच्या पहिल्या शतकातील चिनी सम्राट 'मिंग' याच्या आमंत्रणावरून धर्मरक्षक आणि कश्यपमातंग हे बौद्ध भिक्खू चीनमध्ये गेले. त्यांनी अनेक भारतीय बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेत रूपांतर केले. त्यानंतर चीनमधील बौद्ध धर्माच्या प्रसारास चालना मिळाली. बौद्ध धर्म जपान, कोरिया, व्हिएतनाम या देशांमध्येही पोहचला.

**आग्नेय आशियातील देश :** कंबोडिया या देशातील 'फुनान' या प्राचीन राज्याची स्थापना इसवी सनाच्या पहिल्या शतकात झाली. चिनी परंपरेच्या आधारे कौंडिण्य नावाच्या भारतीयाने त्याची स्थापना केली, अशी माहिती मिळते. फुनानच्या लोकांना संस्कृत भाषेचे ज्ञान होते. त्या काळातील एक कोरीव शिलालेख उपलब्ध आहे. तो संस्कृतमध्ये आहे. आग्नेय आशियातील इतर देशांमध्येही भारतीय वंशाच्या लोकांची छोटी राज्ये उदयाला आली होती. या राज्यांमुळे भारतीय संस्कृतीचा प्रसार आग्नेय आशियामध्ये होत राहिला.

आग्नेय आशियातील कला आणि सांस्कृतिक जीवन यांवर भारतीय संस्कृतीचा ठसा उमटलेला दिसतो. इंडोनेशियात आजही रामायण आणि महाभारत यांतील कथांवर आधारलेली नृत्य-नाट्ये लोकप्रिय आहेत. आग्नेय आशियातील राज्यांमध्ये भारतीय संस्कृतीचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला. प्राचीन कालखंडात बौद्ध धर्म म्यानमार, थायलंड, इंडोनेशिया इत्यादी देशांत पोहोचला. नंतरच्या काळात शिव आणि विष्णू यांच्या मंदिरांचीही निर्मिती झाली.

यावर्षी आपण इ.स.पू. ३००० ते इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंतच्या भारताच्या इतिहासाचा आढावा घेतला. पुढील वर्षी आपण इसवी सनाच्या नवव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा इतिहास शिकणार आहोत. इ.स.९ वे शतक ते १८ वे शतक या कालखंडातील इतिहासास 'मध्ययुगीन इतिहास' असे म्हणतात.

## स्वाध्याय

**१. ओळखा पाहू.**

(१) रोमन बनावटीच्या वस्तू सापडलेली ठिकाणे.

(२) कुशाण काळात भारतामध्ये एका नव्या कलाशैलीचा उदय झाला ती शैली.

(३) महावंस आणि दीपवंस या ग्रंथांची भाषा.

(४) प्राचीन कालखंडात बौद्ध धर्माचा प्रसार झालेले देश.

**२. विचार करा आणि लिहा.**

(१) आग्नेय आशियावर भारतीय संस्कृतीचा ठसा उमटलेला दिसतो.

(२) चीनमध्ये बौद्‌ध धर्माच्या प्रसाराला चालना मिळाली.

**३. तुम्ही काय कराल ?**

तुमच्या आवडत्या छंदाला चालना मिळाली, तर तुम्ही काय कराल ?

**४. चित्र वर्णन करा.**

आपल्या पाठातील अफगाणिस्तानमधील हड्डा येथील स्तूपावरच्या गांधार शैलीच्या शिल्पांचे निरीक्षण करून चित्रवर्णन करा.

**५. अधिक माहिती मिळवा.**

(१) गांधार शैली (२) रेशीम मार्ग

**६. पाठात उल्लेख केलेले आग्नेय आशियातील देश नकाशा आराखड्यात दाखवा.**

**उपक्रम**

तुम्हांला आवडलेल्या एका कलेविषयी माहिती मिळवा व तिचे वर्गात सादरीकरण करा.

* * *

DUJABN

# नागरिकशास्त्र

## आपले स्थानिक शासन

### अनुक्रमणिका


| पाठाचे नाव | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आपले समाजजीवन | ५९ |
| २. | समाजातील विविधता | ६२ |
| ३. | ग्रामीण स्थानिक शासन संस्था | ६५ |
| ४. | शहरी स्थानिक शासन संस्था | ७१ |
| ५. | जिल्हा प्रशासन | ७७ |


### अध्ययन निष्पत्ती

| सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यास जोडीने / गटामध्ये / वैयक्तिकरीत्या अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे.**<br>• विविधता, भेदभाव, शासन/सरकार, उदरनिर्वाह यांसारख्या संकल्पनांवर आधारित चर्चेत भाग घेणे.<br>• कुटुंब, शाळा, समाजामध्ये लोकांना दिल्या जाणाऱ्या चांगल्या/वाईट वर्तणुकीचे निरीक्षण करणे.<br>• प्रशासनाची समाजामधील भूमिका समजून घेणे, कौटुंबिक घडामोडी/घटना व गावातील/ शहरातील घडामोडी/ घटना यांतील भेद समजून घेणे.<br>• आसपासच्या परिसराचे/गावाचे व्यवसायाच्या संदर्भात व्यक्त्याभ्यास (case study) म्हणून वर्णन करणे.<br>• पाठ्यपुस्तकांवर आधारित अभ्यास – एखादी ग्रामपंचायत किंवा नगरपालिका/ महानगरपालिका यांचा प्रत्यक्ष कारभार पाहणे, प्रत्यक्ष निरीक्षण करणे. (विद्यार्थी जेथे राहतो त्यानुसार) | **अध्ययनार्थी**<br>06.73H.13 आपल्या अवतीभोवती आढळणाऱ्या विविधतेविषयी निकोप वृत्ती जोपासतात.<br>06.73H.14 विविध प्रकारचे भेदभाव ओळखतात व त्या भेदांचे स्वरूप व स्रोत ओळखतात.<br>06.73H.15 विविध स्वरूपांतील समता व विषमता यांतील भेद स्पष्ट करतात व निकोप पद्धतीने त्यांना सामोरे जातात.<br>06.73H.16 शासनाच्या भूमिकेचे वर्णन करतात. मुख्यत्वे स्थानिक पातळीवर.<br>06.73H.17 शासनाचे भिन्न स्तर ओळखतात. स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय.<br>06.73H.18 ग्रामीण आणि शहरी स्थानिक शासनसंस्थांचे आरोग्य व शिक्षण या क्षेत्रांतील कार्यप्रणालीचे विश्लेषण करतात.<br>06.73H.19 ग्रामीण व शहरी भागांत उपलब्ध असणाऱ्या व्यवसायास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचे वर्णन करतात.<br>06.73H.20 व्यक्ती, कुटुंब आणि संस्था यांचा मिळून समाज बनतो हे समजून घेतात.<br>06.73H.21 राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्वधर्मसमभावाची आवश्यकता असते हे जाणतात.<br>06.73H.22 स्थानिक शासन संस्था हा लोकशाहीचा पाया आहे, हे ओळखतात.<br>06.73H.23 सार्वजनिक समस्या सोडवण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा असतो हे स्पष्ट करतात.<br>06.73H.24 जिल्हा प्रशासनाची माहिती मिळवतात. |

# १. आपले समाजजीवन


१.१ माणसाला समाजाची गरज का वाटली ?

१.२ माणसातील समाजशीलता

१.३ आपला विकास

१.४ समाज म्हणजे काय ?


इयत्ता पाचवीच्या पाठ्यपुस्तकात माणसाची उत्क्रांती कशी झाली हे तुम्ही शिकलात. आजचे आपले सामाजिक जीवन हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून आकारास आले आहे. माणसाने भटक्या अवस्थेकडून स्थिर समाजजीवनाकडे वाटचाल केली आहे.



आणखी ५० वर्षांनंतरचा समाज कसा असेल याबाबत चर्चा करा.

## १.१ माणसाला समाजाची गरज का वाटली ?

व्यक्तीच्या तसेच समाजाच्या विकासासाठी स्थिर व सुरक्षित समूहजीवन आवश्यक आहे. भटक्या अवस्थेतील माणसाला हे स्थैर्य व सुरक्षितता नव्हती. समूहात राहिल्याने सुरक्षितता मिळते याची जाणीव झाल्याने माणूस संघटितपणे जगू लागला. समाजाच्या निर्मितीमागील ही एक मुख्य प्रेरणा आहे. समाजातील दैनंदिन व्यवहार सुरळीत चालण्यासाठी माणसाला नियमांची गरज वाटली. त्यातून रूढी, परंपरा, नीतिमूल्ये, नियम आणि कायदे अस्तित्वात आले. त्यामुळे माणसाचे समाजजीवन अधिक संघटित व स्थिर झाले.

## १.२ माणसातील समाजशीलता

माणूस स्वभावतः समाजशील आहे. आपणा सर्वांना एकमेकांसह, सर्वांच्या सोबतीने आणि माणसांत राहायला आवडते. सर्वांसमवेत राहणे ही जशी आनंदाची बाब आहे, तशीच ती आपली गरजही आहे.

आपल्या अनेक गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा या आपल्या शारीरिक गरजा आहेत. त्या पूर्ण झाल्या की माणसाला स्थैर्य मिळते, परंतु माणसाला तेवढेच पुरेसे नसते. आपल्या काही भावनिक आणि मानसिक गरजाही असतात. उदाहरणार्थ, सुरक्षित वाटणे ही आपली भावनिक गरज आहे. आपल्याला आनंद झाला तर तो कोणाला तरी सांगावासा वाटतो. दुःख झाले तर आपल्यासोबत कोणीतरी असावे असे वाटते. आपल्या कुटुंबातील लोक, नातेवाईक आणि मित्र-मैत्रिणी यांचा सहवास आपल्याला आवडतो. यातून आपली समाजशीलता दिसते.



**बोलते आणि लिहिते व्हा.**

चित्रकलेच्या स्पर्धेत तुम्हांला पहिले बक्षीस मिळाले आहे. ते स्वतःजवळच ठेवाल की मित्र-मैत्रिणींना दाखवाल? त्यांनी तुम्हांला कसा प्रतिसाद द्यावा अशी तुमची अपेक्षा आहे? त्यांच्या प्रतिसादा-नंतर तुम्हांला कसे वाटले ?

- कौतुक केल्याने खूप छान वाटले.
- चांगले चित्र काढण्यास हुरूप आला.
- आणखी काय वाटले याविषयी लिहा.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या आपल्या मूलभूत गरजा आहेत हे तुम्हांला माहीत आहे. समाजातील व्यक्तींचे श्रम आणि त्यांच्या कौशल्यांमुळे वस्तू तयार होतात. शिक्षण आणि आरोग्यविषयक सेवा-सुविधांमुळे आपण सन्मानाने जगू शकतो. या सर्व बाबी आपल्याला समाजात उपलब्ध होतात. वेगवेगळे उद्योग व व्यवसायांतून आपल्या गरजा पूर्ण होतात. उदाहरणार्थ, आपल्याला अभ्यासासाठी पुस्तक लागते. पुस्तकासाठी कागद लागतो. त्यामुळे कागदनिर्मिती, छपाई आणि पुस्तक बांधणी इत्यादी व्यवसाय, उद्योगांचा विकास होतो. अनेक व्यक्ती त्यांत वाटा उचलतात. समाजातील अनेकविध व्यवसायांमुळे आपल्या गरजा भागतात. यांतूनच आपल्यातील क्षमता-कौशल्यांचा विकास होतो. समाजात मूलभूत गरजांची पूर्तता होते. सुरक्षितता, कौतुक, प्रशंसा, आधार इत्यादींसाठी आपण सर्व एकमेकांवर अवलंबून असतो. म्हणून आपले समाजजीवन परस्परावलंबी असते.



**करून पहा.**

सकाळी उठल्यापासून आपल्याला कोणकोणत्या वस्तूंची आवश्यकता असते याची एक सूची तयार करा.त्यांतील किमान पाच वस्तू तयार करण्यात आणि तुमच्यापर्यंत पोहोचवण्यात कोणाकोणाचा सहभाग असतो ते शोधा.

## १.३ आपला विकास

प्रत्येक माणसात निसर्गतःच काही गुण आणि क्षमता असतात. त्या सुप्त अवस्थेत असतात. त्यांचा विकास समाजामुळे होतो. परस्परांशी बोलण्यासाठी आपण भाषेचा आधार घेतो, पण ती आपल्याला जन्मतः अवगत नसते. आपण ती हळूहळू शिकतो. घरात जी भाषा बोलली जाते ती भाषा आपण सुरुवातीला शिकतो. आपल्या शेजारी वेगळी भाषा बोलणारे लोक असतील तर त्याही भाषेचा आपल्याला परिचय होतो. शाळेत निरनिराळ्या भाषा शिकण्याची संधी मिळते.

आपल्याजवळ स्वतंत्र विचार करण्याचीही क्षमता असते. उदाहरणार्थ, निबंधाचा विषय वर्गातल्या सर्व विद्यार्थ्यांना सारखाच दिलेला असला तरीही कोणतेही दोन निबंध सारखे का नसतात? कारण त्यांतील विचार वेगळा असतो. आपल्या भावनिक क्षमता आणि विचारशक्ती समाजामुळे वाढीस लागतात. विचार मांडण्याची आणि भावना व्यक्त करण्याची संधी समाजामुळे मिळते.

माणसातील कलागुणांचा विकासही समाजामुळे होतो. गायक, चित्रकार, शास्त्रज्ञ, साहसवीर, समाजकार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती समाजाच्या प्रोत्साहनामुळे व पाठिंब्यामुळे आपल्यातील गुणांचा विकास करतात. त्यांना मिळणारे प्रोत्साहनही तितकेच महत्त्वाचे असते.

## १.४ समाज म्हणजे काय ?

समाजात सर्व स्त्री-पुरुष, प्रौढ, वृद्‌ध, लहान मुले-मुली यांचा समावेश असतो. आपली कुटुंबे समाजाचा घटक असतात. समाजात विविध गट, संस्था, संघटना असतात. लोकांमधील परस्परसंबंध, परस्पर व्यवहार, त्यांच्यातील देवाणघेवाण यांचाही समावेश समाजात होतो. माणसांच्या झुंडी किंवा गर्दी म्हणजे समाज नाही तर काही समान उद्‌दिष्टे साधण्यासाठी जेव्हा लोक एकत्र येतात तेव्हा त्यांचा समाज बनतो.

अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षितता यांसारख्या गरजा भागवण्यासाठी समाजाला एक कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करावी लागते. अशा व्यवस्थेशिवाय समाजाचे दैनंदिन व्यवहार होऊ शकत नाहीत. समाजाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी व्यवस्था आवश्यक आहे. उदाहरणार्थ, अन्नाची गरज पुरवण्यासाठी शेती करणे आवश्यक आहे. शेतीशी संबंधित सर्व कार्ये पार पाडण्यासाठी विविध संस्था निर्माण कराव्या लागतात. शेतीची अवजारे तयार करण्यासाठी कारखाने, शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी बँका, उत्पादित मालासाठी बाजारपेठा अशी मोठी व्यवस्था निर्माण करावी लागते. अशा अनेक व्यवस्थांमधून समाज स्थिर होतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

जन्मतः सर्व माणसे समान आहेत. माणूस म्हणून सर्वांचा दर्जा सारखाच आहे. भारताच्या संविधानानुसार सर्वजण कायद्यापुढे समान आहेत. संविधानाने आपल्याला संधीच्या समानतेची हमी दिली आहे. शिक्षण, क्षमता व कौशल्ये यांचा उपयोग करून आपण आपली प्रगती साधू शकतो.

पुढील पाठात आपण भारतीय समाजातील विविधतेची ओळख करून घेऊ.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(१) समाजातील दैनंदिन व्यवहार सुरळीत चालण्यासाठी माणसाला ............... गरज वाटली.

(२) माणसातील कलागुणांचा विकास ............... होतो.

(३) आपल्या काही भावनिक आणि...........गरजाही असतात.

**२. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) आपल्या मूलभूत गरजा कोणत्या ?

(२) आपल्याला कोणाचा सहवास आवडतो ?

(३) समाजामुळे आपल्याला कोणती संधी मिळते ?

**३. तुम्हांला काय वाटते ? दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(१) समाज कसा तयार होतो ?

(२) समाजात कायमस्वरूपी व्यवस्था का निर्माण करावी लागते ?

(३) माणसाचे समाजजीवन अधिक संघटित व स्थिर कशामुळे होते ?

(४) समाजव्यवस्था अस्तित्वात नसती तर कोणत्या अडचणी आल्या असत्या ?

**४. पुढील प्रसंगी काय कराल ?**

(१) तुमच्या मित्राची / मैत्रिणीची शालेय वस्तू घरी विसरली आहे.

(२) रस्त्यात एखादी दृष्टिहीन / दिव्यांग व्यक्ती भेटली.

**उपक्रम**

(१) शेतीची अवजारे तयार करणाऱ्या एखाद्या कारागिराची भेट घ्या. या कामात त्याला कोणाकोणाची मदत होते याची सूची तयार करा.

(२) जवळच्या बँकेला भेट देऊन ती बँक कोणकोणत्या कामांसाठी कर्ज देते याची माहिती घ्या.

(३) मानवाच्या मूलभूत गरजा व नवीन गरजा यांची यादी करा.

* * *

DUT6DB

# २. समाजातील विविधता

२.१ विविधता हीच आपली ताकद
२.२ धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व
२.३ आपल्या जडणघडणीत समाजाचा सहभाग
२.४ समाजाचे नियमन

भारतीय समाजात अनेकविध भाषा, धर्म, संस्कृती, चालीरीती, परंपरा आहेत. ही विविधता आपले सांस्कृतिक वैभव आहे. मराठी, कन्नड, तेलुगु, बंगाली, हिंदी, गुजराती, उर्दू अशा अनेक भाषा बोलणारे लोक आपल्या आजूबाजूला असतात. ते वेगवेगळ्या पद्धतींनी सणवार, उत्सव साजरे करतात. त्यांच्या पूजा-उपासनेच्या चालीरीती वेगवेगळ्या आहेत. विविध ऐतिहासिक वारसा असलेले प्रदेश आपल्या देशात आहेत. त्यांच्यात विविधतेची देवाणघेवाण आहे. आपल्या देशातील हे विविध समूह वर्षानुवर्षे एकत्र राहत असल्यामुळे त्यांच्यात एकतेची भावना निर्माण झाली आहे. भारतीय समाजातील एकता यातून दिसून येते.

## २.१ विविधता हीच आपली ताकद

विविध समूहांच्या बरोबर राहणे म्हणजे सहअस्तित्व अनुभवणे होय. अशा सहअस्तित्वामुळे आपल्यातील सामंजस्य वाढते. त्यामुळे परस्परांच्या चालीरीतींशी व जीवनपद्धतींशी आपली ओळख होते. आपण एकमेकांच्या जीवनपद्धतींचा आदर करायला शिकतो. इतरांच्या काही प्रथा-परंपरा आत्मसात करतो. यातून समाजात एकोपा वाढतो. सामाजिक एकोप्यामुळे आपण अनेक नैसर्गिक व सामाजिक आपत्तींचा सामना करू शकतो.

## २.२ धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व

भारतीय समाजात विविध धर्मांचे लोक राहतात. त्यांच्यातील परस्पर सामंजस्य वाढीस लागावे व सर्वांना आपापल्या श्रद्धेनुसार उपासना करण्याचे स्वातंत्र्य असावे यासाठी आपल्या संविधानात महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत.

भारत हे जगातील एक महत्त्वाचे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. आपल्या देशात भाषिक आणि धार्मिक विविधता मोठ्या प्रमाणावर आहे. ही विविधता निकोपपणे जपण्यासाठी आपण धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारले आहे. त्यानुसार,

- आपल्या देशात राज्यसंस्थेने कोणत्याही एका धर्माचा पुरस्कार केलेला नाही.
- प्रत्येक व्यक्तीला आपापल्या किंवा आपल्या पसंतीच्या धर्माची उपासना करण्याचे स्वातंत्र्य आहे.
- धर्माच्या आधारे व्यक्ती-व्यक्तींमध्ये भेदभाव करता येत नाही. सर्व धर्मांच्या लोकांना राज्यसंस्थेकडून समान वागणूक दिली जाते.
- शिक्षण, रोजगार, सरकारी नोकरीच्या संधी सर्वांना उपलब्ध करून दिल्या जातात. त्यात धर्माच्या आधारे भेदभाव केला जात नाही.
- धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी संविधानात विशेष तरतुदी केल्या आहेत. अल्पसंख्याकांना आपापली भाषिक आणि सांस्कृतिक ओळख जोपासण्याचे स्वातंत्र्य आहे. शिक्षणाद्वारे आपापल्या समाजाचा विकास करण्याचे स्वातंत्र्यही त्यांना आहे.
- धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामुळे भारतीय समाजात धार्मिक सामंजस्य टिकून राहिले आहे.

## २.३ आपल्या जडणघडणीत समाजाचा सहभाग

समाजात राहून आपण काय शिकतो ? कोणते गुण आत्मसात करतो ? आपल्या जडणघडणीत समाज कशी मदत करतो ते आपण समजावून घेऊ.

**सहकार्य :** कोणताही समाज व्यक्ती आणि समूहातील परस्पर सहकार्यावर आधारलेला असतो.

व्यक्ती-व्यक्तींमध्ये सहकार्य असल्याशिवाय समाज अस्तित्वात राहू शकत नाही. परस्परांच्या अडचणी व प्रश्न सोडवण्यासाठी परस्परांना मदत करणे व देवाणघेवाण करणे म्हणजे सहकार्य होय. आपल्या घरातील व्यक्तींमध्ये अशी वृत्ती नसेल तर जसे आपले कुटुंब टिकू शकत नाही तसेच समाजाचे आहे. सहकार्याअभावी आपला विकास रखडेल, दैनंदिन जीवनही सुरळीत चालणार नाही. सहकार्यामुळे समाजातील परस्परावलंबन अधिक निकोप होते, समाजातील सर्वांना सामावून घेता येते. सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याची ती एक प्रक्रिया आहे.



**चला,चर्चा करू.**

आपल्या समाजातील दुर्बल व वंचित घटकांना आणि मुलींना शिक्षण घेण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी आपण सहकार्य केले पाहिजे. त्यासाठी शासनाने आत्तापर्यंत कोणत्या योजना राबवल्या आहेत याची माहिती मिळवा. या घटकांच्या विकासासाठी तुम्ही काय कराल याची वर्गात चर्चा करा. चर्चेतील महत्त्वाचे मुद्दे इतर वर्गांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवा.

**सहिष्णुता आणि सामंजस्य :** समाजात जसे सहकार्य असते तसेच कधी कधी मतभेद, वाद आणि संघर्षही निर्माण होतात. व्यक्ती-व्यक्तींमधील मते, विचार आणि दृष्टिकोन जुळले नाहीत तर वाद, संघर्ष निर्माण होऊ शकतात. एकमेकांविषयी असणारे पूर्वग्रह किंवा गैरसमज हेही संघर्षाचे कारण असू शकते. दीर्घकाळ संघर्ष चालू ठेवणे हे कोणाच्याच हिताचे नसते. तडजोड आणि समझोता यांच्याद्वारे व्यक्ती संघर्षाचे निराकरण करायला शिकतात. एकमेकांना समजून घेतले आणि सहिष्णुवृत्ती दाखवली तर संघर्ष मिटू शकतात.

सामंजस्यातून नकळतपणे आपण अनेक नव्या गोष्टी शिकतो. नवा विचार आत्मसात करतो. आपले सामाजिक जीवन अधिकाधिक समृद्ध बनायला त्याची मदत होते. आपल्यातील सहिष्णुता वाढते. सामाजिक स्वास्थ्य आणि शांतता टिकवण्यासाठी ही एक सोपी पद्धत शिकण्याची संधी समाजामुळे मिळते.



**करून पहा.**

तुम्हीही अशा अनेक तडजोडी करत असाल. खाली तुमचेच काही अनुभव आहेत. त्यांत आणखी काही अनुभवांची भर घाला.

(अ) सभागृह तुडुंब भरले आहे. जागा शोधणाऱ्या एका व्यक्तीला तुम्ही तुमच्या बाकावरील छोट्याशा जागेत सामावून घेता.

(ब) तुम्हांला गिअर असणारी सायकल हवी आहे. परंतु ताईच्या फीचे पैसेही भरायचे आहेत. तुम्ही तुमचा हट्ट बाजूला ठेवता.


(क) शेतीच्या बांधावरून शेजाऱ्याशी सुरू असलेला तुमच्या कुटुंबाचा वाद कोर्टात न जाता तुम्ही संपवला. शेजारचा सोपान आता तुमचा चांगला मित्र झाला.

**विविध भूमिका पार पाडण्याची संधी :** समाजात आपल्या वाट्याला अनेक भूमिका येतात. एकच व्यक्ती अनेक भूमिका पार पाडत असते. प्रत्येक भूमिकेच्या काही जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये ठरलेली असतात. कुटुंबात आणि बाहेर आपण या भूमिकांमुळे अनेकांशी जोडले जातो. आपल्या भूमिकांमध्ये अनेकदा बदल होत असतात.



**करून पहा.**

**विविध भूमिका पार पाडण्याची संधी :** आजची तुमची भूमिका स्पष्ट करणारे पुढील पृष्ठावरील चित्र पहा. वीस वर्षांनंतर तुम्हांला कोणत्या नव्या भूमिका पार पाडाव्या लागतील त्याची चर्चा करा.




### २.४ समाजाचे नियमन

समाजाचे व्यवहार सुरळीतपणे चालावेत म्हणून काही नियमांची आवश्यकता असते. पूर्वी समाजाचे नियमन बहुतांशी रूढी-परंपरा यांच्याद्वारे होत असे. परंतु आधुनिक समाजाचे नियमन रूढी-परंपरेबरोबरच कायद्यानेही करावे लागते. रूढी-परंपरा, संकेत इत्यादींपेक्षा कायद्याचे स्वरूप वेगळे असते. या सर्व बाबींच्या आधारे आपल्या समाजाचे नियमन अनेक संस्था व संघटना करतात. स्थानिक पातळीवर असणाऱ्या शासन संस्थाही समाजनियमनाच्या कार्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतात.



## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(१) विविध समूहांच्या बरोबर राहणे म्हणजे ............ अनुभवणे होय.

(२) भारत हे जगातील एक महत्त्वाचे .............. राष्ट्र आहे.

(३) सहकार्यामुळे समाजातील .............. अधिक निकोप होते.

**२. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) सहकार्य म्हणजे काय ?

(२) धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व आपण का स्वीकारले आहे ?

**३. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(१) भारतीय समाजातील एकता कशातून दिसून येते ?

(२) समाजात संघर्ष केव्हा निर्माण होऊ शकतात ?

(३) सहकार्यामुळे कोणते फायदे होतात ?

(४) तुमच्या समोर दोन मुले भांडत आहेत, तर तुम्ही काय कराल ?

(५) तुम्ही शालेय मंत्रिमंडळात मुख्यमंत्री आहात. तुम्ही कोणकोणती कार्ये कराल ?

**उपक्रम**

(१) शिक्षकांच्या मदतीने शाळेत सहकारी तत्त्वावर कुमार वस्तू-भांडार चालवा. त्याविषयी तुमचे अनुभव लिहा.

(२) शाळेत व वर्गात तुम्ही कोणकोणते नियम पाळता, त्यांचा तक्ता तयार करून वर्गात लावा.

* * *

E77ETV


# ३. ग्रामीण स्थानिक शासन संस्था


३.१ ग्रामपंचायत
३.२ पंचायत समिती
३.३ जिल्हा परिषद


समाजाचे नियमन करण्यात स्थानिक शासन संस्था महत्‍त्‍वाची भूमिका पार पाडतात. आपल्या देशात या संस्थांबरोबरच संघशासन व राज्यशासनही समाजनियमनाच्या कामात सहभागी असते. स्थानिक शासन संस्थांचे ढोबळमानाने ग्रामीण व शहरी स्थानिक शासन संस्था असे वर्गीकरण केले जाते. या पाठात आपण ग्रामीण भागातील स्थानिक शासन संस्थांविषयी जाणून घेऊया. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या ग्रामीण स्थानिक शासन संस्थांना एकत्रितपणे 'पंचायती राज्यव्यवस्था' म्हटले जाते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**




आपल्या देशात तीन पातळ्यांवरून राज्यकारभार चालतो. संपूर्ण देशाचा राज्यकारभार संघशासन चालवते. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व चलन इत्यादी विषय संघशासनाच्या कक्षेत येतात. दुसऱ्या पातळीवर राज्यशासन असते. महाराष्ट्राचे राज्यशासन कायदा, सुव्यवस्था, आरोग्य, शिक्षण यांच्यासंबंधी कायदे करते. तिसऱ्या पातळीवर स्थानिक शासन संस्था असतात. ग्रामीण भागातील स्थानिक शासन संस्थांना 'पंचायती राज्य व्यवस्था' म्हणतात.

**स्थानिक शासन संस्था**

| **ग्रामीण** | **शहरी** |
|---|---|
| ग्रामपंचायत | नगरपंचायत |
| पंचायत समिती | नगरपरिषद |
| जिल्हा परिषद | महानगरपालिका |

## ३.१ ग्रामपंचायत

प्रत्येक गावाचा कारभार ग्रामपंचायत करते. पाचशेपेक्षा कमी लोकसंख्या आहे अशा दोन किंवा अधिक गावांसाठी एकच ग्रामपंचायत असते. तिला 'गट ग्रामपंचायत' म्हणतात. पाणीपुरवठा, दिवाबत्ती, जन्म-मृत्यू, विवाहाच्या नोंदी इत्यादी कामे ग्रामपंचायत करते.

### ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व अधिकारी :

**सरपंच :** ग्रामपंचायतीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले सदस्य आपल्यापैकी एकाची सरपंच आणि एकाची उपसरपंच म्हणून निवड करतात. ग्रामपंचायतीच्या सभा सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होतात. गावाच्या विकास योजना प्रत्यक्ष राबवण्याची जबाबदारी सरपंचावर असते. योग्य पद्धतीने कारभार न करणाऱ्या सरपंचावर ग्रामपंचायतीच्या सदस्यांना अविश्वासाचा ठराव मांडता येतो. सरपंच उपस्थित नसेल तेव्हा ग्रामपंचायतीचे कामकाज उपसरपंच पाहतो.

**ग्रामसेवक :** ग्रामसेवक ग्रामपंचायतीचा सचिव असतो. त्याची नेमणूक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी करतात. ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज पाहणे, ग्रामपंचायतीच्या विकास योजना गावातील लोकांना समजावून सांगणे इत्यादी कामे ग्रामसेवक करतो.


**ग्रामसभा :** ग्रामीण भागात किंवा गावात राहणाऱ्या मतदारांची सभा म्हणजे ग्रामसभा. ग्रामसभा हे स्थानिक पातळीवरील लोकांचे सर्वांत महत्त्वाचे संघटन होय.


प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान सहा सभा होणे बंधनकारक आहे. ग्रामसभा बोलावण्याची जबाबदारी सरपंचावर असते. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या पहिल्या सभेत ग्रामपंचायतीने सादर केलेला वार्षिक अहवाल आणि हिशोबावर ग्रामसभा चर्चा करते. ग्रामसभेच्या सूचना ग्रामपंचायतीला कळवल्या जातात.

ग्रामपंचायतीच्या विकास योजनांना ग्रामसभा मान्यता देते. शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यास कोणत्या व्यक्ती पात्र आहेत ते ठरवण्याचा अधिकार ग्रामसभेला असतो.

**ग्रामसभेत महिलांचा सहभाग :** ग्रामसभेच्या बैठकीपूर्वी गावातील महिलांची सभा होते. तिथे महिला अधिक मोकळेपणाने वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा करतात. पिण्याचे पाणी, दारूबंदी, रोजगार, इंधन, आरोग्य इत्यादी विषयांबाबत महिला ग्रामसभेत अधिक आस्थेने बोलतात. आवश्यक ते बदल घडवण्यासाठी उपायही सुचवतात.

**ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने :** गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायत अनेक योजना व उपक्रम राबवते. त्यासाठी ग्रामपंचायतीजवळ पैसा असणे आवश्यक आहे. विविध करांची आकारणी करून ग्रामपंचायत पैसा उभा करते.








## ३.२ पंचायत समिती

एका तालुक्यातील सर्व गावांचा एकत्रित असा विकासगट असतो. विकासगटाचा कारभार पाहणारी संस्था म्हणजे पंचायत समिती होय. ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांना जोडणारा दुवा पंचायत समिती असते.

**पंचायत समितीचे पदाधिकारी :** पंचायत समितीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची सभापती आणि एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. पंचायत समितीच्या सभा बोलावणे आणि सभांचे कामकाज चालवणे ही जबाबदारी सभापतीची असते. सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती काम पाहतो.

### पंचायत समितीची कामे




विकास गटात कोणती कामे केली पाहिजेत, त्या योजनांचा आराखडा पंचायत समिती तयार करते. प्रत्येक महिन्यात पंचायत समितीची किमान एक तरी सभा होणे आवश्यक असते.

पंचायत समितीला जिल्हा निधीतून काही रक्कम मिळते. विकास गटात करायच्या विकासाच्या योजनांसाठी पंचायत समितीला राज्यशासनाकडूनही अनुदान मिळते.

## ३.३ जिल्हा परिषद

प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा परिषद असते. महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे आहेत परंतु जिल्हा परिषदा मात्र ३४ आहेत. कारण मुंबई (शहर) जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा हे ग्रामीण लोकवस्तीचे भाग नाहीत म्हणून त्यांच्यासाठी जिल्हा परिषदा नाहीत.

**जिल्हा परिषदेचे पदाधिकारी :** जिल्हा परिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची अध्यक्ष आणि एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात.

जिल्हा परिषदेच्या सभांचे अध्यक्षपद जिल्हा परिषद अध्यक्षाकडे असते. सभांचे कामकाज त्याच्या नियंत्रणाखाली चालते. जिल्हा परिषदेच्या आर्थिक व्यवहारांवर अध्यक्षाचे नियंत्रण असते.

जिल्हा परिषदेच्या निधीतून योग्य तो खर्च करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला असतो. अध्यक्षाच्या गैरहजेरीत ही सर्व कामे उपाध्यक्ष पार पाडतो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**जिल्हा परिषदेचा कारभार कसा चालतो ?**


जिल्हा परिषदेचा कारभार विविध समित्यांमार्फत चालवला जातो. वित्त समिती, कृषी समिती, शिक्षण समिती, आरोग्य समिती, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती इत्यादी. महिला व बालकल्याण समिती महिलांचे आणि बालकांचे प्रश्न विचारात घेते.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :** जिल्हा परिषदेने घेतलेल्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी करतो. त्याची नेमणूक राज्यशासन करते.


**तुम्ही काय कराल ?**

कल्पना करा, तुम्ही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहात. तुमच्या जिल्ह्यात तुम्ही कोणत्या विकास कामांना प्राधान्य द्याल ?


## जिल्हा परिषदेची कामे



शिक्षणविषयक सुविधा




आरोग्यविषयक सुविधा



पाणीपुरवठा




बी–बियाणांचा पुरवठा



दिवाबत्तीची सोय



गावाच्या परिसरात झाडे लावणे

**काय कराल ?**

दिनेश आणि नयनाला खालील गोष्टी मिळवण्यासाठी कोठे जायला सांगाल ?

- छोट्या भावंडाच्या लसीकरणासाठी ......... .
- वडिलांबरोबर ७/१२ (सात बाराचा) उतारा आणण्यासाठी ................. .
- नव्या खताचा वापर करण्याविषयी माहिती मिळवण्यासाठी ................. .
- अशुद्‌ध पाणीपुरवठ्याच्या विरोधात तक्रार करण्यासाठी ................. .
- जन्माचा दाखला मिळवण्यासाठी ........... .
- उत्पन्नाचा / जातीचा दाखला मिळवण्यासाठी ................. .

**माहीत आहे का तुम्हांला ?**

१९९२ मध्ये ७३ व ७४ वी संविधान दुरुस्ती झाली. या दुरुस्तीने ग्रामीण व शहरी स्थानिक शासन संस्थांना संविधानात स्थान दिले. परिसराचा विकास कार्यक्षमरीतीने करण्यासाठी त्यांच्या अधिकारात वाढ केली. त्यांच्या अखत्यारीतील विषयही वाढवले. त्यांना प्रभावीपणे काम करता यावे म्हणून त्यांच्या आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवले.

**पंचायत राज्यव्यवस्था – एका दृष्टिक्षेपात**

अध्यक्ष ← जिल्हा परिषद → मुख्य कार्यकारी अधिकारी

सभापती ← पंचायत समिती → गटविकास अधिकारी

सरपंच ← ग्रामपंचायत → ग्रामसेवक

सरपंच ↓ मतदानाद्‌वारे निवडले जातात.

ग्रामसेवक ↓ राज्यशासनाकडून नेमले जातात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**निवडणूक कोण लढवू शकते ?**

ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तीनही शासन संस्थांमध्ये निवडून येण्यासाठी काही पात्रतेच्या अटी पूर्ण कराव्या लागतात. उदा., निवडणूक लढवणारी व्यक्ती भारताची नागरिक असावी. तिचे वय २१ वर्षे पूर्ण असावे. स्थानिक मतदारयादीत त्या व्यक्तीचे नाव समाविष्ट असावे. पात्रतेच्या या अटी शहरी स्थानिक शासन संस्थांनाही लागू आहेत.

**स्थानिक शासन संस्था – ग्रामीण**

| ग्रामपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद |
|---|---|---|
| **सदस्य संख्या** | | |
| किमान ७<br>कमाल १७ | किमान १५<br>कमाल ४५ | किमान ५०<br>कमाल ७५ |
| **पदाधिकारी** | | |
| सरपंच<br>उपसरपंच | सभापती<br>उपसभापती | अध्यक्ष<br>उपाध्यक्ष |
| **अधिकारी** | | |
| ग्रामसेवक | गटविकास अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |



## स्वाध्याय

**१. योग्य पर्यायासमोर (✓) अशी खूण करा.**

(१) प्रत्येक गावाचा स्थानिक कारभार ..........करते.

ग्रामपंचायत ☐ पंचायत समिती ☐ जिल्हा परिषद ☐

(२) प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान ........... सभा होणे बंधनकारक असते.

चार ☐ पाच ☐ सहा ☐

(३) महाराष्ट्रात सध्या .............जिल्हे आहेत.

३४ ☐ ३५ ☐ ३६ ☐

**२. यादी तयार करा.**

पंचायत समितीची कामे.

**३. तुम्हांला काय वाटते ते सांगा.**

(१) ग्रामपंचायत विविध कर आकारते.

(२) महाराष्ट्रातील एकूण जिल्ह्यांच्या संख्येपेक्षा जिल्हा परिषदांची संख्या कमी आहे.

**४. तक्ता पूर्ण करा.**

माझा तालुका, माझी पंचायत समिती

(१) तालुक्याचे नाव ............. .

(२) पंचायत समिती सभापतीचे नाव............. .

(३) पंचायत समिती उपसभापतीचे नाव............. .

(४) गटविकास अधिकाऱ्याचे नाव ............. .

(५) गटशिक्षण अधिकाऱ्याचे नाव............. .

**५. थोडक्यात माहिती लिहा.**

(१) सरपंच

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी

**उपक्रम**

(१) अभिरूप ग्रामसभेचे आयोजन करून सरपंच, सदस्य, नागरिक, ग्रामसेवक या भूमिका वठवा.

(२) बालसंसदेची रचना स्पष्ट करणारा तक्ता तयार करा व वर्गात दर्शनी भागात लावा.

(३) तुमच्या परिसरातील किंवा शहरानजीकच्या जिल्हा परिषदेच्या योजनांची माहिती मिळवा.

* * *

E7GAVI

# ४. शहरी स्थानिक शासन संस्था

**४.१ नगरपंचायत**

**४.२ नगरपरिषद**

**४.३ महानगरपालिका**

मागील पाठात आपण ग्रामीण भागातील स्थानिक शासन संस्थांचे स्वरूप पाहिले. या पाठात आपण शहरी भागातील स्थानिक शासन संस्थांचे स्वरूप समजावून घेणार आहोत. शहरी स्थानिक शासन संस्थांमध्ये नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका यांचा समावेश होतो.

आपल्या देशात शहरांची संख्या खूप आहे. शहरे झपाट्याने वाढत आहेत. गावांची निमशहरे, निमशहरांची शहरे आणि शहरांची महानगरे होत आहेत. शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या ग्रामीण भागाचेही स्वरूप बदलत आहे.

**चला, चर्चा करा.**

शहरांना भेडसावणारे प्रमुख प्रश्न कोणते आहेत?

शहरातील नातेवाइकांकडे दिवाळीची सुट्टी मजेत घालवलेली रेश्मा तेथील काही प्रसंगांबाबत विचार करू लागली. रेश्माप्रमाणेच या प्रसंगावर तुम्ही विचार करा आणि दोन परिच्छेदांत ते लिहा.

- रुग्णवाहिकेचा सायरन जोरात वाजत होता आणि मोकळा रस्ता मिळत नव्हता.
- पाणीकपातीच्या निर्णयामुळे पाण्याच्या टँकरसमोर गर्दी होती.
- बागांमध्ये लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांसाठी सोई केल्या जात होत्या.

**शहरांमधील सोई व समस्या**

| सोई | समस्या |
|---|---|
| १. उद्योग, व्यवसायाच्या संधी | १. अपुरा निवारा |
| २. वाढते सेवाक्षेत्र | २. जागेची टंचाई |
| ३. मोठ्या प्रमाणावर रोजगार | ३. वाहतूक कोंडी |
| ४. मनोरंजन, कला, साहित्य इत्यादी सोई उपलब्ध | ४. कचऱ्याच्या विल्हेवाटीची समस्या |
| | ५. वाढती गुन्हेगारी |
| | ६. गलिच्छ वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या |

## ४.१ नगरपंचायत

शहर होण्याच्या प्रक्रियेत जी गावे असतात तेथे नगरपंचायत असते. पूर्णतः खेडेही नाही आणि शहरही नाही अशी काही ठिकाणे आपण पाहतो. तेथील स्थानिक शासन संस्था म्हणजे नगरपंचायत होय. अन्य स्थानिक संस्थांप्रमाणे नगरपंचायतीची दर पाच वर्षांनी निवडणूक होते. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची अध्यक्ष आणि एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात.

✲ सर्वच स्थानिक शासन संस्थांना काही आवश्यक कामे पार पाडावी लागतात. त्यानुसार नगरपंचायतीची आवश्यक कामे कोणती असे तुम्हांला वाटते?

## ४.२ नगरपरिषद

लहान शहरांसाठी नगरपरिषद हे स्थानिक शासन निर्माण केले जाते. नगरपरिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले प्रतिनिधी नगरसेवक म्हणून काम करतात. ते आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतात. त्यास नगराध्यक्ष असे म्हणतात.

नगरपरिषदेच्या सर्व सभांचे अध्यक्षस्थान नगराध्यक्ष भूषवतो. तेथील कामकाजाचे नियमन करतो. नगरपरिषदेच्या आर्थिक प्रशासनावर नगराध्यक्ष लक्ष ठेवतो. नगराध्यक्षांच्या गैरहजेरीत उपनगराध्यक्ष नगरपरिषदेचे कामकाज पाहतो.

नगरपरिषदेला काही कामे करणे बंधनकारक असते, ती आवश्यक कामे म्हणून ओळखली जातात. उदाहरणार्थ, सार्वजनिक रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणे, पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता आणि मलनि:सारणाची व्यवस्था करणे, जन्म-मृत्यू, विवाह यांच्या नोंदी ठेवणे इत्यादी.

या व्यतिरिक्त नगरपरिषद जनतेला अधिक सेवा-सुविधा मिळाव्यात म्हणून अन्यही काही कामे करते. त्यांना 'नगरपरिषदेची ऐच्छिक कामे' म्हणतात. सार्वजनिक रस्त्यांची आखणी व त्यासाठी जागेचे संपादन करणे म्हणजे ती मिळवणे, गलिच्छ वस्त्यांमध्ये सुधारणा करणे, सार्वजनिक बागा व उद्याने बांधणे, गुरांसाठी सुरक्षित निवारा उपलब्ध करून देणे इत्यादी. ही कामे नगरपरिषदेची ऐच्छिक कामे आहेत.




**माहीत आहे का तुम्हांला ?**

प्रत्येक नगरपरिषदेसाठी एक मुख्याधिकारी असतो. नगरपरिषदेने घेतलेल्या निर्णयांची तो अंमलबजावणी करतो. त्याला मदत करण्यासाठी अनेक अधिकारी असतात.

✼ तुम्हांला असा अधिकारी व्हायला आवडेल का? तुम्ही आरोग्याधिकारी झालात तर कोणती कामे कराल?

**नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे मार्ग**






**तुम्ही काय कराल?**

१. कचरावेचकांना तुमच्या घरातील कचरा देताना...

२. जलवाहिनी फुटल्यामुळे रस्त्यावर पाणी साठले आहे.....

३. पाणीपुरीसाठी अस्वच्छ पाणी वापरले जात असल्याचे तुमच्या लक्षात आले आहे....

४. पुलावरून अनेकजण नदीत निर्माल्याच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या टाकत आहेत......

५. गलिच्छ वस्त्यांच्या सुधारणेचा नगरपरिषदेचा कार्यक्रम वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला आहे, परंतु त्यातील एखादी कृती तुम्हांला अयोग्य वाटते..........

**नगरपरिषदेतर्फे आवाहन पत्र**

डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी डासांची उत्पत्ती थांबवा. त्यासाठी एवढे करा.

१. जुने टायर, नारळाच्या करवंट्या, जुने रिकामे डबे गच्चीवर किंवा आसपास साठवून ठेवू नका.

२. ताप उतरत नसल्यास ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या.

३. परिसर स्वच्छ ठेवा.

✼ तुमच्या घरात आणि परिसरात या आवाहनाच्या आधारे तुम्ही काय कराल?

## ४.३ महानगरपालिका

मोठ्या शहरांमध्ये नागरिकांना विविध सेवा देणाऱ्या स्थानिक शासन संस्थेला 'महानगरपालिका' म्हणतात. महाराष्ट्रात प्रथम मुंबई येथे महानगरपालिका स्थापन करण्यात आली.

**शोधा म्हणजे आणखी समजेल...**

आपल्या महाराष्ट्रात किती शहरांचा कारभार महानगरपालिका पाहते?

तुमच्या शहराची महानगरपालिका केव्हा अस्तित्वात आली?

शहराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात महानगरपालिकेची एकूण सदस्यसंख्या निश्चित केली जाते. दर पाच वर्षांनी महानगरपालिकेच्या निवडणुका होतात. निवडून आलेले प्रतिनिधी नगरसेवक असतात. ते आपल्यापैकी एकाची महापौर व एकाची उपमहापौर म्हणून निवड करतात. महापौर हा शहराचा प्रथम नागरिक मानला जातो. महानगरपालिकेच्या सभांचा तो अध्यक्ष असतो. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहराच्या अनेक प्रश्नांवर चर्चा होते. शहराच्या विकासासंबंधी अनेक महत्त्वाचे निर्णय तिथे घेतले जातात.

**महानगरपालिकेच्या समित्या :** महानगरपालिकेचा कारभार समित्यांमार्फत चालवला जातो. शिक्षण समिती, आरोग्य समिती, परिवहन समिती या त्यांपैकी काही महत्त्वाच्या समित्या आहेत.

**महानगरपालिकेचे प्रशासन :** महानगरपालिका आयुक्त हा महानगरपालिकेच्या प्रशासनाचा प्रमुख असतो. महानगरपालिकेने घेतलेल्या सर्व निर्णयांची तो अंमलबजावणी करतो. उदा., एखाद्या महानगरपालिकेने प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी आणण्याचा निर्णय घेतला असल्यास त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी महानगरपालिका आयुक्त करतो. महानगरपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक तो तयार करतो. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण बैठकींना तो उपस्थित राहतो.



**करून पहा.**

तुमच्या वर्गाची एक शिक्षण समिती तयार करा. मुले व मुली यांचे समान प्रतिनिधित्व असलेल्या या समितीने पुढील प्रश्नांवर चर्चा करावी व अहवाल तयार करावा.

(अ) वर्गखोलीतील सुविधा

(ब) वर्गाच्या छोट्या ग्रंथालयाच्या निर्मितीचा प्रस्ताव

(क) क्रीडास्पर्धांचे आयोजन



**माहीत आहे का तुम्हांला ?**

एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण जवळजवळ निम्मे आहे. तरीही राज्यकारभारात मात्र स्त्रिया अभावानेच दिसतात. आपल्या घरगुती कामातून स्त्रिया अन्न, इंधन, पाणी यांसारखे अनेक महत्त्वाचे विषय रोज हाताळतात पण यांबाबत निर्णय घेण्यात मात्र त्यांचा वाटा नसतो. घरच्या पाण्याची काळजी महिला घेते पण पाण्याच्या प्रश्नात तिचा सहभाग नसतो. स्थानिक शासन संस्थांमध्ये पन्नास टक्के राखीव जागांमुळे असे महत्त्वाचे प्रश्न तडीस नेण्याची संधी महिलांना मिळाली आहे.

खाली दिलेल्या यादीतून महानगरपालिकेची कामे शोधा व त्यांची एक सूची तयार करा.

- पाणीपुरवठा
- पोलीस
- रेल्वेचे वेळापत्रक ठरवणे
- पर्यावरण रक्षण
- देशाच्या सीमारेषांचे संरक्षण
- रस्त्यावरील दिवाबत्ती
- अनधिकृत बांधकामावर हातोडा
- जन्म-मृत्यू, विवाह नोंद
- अग्निशामक सेवा
- धोकादायक इमारतींबाबत सूचना
- प्राथमिक शिक्षण
- बांधकामांना परवानगी
- शहरातील सार्वजनिक वाहतूक


कर संकलन

**महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मार्ग**

↓

- → घरपट्टी
- → मालमत्ता कर
- → पाणीपट्टी
- → व्यवसाय कर
- → मनोरंजन कर
- → कर्ज उभारणी
- → राज्यशासनाचे अनुदान

**हे वाचल्यावर तुम्हांला काय वाटले ?**

- तुमच्या शहरात मेट्रो सुरू होणार आहे.
- चोवीस मजली इमारती बांधायला परवानगी मिळाली आहे.
- प्रत्येक प्रभागात उद्याने व विरंगुळा केंद्रांची निर्मिती केली जाणार आहे.
- शुद्ध पाण्याचा वापर बागा व गाड्या धुण्यासाठी करणाऱ्यांवर कारवाई होणार आहे.
- ओला कचरा परिसरातच जिरवण्याचे बंधन घातले आहे.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रमांची निर्मिती केली जाणार आहे.

**महानगरपालिकेने असे का केले ?**

- महानगरपालिकेने टेकड्यांवर वृक्षतोड करून बांधकाम करायला परवानगी दिली नाही.
- डेंग्यू, स्वाइन फ्लू, कोरोना यांसारखे आजार नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या.
- अग्निशमन यंत्रणा अद्ययावत केली.
- भाजी मंडईतील वजनकाट्यांची तपासणी केली.

**काय कराल ?**

तुमच्या परिसरातील नगरपरिषद किंवा महानगरपालिकेची रुग्णालये कोठे आहेत ते शोधा. या रुग्णालयात कोणत्या सुविधा आहेत ? रुग्णालयात उपचार घेण्यासाठी काय करावे लागते ?

**स्थानिक शासन संस्था – शहरी**

| नगरपंचायत | नगरपरिषद | महानगरपालिका |
|---|---|---|
| **सदस्य संख्या** | | |
| किमान ९<br>कमाल १५ | किमान १७<br>कमाल ३८ | लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण सदस्य संख्या ठरते. |
| **पदाधिकारी** | | |
| अध्यक्ष<br>उपाध्यक्ष | नगराध्यक्ष<br>उपनगराध्यक्ष | महापौर<br>उपमहापौर |
| **अधिकारी** | | |
| कार्यकारी अधिकारी | मुख्याधिकारी | आयुक्त |



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**आरक्षण म्हणजे काय ? ते का आवश्यक आहे ?**

ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद, नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिकांमध्ये जितक्या जागा जनतेने निवडून द्यायच्या असतात त्यांपैकी काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास वर्गातील लोकांसाठी राखून ठेवलेल्या असतात. या जागांवर त्या त्या वर्गातील लोकच निवडून येतात. यालाच जागांचे 'आरक्षण' म्हणतात. तसेच एकूण जागांपैकी निम्म्या जागा महिलांसाठी राखीव असतात.

समाजातील वंचित घटकांना व महिलांना गावाच्या किंवा शहराच्या कारभारात भाग घेता यावा, निर्णयात सहभागी होता यावे म्हणून आरक्षण आवश्यक असते. लोकशाहीत सर्वांना सहभागाची संधी असणे आवश्यक असते.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय ओळखा व लिहा.**

(१) महाराष्ट्रात प्रथम महानगरपालिका स्थापन करण्यात आली, त्या शहराचे नाव ........... .

(नागपूर, मुंबई, लातूर)

(२) शहर होण्याच्या प्रक्रियेत जी गावे असतात तेथे कामकाज पाहते.............. .

(नगरपरिषद, महानगरपालिका, नगरपंचायत)

(३) नगरपरिषदेच्या आर्थिक प्रशासनावर लक्ष ठेवतो.............. .

(मुख्याधिकारी, कार्यकारी अधिकारी, आयुक्त)

**२. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) शहरामध्ये कोणकोणत्या समस्या आढळतात?

(२) महानगरपालिकेच्या विविध समित्यांची नावे लिहा.

**३. पुढील मुद्द्यांच्या आधारे शहरी स्थानिक शासन संस्थांविषयी माहिती देणारा तक्ता तयार करा.**

**४. सांगा पाहू.**

(१) नगरपरिषदेच्या आवश्यक कामांमध्ये कोणकोणत्या कामांचा समावेश होतो?

(२) नगरपंचायत कोणत्या ठिकाणी असते?

**५. तुमच्या जिल्ह्यात कोठे कोठे नगरपरिषद, नगरपंचायत व महानगरपालिका काम पाहते त्यांच्या नावांची यादी करा.**


**उपक्रम**

(१) साथींच्या रोगांचा प्रसार होऊ नये म्हणून आरोग्य जागृतीविषयी घोषवाक्ये तयार करा व वर्गात लावा.

(२) आपल्या परिसरातील महानगरपालिकेला भेट द्या. तेथे कोणते नवीन उपक्रम हाती घेतले त्यांची माहिती मिळवा. तुम्ही त्यात काय योगदान देऊ शकता यावर वर्गात चर्चा करा.

E7Q6X6

| मुद्दे | नगरपंचायत | नगरपरिषद | महानगरपालिका |
|---|---|---|---|
| पदाधिकारी | | | |
| सदस्य संख्या | | | |
| अधिकारी | | | |



रुग्णालय

* * *

# ५. जिल्हा प्रशासन

**५.१ जिल्हाधिकारी**
**५.२ जिल्हा पोलीस प्रमुख**
**५.३ जिल्हा न्यायालय**




असे प्रश्न तुम्हांलाही पडले असतील ना? जिल्हा परिषद हा पंचायती राज्यव्यवस्थेचा म्हणजेच ग्रामीण स्थानिक शासन संस्थेचा एक घटक आहे. परंतु आपल्या महाराष्ट्रात जिल्ह्याचे प्रशासन जिल्हा परिषदेबरोबरच जिल्हाधिकाऱ्याकडूनही केले जाते. संघशासन व राज्यशासन या प्रशासनात सहभागी असतात.

## ५.१ जिल्हाधिकारी

जिल्हा प्रशासनाचा प्रमुख जिल्हाधिकारी असतो. त्याची नेमणूक राज्यशासन करते. जिल्हाधिकाऱ्याला शेतसारा गोळा करण्यापासून ते जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यापर्यंत अनेक कामे करावी लागतात. खालील तक्त्याच्या आधारे ती आपण समजावून घेऊ.

**जिल्हाधिकारी**

| शेती | कायदा व सुव्यवस्था | निवडणूक अधिकारी | आपत्ती व्यवस्थापन |
|---|---|---|---|
| • शेतसारा गोळा करणे. | • जिल्ह्यात शांतता प्रस्थापित करणे. | • निवडणूक योग्य प्रकारे पार पाडणे. | • आपत्तीच्या काळात त्वरित निर्णय घेऊन हानी रोखणे. |
| • शेतीशी संबंधित कायद्याची अंमलबजावणी करणे. | • सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवणे. | • निवडणुकीच्या संदर्भात आवश्यक निर्णय घेणे. | • आपत्ती व्यवस्थापनाच्या यंत्रणेला आदेश देणे. |
| • दुष्काळ व चाऱ्याची कमतरता यांवर उपाययोजना करणे. | • सभाबंदी, संचारबंदी जारी करणे. | • मतदार याद्या अद्ययावत करणे. | • आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन करणे. |

**माहीत आहे का तुम्हांला ?**


**सामाजिक स्वास्थ्य राखणे का महत्त्वाचे असते?**

समाजात असणारे मतभेद, तंटे आणि संघर्षाचे निराकरण शांततेच्या मार्गाने झाले पाहिजे, परंतु काही वेळेस असे न होता अशांतता निर्माण होते. त्यातून हिंसक घटना घडल्यास आपल्या समाजाचे स्वास्थ्य बिघडते. आपल्या प्रगतीला त्यामुळे बाधा निर्माण होते. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. असे होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी प्रयत्न करतो, पण नागरिकांनीही सामाजिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**तहसीलदार :** प्रत्येक तालुक्यासाठी एक तहसीलदार असतो. तहसीलदार तालुका दंडाधिकारी या नात्याने तंट्यामध्ये निवाडाही करतो. तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी तहसीलदारावर असते.

## ५.२ जिल्हा पोलीस प्रमुख

महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक पोलीस अधीक्षक असतो. त्या जिल्ह्याचा तो प्रमुख पोलीस अधिकारी असतो. जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलीसप्रमुख जिल्हाधिकाऱ्यांना मदत करतात. शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस आयुक्तांवर असते.



**पोलीस अधीक्षक पोलीस दलाची पाहणी करताना**

**जिल्हा प्रशासन**

- जिल्हाधिकारी
  - उपजिल्हाधिकारी
    - तहसीलदार
      - तलाठी
        - पोलीसपाटील
- पोलीस अधीक्षक
  - पोलीस उपअधीक्षक
    - पोलीस निरीक्षक
      - साहाय्यक पोलीस निरीक्षक

## ५.३ जिल्हा न्यायालय


आपल्या अधिकार क्षेत्रातील तंटे सोडवणे, तंट्यात न्यायनिवाडा करणे आणि संघर्षाचे वेळीच निराकरण करणे ही कामे जिल्हा पातळीवरील न्यायालयाला करावी लागतात.

भारताच्या संविधानाने स्वतंत्र न्यायव्यवस्थेची निर्मिती केली आहे. न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी भारताचे सर्वोच्च न्यायालय असते. त्याखालोखाल उच्च न्यायालये असतात. त्याखालोखाल कनिष्ठ न्यायालये असतात. त्यात जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालय आणि महसूल न्यायालय यांचा समावेश होतो.



**न्यायालयाचे कामकाज**

जिल्हा पातळीवर असणाऱ्या न्यायालयाला ‘जिल्हा न्यायालय’ असे म्हणतात. त्यात एक मुख्य जिल्हा न्यायाधीश व अन्य काही न्यायाधीश असतात. जिल्ह्यातील वेगवेगळ्या खटल्यांची सुनावणी व नंतर अंतिम निकाल देण्याचे काम जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश करतात. तालुका न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील करता येते.




### आपत्ती व्यवस्थापन

आपल्याला वेगवेगळ्या आपत्तींचा सामना करावा लागतो. पूर, आग, चक्रीवादळ, ढगफुटी, गारपीट, भूकंप, भूस्खलन यांसारख्या नैसर्गिक आपत्तींबरोबरच दंगली, धरण फुटणे, बाँबस्फोट, साथीचे आजार यांसारख्या आपत्तींना सामोरे जावे लागते. अशा प्रकारच्या आपत्तींमुळे लोकांचे फार मोठ्या प्रमाणावर विस्थापन तसेच जीवित व वित्तहानी होते. त्यामुळे पुनर्वसनाचे प्रश्नही महत्त्वाचे ठरतात. आपत्तींचा सुव्यवस्थित व शास्त्रीय पद्धतीने सामना करण्याच्या पद्धतीला ‘आपत्ती व्यवस्थापन’ असे म्हणतात. आपत्ती व्यवस्थापनात संपूर्ण जिल्हा प्रशासन यंत्रणा गुंतलेली असते. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अनेक आपत्तींची आता पूर्वसूचना मिळू शकते. उदाहरणार्थ, पुराची, वादळाची पूर्वसूचना देणारी प्रणाली विकसित झाली आहे. या प्रणालीमुळे धोक्याची सूचना मिळते.



**हे नेहमी लक्षात ठेवा.**

आपत्तीच्या काळात सतर्क राहणे आवश्यक असते. आपत्तीचा सामना करण्यासाठी व्यक्ती व विविध यंत्रणांच्या मदतीची गरज असते. त्यांच्याशी त्वरित संपर्क साधता यावा म्हणून आपल्या घरात दर्शनी भागात दवाखाने, पोलीस, अग्निशामक दल, रक्तपेढी इत्यादींचे दूरध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. आपल्या मित्रांनाही तसे करण्यास सांगावे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाराष्ट्रात अनेक अधिकाऱ्यांनी प्रशासनात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयोग केले. त्यांच्या या प्रयोगांमुळे नागरिकांना मिळणाऱ्या सेवेत सुधारणा झाल्या. परिणामी प्रशासनाबाबत नागरिकांचे मत चांगले होण्यास मदत झाली. त्यामुळे नागरिकांचा प्रशासनाला मिळणारा प्रतिसाद आणि त्यांचा शासनातील सहभाग वाढला.

**(अ) लखीना पॅटर्न** : प्रशासन कार्यक्षम व्हावे, नागरिकांना मिळणाऱ्या सार्वजनिक सेवा विशिष्ट दर्जाच्या मिळाव्यात म्हणून अहमदनगर जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. अनिलकुमार लखीना यांनी प्रशासनात अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्या ‘लखीना पॅटर्न’ म्हणून ओळखल्या जातात. कार्यपद्धतीचे प्रमाणीकरण, नियम सोप्या भाषेत लोकांना समजतील अशा पद्धतीने सादर करणे इत्यादी प्रशासकीय बदल करण्यात आले. लोकांची कामे एकाच छताखाली व्हावीत म्हणून त्यांनी ‘एक खिडकी योजना’ सुरू केली.

**(ब) दळवी पॅटर्न** : पुणे जिल्ह्याचे तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री. चंद्रकांत दळवी

यांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणा 'दळवी पॅटर्न' म्हणून ओळखल्या जातात. टेबलावर कागदपत्रांचे आणि फायलींचे ढीग साठवून न ठेवता त्यांचा त्याच दिवशी निपटारा करणे आणि निर्णय घेण्यात गतिमानता आणणे हे या सुधारणांचे उद्‌दिष्ट होते. हा पॅटर्न झिरो पेन्डन्सी (शून्य विलंब) म्हणून ओळखला जातो. निर्णयातील विलंब यामुळे टाळता आला. प्रशासन गतिमान बनण्यास त्याची मदत झाली.

**(क) चहांदे पॅटर्न :** नाशिकचे तत्कालीन विभागीय आयुक्त डॉ. संजय चहांदे यांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणांना 'चहांदे पॅटर्न' म्हणून ओळखले जाते. प्रशासन व सामान्य जनता यांच्यातील दरी कमी व्हावी, प्रशासनाचे लोकांप्रति असणारे उत्तरदायित्व वाढावे, विकासाच्या कामाचे प्राधान्यक्रम जनतेच्या सहभागाने ठरवता यावेत, यासाठी त्यांनी 'ग्रामस्थ दिन' योजना राबवली. प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी एका ठरलेल्या दिवशी गावात जाऊन तेथील लोकांशी थेट संवाद साधावा व त्यांच्या समस्यांची सोडवणूक करावी यासाठी ग्रामस्थ दिनाचे आयोजन केले जाते.



## स्वाध्याय

**१ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) जिल्हा प्रशासनाचा प्रमुख कोण असतो ?

(२) तहसीलदारावर कोणती जबाबदारी असते ?

(३) न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी कोणते न्यायालय असते ?

(४) कोणकोणत्या आपत्तींची पूर्वसूचना आपल्याला मिळू शकते ?

**२ जोड्या जुळवा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| (अ) जिल्हाधिकारी | (१) तालुका दंडाधिकारी |
| (आ) जिल्हा न्यायालय | (२) कायदा व सुव्यवस्था राखणे |
| (इ) तहसीलदार | (३) तंटे सोडवणे |

**३ खालील मुद्द्यांवर चर्चा करा.**

(१) आपत्ती व्यवस्थापन

(२) जिल्हाधिकाऱ्यांची कामे

**४ तुम्हांला यांपैकी कोण व्हावेसे वाटते व का ते सांगा.**

(१) जिल्हाधिकारी

(२) जिल्हा पोलीस प्रमुख

(३) न्यायाधीश

**उपक्रम**


(१) आपल्या नजीकच्या पोलीस ठाण्यास भेट देऊन तेथील कामकाजाविषयी माहिती मिळवा.


(२) विविध आपत्ती, त्याविषयी घ्यायची खबरदारी व महत्त्वाचे दूरध्वनी यांचा तक्ता तयार करून वर्गाच्या दर्शनी भागात लावा.

(३) नववर्षानिमित्त जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हा मुख्य न्यायाधीश यांना शुभेच्छापत्र पाठवा.


* * *

E7Z2YT




































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



ग्रामसभा



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

इतिहास व नागरिकशास्त्र इ. ६ वी (मराठी माध्यम)

₹ ३७.००